समाजातील वंचित घटकामध्ये व समाजाच्या सर्व यंत्रणेमध्ये अधिकाधिक सामाजिक न्याय प्रवर्तित होण्यासाठी राजकीय पुढाऱ्यांनी निर्धारपूर्वक व मानवीदृष्टिकोनाणातून पाऊल टाकावे. समाजात वाढत असलेल्या बेरोजगाराच्या प्रश्नाकडे आजच्या राजकारणीयांनी तितक्याच जाणीव जागृतीने त्याकडे लक्ष दयावे

यशवंतराव चव्हाण मानवी विकासासाठी आणि शेतकरी शेतमजूर यांच्या संरक्षणासाठी आणि शोषणमुक्त समाजनिर्मिती साठी शेतकऱ्यापासून ते दलितवर्गापर्यंत विचार करताना आढळतात भांडवलशाहीवर राजकीय नियंत्रण निर्माण करावे आणि यंत्रणा मजबूत करावी. धर्मव्यवस्था आणि जातीव्यवस्थेने समाजाची जी हानी होते ती शोषण करणारी यंत्रणाच कुचकामी ठरवावी असे त्यांना वाटते.

यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणातील लोकप्रिय कणखर व्यक्तीमत्व ठरले. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना खेडयातील एका युवकाचा मुख्यमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री आणि उपपंतप्रधानपदा पर्यंतचा प्रवास थक्क करणारा व प्रेरणादायी आहे त्यांनी राजकारण ते समाजकारण, अर्थकारण, साहित्य, शैक्षणिक परराष्ट्र धोरण या सगळया विविध विषयांना स्पर्श करून राष्ट्राच्या व राज्याच्या जडण—घडणीत मोठे योगदान दिले.

**संदर्भ:—**


१. डॉ.जे. एफ. पाटील, सहयाद्रीचा सुर्य, समाजवादी प्रबोधिनी, प्रथम आवृत्ती २०१३,

२. भावे मधुकर यशवंतराव ते विलासराव मनोविकास प्रकाशन, पुणे, २००८.

३ डॉ. अलका देशमुख (सं) यशवंतराव चव्हाण संरक्षण व परराष्ट्र विषयक धोरण नागपूर—३२ विश्व पब्लीशर्स

४ भा. कृ. केळकर (सं) यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तीमत्व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई २०१०.

# आदर्श व प्रेरणादायी राजकीय नेतृत्त्व : आर. आर. पाटील ऊर्फ आबा

**प्रा. डॉ. व्ही. एच. भटकर** ,श्री शिवाजी महाविद्यालय, अकोट, जि.अकोला.

---

**सारांश :-** अनेक जाती-धर्म, भाषा, संस्कृती असलेल्या, विविधतेने नटलेल्या भारत देशामध्ये एवढी अवाढव्य लोकसंख्या, विशाल भुप्रदेश असतांनाही सांसदीय लोकशाही टिकून असणे हे जगाचे दृष्टीने नवलच आहे. भारतमातेशी इमान राखणाऱ्या, निस्वार्थी, निष्कलंक, कर्तृत्त्वान, समाजसेवी, राष्ट्रहीत व समाजहीत जपणाऱ्या नेत्यांनी व समाजसेवकांनी त्याकरिता आपले आयुष्य वाहून टाकलेले आहे हे विसरून चालणार नाही. स्वतः मोठे होण्याकरिता अर्थात पद, पैसा व प्रतिष्ठा या अर्थाने मोठे होण्याकरिता बहुतेक नेते मंडळी आपले आयुष्य खर्ची घालतात. राजकारणात चाललेली स्पर्धा व पैशांचा महापूर तसेच त्यातूनच निर्माण होणारी भ्रष्टाचारी प्रवृत्ती ही आपल्या करिता नित्याचीच बाब झाली. एवढेच नव्हे तर तेच खरे ध्येय असे विचार समाजमनामध्ये त्यातही तरूण पिढीमध्ये रूजायला लागलेत. अशा प्रवृत्तींकडून देशहीताला निर्माण होणारा धोका ओळखणारे राजकीय व सामाजिक संत या देशात आहेत. त्यांची संख्या कमी असली तरी समाजाची घडी त्यांच्यामुळेच टिकून आहे. अशा काही मोजक्या राजकीय संतांमध्ये स्व. आर. आ. पाटील उर्फ आबा यांचा समावेश होतो. सामाजिक समस्यांची जाण असलेला व त्या सोडविण्याकरिता सतत झटणारा, विनम्रता, मृदुता ज्यांच्या स्वभावात होती, उत्तम वक्ता व सक्षम इमानदार नेता म्हणून ज्यांची ओळख होती असे आर. आर. पाटील उर्फ आबा हे दि. १६/०२/२०१५ रोजी स्वर्गवासी झाले. त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवणारे नेते, समाजसेवी निर्माण होणे आवश्यक आहे. त्यातच आपल्या सांसदीय लोकशाहीचे हित व सर्वांगीण विकास, एकता व एकात्मता दडलेली आहे.

**जीवन परिचय :-**१६ ऑगस्ट १९५७ रोजी महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात असलेल्या अंजनी या छोट्याश गावात जन्माला आलेले रावसाहेब रामराव पाटील म्हणजेच आर. आर. पाटील. आबा या नावाने संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा परिचय आहे. बालपणीची परिस्थिती हालाखीचीच होती. केवळ चार एकर शेतीवर छोट्या पाच भावडांचा सांभाळ त्यांच्या आईने केला. उदर निर्वाण व शिक्षणाकरिता रोजगार हमी योजनेच्या कामावर त्यांना जावे लागले. 'कमवा आणि शिका' या तत्त्वानुसार कर्मविरांच्या संस्थेत प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या काळात त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. महाविद्यालयात गेल्यावरच त्यांनी पहिल्यांदा पायात चप्पल घाती. चांगले मार्क्स मिळवून एल.एल.बी. चे शिक्षण पुर्ण केले. परंतु समाजात असलेले असंख्य प्रश्न सोडविण्याची त्यांची तळमळ होती. त्यातुनच त्यांचा राजकारणाशी संबंध घाला. ज्याही क्षेत्रात जायचे तेथे निस्वार्थ भावनेने कार्य करायचे, समाज हीत जपायची, नैतिकता जपून कार्य संस्कृती विषयी आदर्श निर्माण करायचा हे जणू त्यांच्या रक्तातच होते. अशा सर्वसामान्याचेच जीवन जगणारा पैशाच्या श्रीमंती पासून स्वतःला कोसो दुर ठेवणारे, गरिबांसोबत रममान होणारे सर्वांचे आबा दिनांक १६/२/२०१५ रोजी अंजनीच्या मातीत चिर निद्रास्त झाले.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**शहरी झगमगाट, पद, पैसा व प्रतिष्ठा या करिता सुरू असलेली स्पर्धा यामुळे विकास कार्यात येणारे अडथळे व त्यातून होणारी सामाजिक अधोगती थांबविण्यासाठी आर.आर. ऊर्फ आबा पाटील यांच्या विचारांचे कार्याचे महत्त्व पटवून देणे.

१. अगदी कमी पैशात विविध योजना राबविण्याचे आर. आर. ऊर्फ आबा पाटील यांचे बहुमूल्य व महत्तम कार्याची ओळख करून देणे.
२. भ्रष्टाचाराने पोखरलेल्या आजच्या राजकारणामध्येही साधी राहणी, स्वच्छ प्रतिभा, निस्वार्थ भाव, कार्यमग्नता ठेवून एक राजकीय संत म्हणून आर. आर. ऊर्फ आबा पाटील यांच्या जीवनाचा आदर्श समाजासमोर मांडणे.

**गृहितक :-**

१. समृद्ध ग्राम समृद्ध देश बनविण्याकरिता दुरदृष्टी ठेवणाऱ्या नेत्यांची आवश्यकता आहे. पण त्यांची संख्या खुपच कमी आहे.
२. सामाजिक व राजकीय असुरक्षितता सर्वत्र पसरलेली आहे. त्याकरिता राजकीय नेतृत्त्व बहुअंशी जबाबदार आहे.
३. सामान्यांच्या समस्या सोडविणाऱ्या नेतृत्त्वाची भारतीय राजकारणात कमतरता आहे.
४. राजकीय नितिमत्ता बाळगणे व कार्यतत्पर राहणे. यामुळेच नेत्याची नाळ जनमानसाशी जुळली जाते.

**राजकीय कारकीर्द :-** महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण करून वकिली व्यवसाय करण्याचा हेतू होता. परंतु समाजातील तळागाळातील कष्टकरी, कामगार, शेतकरी यांच्या समस्या पाहून वकिली व्यवसायात त्यांचे मन लागू शकले नाही. सांगली मध्ये स्व. वसंतदादा पाटील यांच्या काळात त्यांचा कॉंग्रेस पक्षाशी संबंध आला. त्यांच्यामध्ये नेतृत्त्व गुण, काम करण्याची सचोटी व वक्तृत्त्व गुण होते. त्यामुळे राजकारणात त्यांचा जम बसायला वेळ लागला नाही. १९७९ मध्ये पहिल्यांदा सांगली जिल्हा परिषदेवर सदस्य म्हणून भरघोस मतांनी निवडून आले. १९९० पर्यंत सांगली जिल्हा परिषदेमध्ये शेतकरी, कामगार, सामान्य, गोरगरिबांचा बुलंद आवाज म्हणून आबांची ओळख तयार झाली. १९९० मध्ये शरद पवार यांनी त्यांना राज्यविधानसभेकरिता उमेदवार म्हणून उभे केले. तेंव्हापासून ते विधीमंडळ सदस्य राहिलेत. १९९५ मध्ये शिवसेना-भाजपा सरकार असतांना विरोधी बाकावर बसून आपल्या वक्तृत्त्व गुण व अभ्यास पुर्ण प्रश्न मांडणीमुळे सभागृह गाजविले १९९९ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस सोबत जाऊन ग्रामविकास मंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री अशा पदावर राहून तेथेही आपल्या कार्याची आठवण त्यांनी सदैव कोरून ठेवलेली आहे. एवढ्या महत्त्वाच्या मोठ्या पदावर सतत राहूनही त्यांना सत्तेची उर्मी कधीच चढली नाही. सत्तेचा व पदाचा अहंकार चेहऱ्यावर किंवा वागण्यात, बोलण्यात कधीच जाणवलेला नाही. मोठे पद मिळाले तरी काम हेच आपले ध्येय आहे. सामान्यांचे प्रश्न सोडविणे हेच माझे जीवन आहे. जनमानसाशी सदैव-जुळून राहणे यावर माझे राजकारण अवलंबून आहे. याची सदैव जाण ठेवणारे नेतृत्त्व १६ फेब्रुवारी २०१५ रोजी या मातीत विसावले. राजकीय नेतृत्त्वाचा, नितिमत्तेचा, निस्वार्थी नेतृत्त्वाचा, साधेपणाचा आदर्श समाजापुढे ठेऊन गेले.

**नेतृत्त्वाकडून लोकांना असलेल्या अपेक्षा :-** सांसदीय लोकशाही मध्ये राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधी यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. व्यक्तिगतरित्या विचार केल्यास प्रत्येकाच्या समस्या व अपेक्षा वेगवेगळ्या असतात. राजकीय व्यवस्थेमध्ये व्यक्तिगत हितापेक्षा सामुहिक हित व समाजहीत जपणे महत्त्वाचे असते. राजकीय पक्षाची व्याख्या करतांना एडमंड बर्क असे म्हणतो "व्यापक राष्ट्रीय हितसंबंधांची जपवणूक करणारी आणि सांसदीय मार्गाने सरकार बनवून आपली ध्येये प्रत्यक्षात आणणारी व्यक्तींची संघटना म्हणजे राजकीय पक्ष", अशी पक्षव्यवस्था लोकशाही मध्येच असू शकते. सर्वच लोक शासन करू शकत नाहीत तसे करणे शक्यही नाही. करिताच प्रतिनिधीक लोकशाही स्विकारणे अपरिहार्य आहे. समाज आपल्या लोकप्रतिनिधीकडून विविध प्रकारच्या अपेक्षा बाळगून असतो. सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्यासाठी, सामाजिक एकता, एकात्मता निर्मिती करिता तसेच राजकीय सुरक्षिततेकरिता लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला पाहीजे. आपली ग्रामीण संस्कृती लोप पाऊन, खेडे भकास होऊन केवळ शहरी झगमगाट म्हणजेच विकास असे माननाने लोकप्रतिनिधी सर्वांगीण विकास घडवून आणु शकणार नाहीत. शहरी झगमटाच्या मोहजालात फसवे म्हणजेच कमी श्रमात भरपूर पैसा, प्रसिद्धी व सत्तेची चढाओढ निर्माण होणे, त्यातूनच भ्रष्टाचार, अपहार, फसवणुकी व सामाजिक नितिमत्ता ढासळणे सुरू होते. निस्वार्थ भाव असणारे नेते फार कमी संख्येने दिसतात. शहरीकरण, पद, पैसा व प्रतिष्ठा यांच्या मागे लागल्यामुळे सामान्य जनतेचे प्रश्न दुर्लक्षित होतात. सामाजिक दरी निर्माण होऊन लोकप्रतिनिधी विषयी भ्रमनिरास होतो. समाजाचा संतुलीत विकास होण्याकरिता राजकीय पक्षांनाच समाजातील विविध प्रकारच्या हितसंबंधाना एकत्र आणुन त्यांच्यात सुसूत्रता आणण्याचे काम राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधी यांनाच करावे लागेल. विविध सामाजिक, आर्थिक व राष्ट्रीय प्रश्नांचा गांभीर्याने विचार करून निश्चित भुमिका घेण्याचे काम राजकीय पक्ष व लोकप्रतिनिधी यांनाच द्यावयाचे आहे. मानवी हक्कांची रूजवणूक करण्याची जबाबदारी राज्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांचीच आहे. सद्यस्थितीमध्ये उपरोक्त विचार,

कर्तव्ये पार पाडणारी राज्यकर्ते मंडळी व लोकप्रतिनिधी यांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच दिसून येते. आपला प्रतिनिधी कोणत्या पक्षाचा आहे हे पाहण्याऐवजी तो आपल्या प्रश्नाप्रती किती जागरूक आहे. स्वत: ऐवजी समाजहीत किती जपतो, स्वत:ऐवजी समाजहीत किती जपतो, आपले आयुष्य समाजासाठी कसा झिजवितो याचा विचार जनता निश्चितच करीत असते. भारत मातेशी इमान राखणारे, निश्वार्थ, निष्कलंक, कर्तृत्त्ववान, जाणकार, कार्यक्षम नेतृत्त्व देऊ शकणारे नेते प्रत्येक पक्षात आहेत. पण त्यांची संख्या कमी आहे. पण संख्या कमी असली तरी आपल्या भारतीय समाजाची घडी त्यांच्यामुळेच निट रूपात दिसते आहे. असेच एक समाजसेवी राजकीय संत आर. आर. पाटील ऊर्फ आबा आहेत. आबांचा वक्तीगत व्देष करणारी मंडळी खचीतच सापडेल. त्यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये घेतलेल्या निर्णयांची वाहवा प्रत्येकालाच करावी लागेल. स्वहीत व पक्ष हिताच्या पलीकडे जाऊन समाजहिताला प्राधान्य देऊनच प्रत्येक निर्णय व योजना मांडल्यामुळेच ते लोकांचे हृदयस्थान बनले. प्रत्येक पक्षीयांना त्यांचे समर्थन करावेच लागले. थोर समाजसेवक अण्णा हजारे स्वत: आबाच्या अंतिम संस्काराला हजर असणे व त्यांना जनसामान्यांचा दिपस्तंभ अशी उपमा त्यांनी देणे यातच आबांचे महानत्त्व दडलेले आहे. यावरूनच आबा केवळ एका कोणत्या पक्षाचे प्रतिनिधी नसून सर्वपक्षिय, सर्व समाजसेवी, सर्व जनतेचे प्रतिनिधी होते याची जाण त्यांच्या अंतिमसंस्कार प्रसंगी सर्वांनाच झालेली आहे. आबा नेहमी कार्यतत्त्पर राहले, नितीमत्ता राखली, निस्वार्थ सेवाभाव जपला, गरिबीची जाण ठेवली, आपल्या कुटुंबाला शहरात न नेता गावातच ठेवले, जनसामान्यांचे प्रश्न सोडविले, खेडे समृद्ध बनविण्यासाठी नानाविध योजनांची अंमलबजावणी केली. नैतिकता टिकविण्यासाठी डान्सबार बंदीसारखा धाडसी निर्णय घेऊन अंमलात आणला. अशा समाजसेवी, कर्तव्यनिष्ठ लोकप्रतिनिधींचीच अपेक्षा लोकांना असते.

**राबविलेली धोरणे :-** १९७९ ते १९९० पर्यंत आपली राजकीय कारकीर्द सांगली जिल्हापरिषद येथून सुरू केली. १९९० पासून राज्य विधानसभेत सतत राहिलेत. ग्रामविकास मंत्री, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी राजकीय पदे भुषविली. त्यांना जनतेचा रोष कधीच पाहावा लागला नाही. यावरून ते जनतेशी किती घट्ट जुळलेले होते हे स्पष्ट होते. ग्रामविकास हे त्यांचं आवडत खातं होते. खेड्यातच जन्मलेले, गरीबी पाहलेले, कामगार म्हणून कष्ट केलेले, कमवून शिकलेले आबा म्हणजे ग्रामीण विकासाचा महामेरू होय. ग्रामविकासाच्या योजना राबविण्याकरिता ते संत गाडगे महाराजांचे जन्मभूमित ते जाऊन आले, तुकारामदादा ग्रामगीताचार्य यांच्याकडे अड्याळ टेकडीवर जाऊन आले. त्यातुनच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव, आदर्श गाव निर्मिती, संपूर्ण स्वच्छता अभियान, समृद्ध ग्राम योजना सुरू केल्या. "ग्राम समृद्ध तर देश समृद्ध" असे विचार असलेल्या आबांनी लोकवर्गणीतून समृद्ध ग्रामाच्या योजना साकार केल्या. पिण्याच्या पाण्याच्या समस्या बऱ्याचअंशी सोडविल्या. शासनावर आर्थिक भार न येऊ देता लोकवर्गणीततन ग्राम विकास घडविण्याचे कार्य पार पाडले. एक दारूडा मुलगा डान्सबार मध्ये जायला पैसे हवे म्हणून आईचा खून करतो अशी वर्तमानपत्रातील बातमी वाचून राज्यात डान्सबार बंदीचा निर्णय घेतो. राजकीय विरोध व बारमालकांच्या धमक्या आल्या तरीही त्याची अंमलबजावणी त्यांनी केलीच. चांगल्या सुरक्षित व विकसीत जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून त्यांना होता आले असते. पण समाजासाठी काहीतरी करायचे, त्यासाठीच आपण राजकारणात आलो हे माननारे आबा विदर्भातील अतिदुर्गम, नक्षलप्रवण गडचिरोलीचे पालकत्त्व घेतात. त्यांच्यासारखा निधड्या छातीचा लोकप्रतिनिधीच असे आव्हान पेलू शकतो. सतत त्या भागात भेटी देणे, संपर्क ठेवणे, विद्यार्थी व तरूणांना विश्वासात घेऊन नक्षलवादाचा बिमोड करण्याच्या योजना आखणे, तेथील जनतेवर पोलीसांचे होणारे अन्याय दुरू करणे, त्यांना संरक्षणाची हमी देणे, त्या भागाचा विकास घडवून आणणे, रस्ते व परिवहन सेवा सुरू करणे, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शहर, विधीमंडळ, राजभवन येथे सहलीला नेणे, हे त्यांचे कार्य केवळ मते मिळविण्यासाठी किंवा स्वत:च्या मोठेपणासाठी त्यांनी केले नसून त्यात सामाजिक व नैतीक विकास दडलेला आहे. सुरक्षितता, स्थिरता त्यांच्या कार्यात सामावली आहे. ग्रामोद्धार, देश विकास व समाजसेवा त्यातुनच दिसून येते. नेत्यांची आदर्श कशी असावी, नेतृत्त्व कसे असावे, निस्वार्थ भाव कशाला म्हणावे, साधी राहणी कशी ठेवावी हे सर्व आबांचे जीवन आणि कार्य यावरून लक्षात येऊ शकते.

**निष्कर्ष :-**

१.आर.आर.पाटील ऊर्फ आबा म्हणजे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील लोकप्रतिनिधीमधील एक आदर्श प्रतिनिधी होते.

२.त्यांच्या ग्रामीण विकासाच्या योजनांमध्ये संपूर्ण समाजाचा व देशाचा विकास दडलेला आहे. त्यांचे नेतृत्त्व देशाला सतत प्रेरणादायी ठरले आहे.

३.सामाजिक स्वास्थ्य, स्थिरता, नितिमत्ता व सुरक्षितता राखण्याचे दृष्टीने आबांचे कार्य प्रेरणादायी आहे.

४.साधी राहणी, ग्रामाशी संपर्क, सामान्यांचे प्रश्नाची सतत जाण ठेवली या त्यांच्या विचारात व कार्यात विकासाची दुरदृष्टी होती.

५.भ्रष्टाचार विरोधी विचारसरणी असणारे, केवळ पैशानेच विकास होतो असे न माननारे व आपण मालक नसून जनतेचे सेवक आहोत याची जाण असणारे जनसामान्यांचे नेतृत्त्व म्हणजे आर.आर.ऊर्फ आबा पाटील.

**संदर्भ सूची :-**

१.भारतीय लोकशाही : स्थिती आणि गती, संपादक डॉ. पंडीत नलावडे

२.मानवी हक्क व समाज : निराली प्रकाशन

३भारतीय राजकारण प्रक्रिया : ग्रंथनिर्मिती, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

४.दै. लोकसत्ता, दि. १७ व १८ फेब्रुवारी २०१५

५.दै. सकाळ दि. १७ फेब्रुवारी, २०१५.

# मानवाधिकाराच्या परिप्रेक्ष्यातून स्त्रियांचे अधिकार आणि सद्यःस्थितीतील प्रसार माध्यमांची भूमिका

**प्रा.डॉ. अलका विनायक देशमुख** सहयोगी प्राध्यापक, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

संयुक्त राष्ट्र संघाला मानवाधिकाराची यंत्रणा शक्तिशाली आणि परिणाम घटक करण्यासाठी उच्च आयुक्तामार्फत निरनिराळया देशांच्या शासनाशी प्रत्यक्ष संपर्क साधून जे पहिले घोषणापत्रतयार करण्यात आले. त्यानुसार मूलभूत अधिकारांसंबंध असे म्हटले आहे की, ''आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद असा निर्धार करतो की, मानवाच्या मूलभूत अधिकारांची आणि मूलभूत स्वातंत्र्याची हमी देऊन असा ठास विश्वास व्यक्त करतो की, पुरूष किंवा स्त्री आणि राष्ट्र लहान असो किंवा मोठे या सर्वांना समान अधिकार आणि समान विकासाची संधी उपलब्ध करून देण्याची हमी देतो.''

या घोषणापत्राद्वारे आणिबाणीच्या काळात म्हणजेच युध्द किंवा गृहयुध्दाच्या वेळी स्त्रिया व लहानमुले यांचे संरक्षण राज्याने करावे आणि संपूर्ण जबाबदारी राज्यांवरच राहील असे संयुक्त राष्ट्र संघाच्या कलमामध्ये नमूद करण्यात आले आहे. परिल्या, दुसऱ्या व शीत युध्दाच्या काळात लाखो स्त्रिया आणि लहान मुले मारली गेली. अश परिस्थितीत मानवाच्या संरक्षणाच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्र संघाद्वारे असा ठाव करण्यात आला की, जगातील प्रत्येक व्यक्तिला उदरनिर्वाहाचा किंवा प्रवासाच्या निमित्ताने एका देशातून दुसऱ्या देशात जाण्याचा अधिकार देण्यात यावा या ठरावाची अंमलबजावणी डिसेंबर 2002 मध्ये करण्यात आली. या ठरावाद्वारे सर्व मानवांच्या अधिकारांचे संरक्षण केल्या जाईल असे गृहित धरून निरनिराळया देशांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्या, यालाच ''प्रोटेक्शन ऑफ ऑल राईटस् मायग्रेशन'' असे म्हणतात. 2004 मध्ये याकरिता कायदेशीर व बेकायदेशीरपणे राहणाऱ्या लोकांचे सर्वेक्षण करण्यासाठी एका समितीचे गठन करण्यात आले. 171 देशाचे प्रतिनिधी तसेच जागतिक पातळीवरील 700 अशासकीय संघटनांचे प्रतिनिधी आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या विभागाचे आयुक्त आणि इतर अधिकारी विपन्ना येथील सम्मेलनात या समितीनुसार एकत्र आले. आणि तेथे मानवाच्या मूलभूत अधिकाराचे जतन व पालन करण्याची हमी आणि मान्यता देण्यात आली.

मानवाला हक्क प्राप्तीच्या लढयात प्रखर संघर्ष करावा लागला. लोकशाहीच्या उदयानंतर क्रमशः मानवाला विविध हक्क प्राप्त झाले. नागरिकांना मानवी हक्कांची उपलब्धी करून देणे हे आजच्या युगात अपरिहार्य तर मानले जातेच. पण ते एक सुसंस्कृतपणाचे लक्षण ठरले आहे. जसजशी लोकशाही प्रक्रिया विकसित होऊ लागली. तसतशी मानवाच्या हक्क प्राप्तीच्या आणि विकासाच्या दृष्टीने आशेचा किरण दिसू लागला आणि लोकशाहीचा मुळ आधार म्हणून मानवाधिकार ही संकल्पना पुढे आली. मानवाधिकारामुळे समाजाला जी फार मोठी देणगी मिळाली ती म्हणजे ''समाजातील प्रत्येक घटकाचा विकास व्हावा या दृष्टिने प्रत्येक व्यक्तीला प्रदान केलेले समान अधिकार'' ही होय. मानवाधिकाराची गरज ही प्रत्येकाची महत्वपूर्ण बाब असून प्रत्येकाला ते हक्क मिळवता आले पाहिजे आणि त्याचा योग्य वापर करता आला पाहिजे. यादृष्टिने मानवाधिकार हक्क आणि कायदे यांचा प्रचार आणि प्रसार होऊन शासनाने त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. असा समज निर्माण झाला. मानवाधिकाराचे आधार मॅग्नाकार्टा, बिल ऑफ राईटस, अमेरिकन स्वातंत्र्याची घोषणा, फ्रान्सची राज्यक्रांती इत्यादीतून विकसित झाल्याचे लक्षात येते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर 20 व्या शतकात संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना होऊन युनोच्या जाहिरनाम्याचा मानवी हक्कांना प्राधान्य देण्यात आले. 1948 ला युनोच्या सार्वजनिक सभेने स्वीकारलेला हा वैश्विक जाहिरनामा आणि त्यानंतर 1966 ला आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांचे तसेच नागरी व राजकीय अधिकारासंबंधी युनोने स्वीकारलेले ''दोन क्न्हेक्शन्स'' हेच खऱ्या अर्थाने मानवाधिकाराचे मर्म आहे. आणि त्यानुसारच पुढील काळात मानवाच्या विविध गरजांची पुर्ती होऊन सर्व माणसे समानतेच्या तत्वावर सुखी आणि समृध्दीकडे वाटचाल करतील असे स्वप्न मानवी समाज रंगवू लागला.

पुरूषांच्या तुलनेत बरोबरीने संख्या असणाऱ्या भारतीय समाजातील स्त्रियांनाही या मानवाधिकाराच्या जाहिरनाम्यानुसार समानतेच्या तत्वावर विकासाच्या दृष्टिने विशेष अधिकार प्राप्त झालेत. जागतिकीकरणाच्या माध्यमातून मानवाने सर्व जग आपल्याजवळ आणले. 'न भुतो न भविष्यतो' असा हा चमत्कारच माणसाने आपल्या विवेकी व कल्पक बुध्दीद्वारे केलेला आहे. या चमत्कारात स्त्रियांच्या कर्तृत्वाचाही फार मोठा वाटा आहे. मात्र या चमत्कारीक कर्तृत्वाचे प्रदर्शन करण्यासाठी ज्या साधनांचा उपयोग करण्यात आला त्यात प्रसारमध्यमे मोठया प्रमाणात स्पर्धेत उतरलीत आणि संपूर्ण विश्वातील घडामोडी माणसाला घर बसल्या दिसू लागल्या. चमत्काराच्या या दैदिप्यमान यशामध्ये माणूस आंखड बुडत गेला. मात्र मानवी रूप असलेल्या दुसऱ्या महत्वपूर्ण घटकाला मात्र प्रसार माध्यमांच्या प्रदर्शनाद्वारे विक्रीय स्वरूप प्राप्त झाले. जागतिकीकरणाच्या या काळात संविधानानुसार स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय तसेच मानवाधिकाराद्वारे प्राप्त झालेले विशेष स्त्री सुरक्षा अधिकार स्त्रियांना प्राप्त असतांनाही तसेच पुरूषांच्या बरोबरीने समाज विकासात बरोबरीने सहभाग असूनही भारतात स्त्रियांच्या मानवी हक्काची पायमल्ली होत असल्याचे पदोपदी जाणवते.

स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच सर्व क्षेत्रात समान अधिकार देण्यात यावे असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणापत्रात समाविष्ट करण्यात आले. मानवाधिकार जाहिरनाम्याच्या कलम एकमध्ये स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सर्व प्रकारच्या सवलती उपलब्ध करून देण्याचे प्रावधान आहे. तसेच स्त्रियांच्या अधिकारांचे जतन व संरक्षण करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. स्त्रियांच.ा जागतिक पातळीवर विकास व्हावा याकरिता राष्ट्रसंघाने 1965 मध्ये जिनेव्हा आणि न्युयॉर्क येथे प्रशिक्षण आणि संशोधन केंद्राची स्थापना केली असून 2004 मध्ये या प्रशिक्षण व संशोधन संस्थेचे कार्यकारी संचालक स्वित्झलँडचे मि मार्शल बोर्हसर्ड यांची नियुक्ती करण्यात आली.

1999 च्या स्त्रियांसंबंधित ऐच्छिक प्रोटोकॉलच्या अधिवेशनात स्त्रियांच्या सर्व प्रकारच्यपा अधिकारांचे संरक्षण व जतन करण्यात यावे आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रगती व विकासाची समान संधी स्त्रियांना उपलब्ध करून द्यावी असे ठरले. 1993 च्या युनोच्या वार्षिक महासभेत स्त्रियांना कोणत्याही प्रकारे अन्याय, अत्याचार, बलात्कार करू नये तसेच त्यांचे शोषण किंवा शारीरिक व मानसिक यातना देऊ नये आणि जर असा प्रकार घडला तर त्याची दखल घेऊन त्या–त्या राज्याच्या शासकाला विचारणा केली जाईल असा ठराव पारीत करण्यात आला. 1989 च्या 'कन्व्हेनशन ऑफ दी एलेमिनेशन ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट वुमेन' या नियमाप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा भेदभाव0 करण्यात येणार नाही. असे ठरविण्यात आले तसेच स्त्रियांच्या संरक्षणाची जबाबदारी घेण्यासाठी युनोने ''युनायटेड नेशन्स कमिशन फॉर वुमेन'' ची स्थापना करून त्यावर एका आयुक्ताची नेमणूक केली. त्यानुसार महिलांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण, जतन आणि विकास व्हावा याकरिता 1985 मध्ये मेक्सिकोत, 1980 मध्ये कोपनहेगला, 1985 मध्ये नैरोबीत आणि 1995 मध्ये बिजिंग येथे जागतिकम सम्मेलने आयोजित करण्यात आली. वरील चारही संमेलनात सदस्य सरकारांचे प्रतिनिधी आणि अशासकीय संघटनांचे (NGO) प्रतिनिधी उपस्थित होते या सम्मेलनात स्त्री–पुरूष समानता, विकास, शांतता, शिक्षण, आरोग्य, सकस आहार, गृहनिर्माण, कुटुंब नियोजन इत्यादी बाबतीत स्त्रियांच्या समस्यांवर चर्चा करून विचार विमर्श करण्यात आला. स्त्रियांनी राजकीय व

सामाजिक क्षेत्रात भाग घेऊन कृतिशीलता निर्माण करून समाजाचा आर्थिक विकास करण्यास हातभार लावावा तसेच स्त्रियांना सर्व क्षेत्रात जास्तीत जास्त प्राधान्य देण्यात यावे असे ठरले. त्याचप्रमाणे स्त्रियांना सर्वसामान्य प्रश्नावर आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांवर कधीही गदा येऊ नये याकरिता संयुक्त राष्ट्र संघाच्या निरनिराळया आयोगाच्या आणि विभागांच्यामार्फत गरिबी, शिक्षण, स्वास्थ्य, तंटे, आर्थिकस्थिरता, निर्णयशक्ती, संघटनांची सहाय्यता, वृत्तपत्रे, सोयीस्कर, वातावरण आणि मुलींचे संरक्षण या सर्व समस्यांवर विचार करून त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी असे या चारही सम्मेलनात ठरले. परिणामी मानवी हक्कांच्या परिप्रेक्ष्यात स्त्रियांना त्यांच्या अस्तित्व आणि आत्मभानाची जाण झाली.

मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेचा उद्‌देशच हा होता की, सर्व माणसांना त्यांच्या सर्व हक्कांची जाणीव असावी. आणि त्यांच्या हक्कांची पिळवणूक होऊ नये व त्यावर नियंत्रण प्रस्थापित व्हावे या दृष्टिने प्रसारमाध्यमांनी आपली भूमिका पार पाडावी. मानवी हक्कांच्या संरक्षणात वृत्तपत्र आणि इतर प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत जबाबदारीची असून मानवाधिकार आणि प्रसार माध्यमे यांचे मानवी सुरक्षेसाठी अतूट नाते असावे यादृष्टिने त्याकडे पाहिले जाते. मानवाधिकार हा लोकशाही राष्ट्रांचा आत्मा मानल्या जातो. कारण लोकशाहीमध्ये व्यक्तीस्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अनन्य साधारण महत्व आहे राजकीय व्यवस्थेमध्ये विधी संस्था, कार्यपालिका आणि न्यायसंस्था या तीन संस्थाशिवाय 'प्रसारमाध्यमे' ही चौथी संस्था म्हणन कार्यरत असते. लोकशाही राष्ट्रात मानवी हक्कांचे जतन करण्याची भूमिका वृत्तपत्रांनी निःपक्षपातीपणे कितपत पार पाडली याचे विश्लेषण करणे म्हणूनच आवश्यक ठरते.

इतर देशाच्या दृष्टिने या चारही संस्थांचा विचार केल्यास असे आढळते की, प्रगत देशांनी संविधानानुसार दिलेल्या सर्व मूलभूत हक्कांचा मूल्य तत्वावर स्वीकार केलेला आहे. तर आपल्या देशात चौथा स्तंभ असणाऱ्या महत्वपूर्ण अशा या घटकाने स्त्रियांच्या बाबतीत मूल्यांकडे पूर्णतः दुर्लक्ष करून प्रसारमाध्यमांचा उपयोग केवळ पैसा कमविणे असा केल्यामुळे स्वतःची जबाबदारी विसरून मनोरंजन आणि तेही स्त्रीकेंद्रीत यावरच भर दिला जात असल्याचे दृष्टिस पडते. यामुळे स्त्रियांच्या मानवाधिकाराचे हनन होत असल्याची जाणीव सर्व सुज्ञांच्या मनात होऊ लागली आहे. मानवाधिकार आयोगाने स्त्रियांच्या संरक्षणासाठी व हक्क संवर्धनासाठी विशेष हक्क प्रदान केलेले असतांना प्रसारमाध्यमांनी मात्र मनोरंजनाच्या नावाखाली स्त्रियांचे विविध मार्गाने सांस्कृतिक मार्गाने प्रदर्शन करून तिच्या हक्कांचे बाजारीकरण केलेले आहे. प्रसारमाध्यमांची या बाजारीकरणात दुटप्पी भूमिका दिसून येते ती अशी की, आम्ही स्त्री विकासाच्या दृष्टिने स्त्री स्वातंत्र्याला, स्त्री अभिव्यक्तीला, स्त्रीप्रतिभेला, स्त्री हक्काला चालना देतो आणि त्याद्वारे व इतर स्त्रियांनाही त्यांच्या हक्काविषयी जागरूक होण्यासाठी कार्यक्रमांची आखणी किंवा लेखन करतो, वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे. ती अशी की, स्त्रियाच्या आत्मसन्मानाला तिच्या कौशल्याला तिच्या सक्रीयतेला बाजारी स्वरूप देऊन सर्व स्त्री समाजाच्या हक्कांची पायमल्लीच प्रसारमाध्यमाद्वारे होत आहे. आश्चर्याची बाब अशी की, संपूर्ण विश्व याचे अवलोकन करीत असतांना कुणीही त्यावर आक्षेप घेऊ इच्छित नाही. दिवसेंदिवस प्रसार माध्यमांनी संपूर्ण समाजात आलपे स्थान मजबुत केले आहे. आणि मानवाधिकार ही एक अवास्तविक कल्पना वाटू लागली आहे. संशोधक या नात्याने स्त्रियांचे मानवी हक्क आयोगाने दिलेले अधिकार आणि प्रसार माध्यमांची त्यांच्या संबंधीची दृष्टी याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

स्त्रियांच्या मानवी अधिकारांच्या घोषणेनंतरही सद्यपरिस्थितीत स्त्रियांची मानहानी, त्यांच्यावर होणारे अत्याचार, बलात्कार त्यांची विक्री, त्यांना जीवंत जाळण्याचे प्रकार सुरूच आहेत. अविकसित देशांमध्ये आजही स्त्री आणि पुरूषांसाठी वेगवेगळे कायदे आहेत. म्हणजेच स्त्री पुरूषांमधील असमानता ही तेथे आजही जोपासली जात आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशात जेळो मानवाधिकाराचा मोठया प्रमाणात प्रचार व प्रसार केल्या जातो, तेथेही काही भागात स्त्रियांची स्थिती अधिकच शोचनीय आहे. तेथील काही कारागृहांमध्ये स्त्री कैद्यांना यौन संबंधासाठी विकले जाते. तेथील कारागृहातील महिलांची संख्या ही 10 लाखापेक्षाही जास्त आहे. असे अभ्यासांती निदर्शनास आले नॉर्वेचे माजी पंतप्रधान हरले व ब्रटलँड यांनी दिलेली माहिती तर फार धक्कादायक आहे. ते म्हणाले, ''महिलांच्या जननांगांना आणि शरीराच्या यौन संबंधी अवयवांना काढून घेण्यात आलेल्या महिलांची संख्या प्रचंड असून हा मानवता विरोधी घोर अपराध आहे. भारतात देखील पोलिस कोठडीत स्त्रियांवर झालेल्या बलात्काराबाबत मथुरा, सारखीच अनेक उदाहरणे सापडलीत. स्त्रियांचे आणि कायद्याचे रक्षकच त्यांचे भक्षक बनतात. ही येथे गंभीर बाब आहे.

प्राचीन काळापासून भारतात मानवी जीवन परंपरेला जोपासण्यात स्त्री ने महत्वपूर्ण भूमिका बलावली आहे. नवसृष्टी, नवजीवन निर्माण करणारी, समता व ममतेचा मूलस्त्रोत असलेली, प्रतिभावंत, विदुषी अशी स्त्रीची अनेक रूपे आढळतात. एकाच वेळी दुहेरी तिहेरी भूमिका पार पाडण्याचे सामर्थ्य हे स्त्री मध्येच दिसून येते. प्राचीन काळापासून ते सद्यकालीन स्त्री जीवनाची वाटचाल ही फार उल्लेखनिय आणि कर्तृत्वसंपन्न राहिलेली आहे. मात्र जागतिकीकरणाच्या या रेटयात तिच्या या कर्तृत्व संपन्नतेला वेगळेच वळण लागले आहे. प्रसार माध्यमांनी लोकशाहीचे स्थैर्य टिकवण्यासाठी कुणाच्याही हक्कांना बाधा येणार नाही या दृष्टिने आपली भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. मात्र निरिक्षणाअंती असे दिसून येते की, प्रसारमाध्यमे ही मानवी मूल्यांकडे दुर्लक्ष करूनच आपले कार्य पूर्ण करत आहेत. सांस्कृतिक मनोरंजन आणि लोकांचे मार्गदर्शन, प्रबोधन जाणीव–जागृती करण्यांच्या नावाखाली माध्यमानी अनैतिकतेचा कळसच गाठलेला आणि स्त्रियांच्या हननाला सहकार्यचे केलेले आहे. आज प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात स्त्रियांपेक्षा पुरूषांचे प्राबल्य मोठया प्रमाणात आहे. संपादक, पत्रकार, सहकर्मचारी हे बहुतांश पुरूष असल्यामुळे वृत्तपत्राच्या मुख्यपृष्ठापासून ते शेवटच्या पृष्ठापर्यंत पुरूषांच्या अभिरूचीनुसार स्त्री देहाला जास्त प्रदर्शित केलेले दिसते. वर्तमान पत्राद्वारे साप्ताहिकाद्वारे एखाद्या अभिनेत्रीच्या अभिनयाबद्‌दल, कौशल्याबद्‌दल, कर्तृत्वाबद्‌दल अधिक लिहिण्यापेक्षा तिचा देह कसा दाखवता येईल. स्त्री प्रदर्शन जास्तीत जास्त कसे करता येईल याकडेच वृत्तपत्रांचा, साप्ताहिकांचा कल असतो. वस्तुतः वृत्तपत्रांची भूमिका ही तटस्थ विश्लेषक या दृष्टिने महत्वपूर्ण असते. सर्वसामान्य घटनांमध्ये पत्रकार आपली भूमिका चोखपणे बजावतात. मात्र स्त्रियांच्या बाबतीतील माहितीबाबत त्यांची भूमिका ही मुखपृष्ठावर स्त्रीचे आकर्षक चित्र कसे राहील यानुसारच दिसून येते.

स्त्री मानवाधिकाराबाबत विचार केल्यास वरील निदर्शनानुसार समाजातील बहुसंख्य स्त्रियांच्या समस्या, त्यांचे समाजातील स्थान, त्यांचे कर्तृत्व त्यांनी मिळवलेले यश, त्यांची शुरता या सर्व बाबी स्त्री देहाच्या प्रदर्शनात लुप्त होतात. आज समाज प्रबोधन करणारी वृत्तपत्रे शिथिल झाली आहेत. समाजाला दिशा दाखवणारी अनेक वर्तमानपत्रे ही दर्जाहीन झालेली असून साप्ताहिक, मासिके इत्यादीमधून सर्रास स्त्री देहाची व स्त्री सौंदर्याची चर्चा करण्यातच मशगुल असून त्यालाच ते आपले स्पर्धात्मक यश समजतात. त्यामुळे वृत्तपत्रातून हवे त्या प्रमाणात समाजप्रबोधन होत नाही. केवळ व्यवसाय हाच मुख्य उद्‌देश त्यांच्या समोर दिसतो. स्त्री कायद्यानुसार, अत्याचार, पिडित, बलात्कारीत स्त्रीचे नाव वर्तमानपत्रात प्रसिध्द होऊ नये असा नियम असतांनाही अशा अत्याचारीत महिलांच्या नावाने दूरदर्शन मालिका, वृत्तमालिका चालवणारे अनेक स्वार्थी दिग्दर्शक आणि लेखक या प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या अस्तित्वासाठी व विकासासाठी ज्या काही आवश्यक अटी आहेत, तेच त्याचे अधिकार, एखाद्या शासनाने किंवा संस्कृतीने मान्यता दिलेली असो किंवा नसो, संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारापेक्षाही त्यांची व्याप्ती फार मोठी आहे. कान्टच्या मते, ''अधिकार हे कोणत्याही राज्यांवर अवलंबून नसतात. तसेच ते मानवी स्वभाव किंवा सार्वजनिक कल्याण या नैसर्गिक संस्थांवरही अवलंबून नसतात. कारण

त्यासंबंधी विविध विवाद असू शकतात. तर ते या धारणेवर अवलंबून असतात की, प्रत्येक व्यक्ती ही स्त्री असो की पुरूष तो स्वतःच उदि्दष्ट असून केव्हाही दुसऱ्यांच्या उदि्दष्टांसाठी साधन नसतो. तोच साध्य आहे, साधन नाही. प्रत्येक व्यक्ती स्वायत्त, विवेकशील असून त्याला आपले हित कशात आहे हे कळत असते. दुसऱ्या कुणालाही त्याचे हित कशात आहे. हे त्यांच्या इतके कळत नाही.'' म्हणूनच कान्ट ने प्रत्येक व्यक्तीला अधिकाधिक समान स्वातंत्र्य आहे असे म्हटले, याच कान्टच्या विचारांचा रॉल्सच्या विचारांवर प्रभाव असल्यामुळे तो व्यक्तीच्या न्यायासंबंधी म्हणतो की, ''प्रत्येक व्यक्तीला प्रतिष्ठा आहे त्यामुळे समाजरचना अशी असावी की, प्रत्येकाला काही मूलभूत अधिकार व स्वातंत्र्य असलेच पाहिजे. ज्याद्वारे आजचे जे सु–अवस्थेतील चांगले लोक आहेत ते उद्या वाईट स्थितीत आले तरी त्यांना आपल्या दुर्दैवी स्थितीतून बाहेर येता आले पाहिजे. याचाच अर्थ असा की, प्रत्येक स्त्री पुरूषाला आपला विकास करण्यास पूर्ण संधी मिळाली पाहिजे. समाजव्यवस्थेने त्यांना कोणत्याही अडचणी निर्माण करू नये. वास्तव हे आहे की, मानवाधिकार ही वैश्विक कल्पना असल्यामुळे मानवाधिकाराची जर कुठे पायमल्ली होत असेल तर त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सर्वांना समान तत्वावर असला पाहिजे.

या कान्टच्या स्त्री–पुरूष समानतेच्या आणि रॉल्सच्या समान न्यायाच्या तत्वानुसार प्रसार माध्यमांद्वारे होणारी स्त्रियांच्या अधिकारांची पायमल्ली ही आजच्या प्रगत काळात गंभीर बाब आहे. आज दूरदर्शन आणि त्याआधारे चालणारे विविध चैनल्स यापैकी बरीच चैनल्स चोविस तास स्त्री देहाच्या प्रदर्शनासाठीच असल्याचे जाणवते. कौटुंबिक मालिकांमध्येही स्त्री अधिक चांगली किती? हे दाखवण्यापेक्षा ती जास्त वाईट किती? हे दाखवून कौटुंबिक कलहाचे प्रदर्शन दाखवितांना दिसतात. त्यामुळे मजुर, कामगार स्त्री वर्ग देखील अशा मालिकांच्या आहारी जाऊन त्या मालिकांतील पायाप्रमाणेच आचरण, रहाणीमान आणि फॅशन करताना आढळतात. या स्त्रीवर्गाला गुंतवून ठेवण्यात मालिका यशस्वी ठरल्या आहेत. यापासून काय शिकावे? आणि कशाचे अनुकरण करावे? ही विचार करण्यासारखी बाब आहे.

एकीकडी स्त्रिया स्वतःचा विकास करण्यासाठी मार्गक्रमण करतांनाच आपली योग्य प्रतिष्ठा समाजात निर्माण व्हावी या दृष्टिने प्रयत्नशील आहेत त्यासाठी त्यांना अनेक गोष्टींचा सामना करावा लागत असतांनाच दुसरीकडे मात्र मुळातच अपवाद सोडल्यास व अनेक स्त्रिया या सोशिक, सहनशील, अन्याय सहन करणाऱ्या असून अपराध्याला माफ करण्यासाठीच त्यांचा जन्म आहे. अशाप्रकारची स्त्री पात्रे कौटुंबिक मालिकांमधुन रंगविली जात आहेत. तसेच स्त्रीही दुर्बल, निस्तेज, कळसुत्री बाहुली आहे. हे दर्शविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. पुरूषांप्रमाणेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त क्षेत्रे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने काबिज केलेली आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या कर्तृत्व संपन्नतेला प्रोत्साहन न देता स्त्रियांची अवहेलना होणाऱ्या मूल्यहिन कार्यक्रमांनाच प्राधान्य देऊन प्रदर्शन करण्यात दूरदर्शन वाहिन्या धन्यता मानतात. जाहिरातीचा विचार केल्यास पुरूषांच्या बनियानीपासून ते दाढीच्या ब्लेडपर्यंत सर्वच जाहिरातीमध्ये स्त्रीही केंद्रबिंदू असते. दूरदर्शनवर तर इतर घटकांपेक्षा जाहिराती या घटकांवर स्त्रियांनाच अग्रक्रम दिला गेलेला दिसून येतो. एकंदरीत स्त्रियांच्या कार्य कर्तृत्वाला समाजासमोर मांडण्यापेक्षा नट–नटया आणि स्त्री मॉडेल्स यांच्या शरीर प्रदर्शनालाच महत्व देऊन ते समाजासमोर मांडले जाते. असे कां होते? याचा विचार केल्यास काही बाबी समोर येतात. दूरदर्शन किंवा पत्रकारितेचे मुख्य कर्तव्यच हे आहे की, लोकांसमोर सत्य आणि मार्गदर्शक माहिती मांडणे, मात्र विभिन्न व्यक्ति व संस्थाद्वारे निरनिराळया पातळयांवर दबाव येत असल्यामुळे त्यात कुणाचा वैयक्तिक स्वार्थ असतो, जर कुणाचा आर्थिक स्वार्थ, वैयक्तिक हेवे दाव्यांचाही यात समावेश होतो. अशावेळी सामाजिक घटनांकडे सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून पाहण्याची मानसिकता पत्रकारांची व दिग्दर्शकांची असली पाहिजे.

मानवाधिकार आयोगाद्वारे आपल्यावरील अन्याय दुर होईल व आपल्याला स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाचा अधिकार मिळेल या आशेने स्त्रिया या आयोगाकडे व शासनाकडे पहात आहेत. मात्र हुंडाबळी, अत्याचार, बलात्कार, शोषण, भ्रूणहत्या स्त्री समस्याकडे सरकारद्वारे नियंत्रणाचे प्रयत्न पाहिजे ज्या प्रमाणात झालेले दिसत नाही. प्रसारमाध्यमांवरही शासन स्वार्थी भावनेतून अंमल करतांना दिसून येते. अशावेळी शासन आणि प्रसारमाध्यमे हे या स्पर्धात्मक युगात, स्वार्थी दृष्टिने हात मिळवणी करत कार्य करतांना दिसतात. अशा प्रकारचे एक दुसऱ्याचे परस्पर हितसंबंध असल्यामुळे सत्य कथना ऐवजी, सत्य प्रदर्शनाऐवजी अर्धसत्यच लोकांसमोर मांडले जाते. अशावेळी प्रश्न असा निर्माण होतो की, मानवी मूल्यांची स्त्री, मूल्यांची जपणूक करण्यात प्रसा माध्यमे कितपत प्रामाणिक व उपयुक्त ठरतात? तेव्हा सामान्य लोकांचा या माध्यमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो व संशयाची भावना लोकांमध्ये निर्माण होते. आज बहुतांश वृत्तपत्रे कोणत्या ना कोणत्या राजकीय विचारप्रणालीशी बांधितल असतात आणि त्यावर राजकीय नेतृत्वाचे वर्चस्व असते. दुरदर्शनच्या नेल्यबाबतही हीच स्थिती आहे. अशा परिस्थितीत विशिष्ट स्वउपयोगी भूमिका घेऊनच प्रसारमाध्यमाद्वारे लोकांचे सामाजिककरण केले जाते. काही वर्तमानपत्रे ही तर पुर्णतः खाजगी मालकांची असतात अशा वेळी कित्येक सत्य घटनांची माहिती राजकीय पुढारी, धनाढय व शक्तीसंपन्न लोकांच्या दबावापुढे सत्य कथन समोर येत नाही. त्यामुळे स्त्री असो वा पुरूष यांच्या मानवाधिकारांची सातत्याने पायमल्ली होतांना दिसून येते. मानवी अधिकारांचे संरक्षण न होता पुर्वग्रह दुषित विचार प्रसार माध्यमांद्वारे व्यक्त होतांना दिसतात. त्यासाठी उपाय म्हणून प्रसारमाध्यमे हे निर्भिड व दबावमुक्त असले पाहिजे गलिच्छ राजकारणाला आणि बाजारीकरणाच्या प्रदर्शनाला संपुर्णतः आळा बसल्याच बंधन मुक्त स्वरूपाची प्रसार माध्यमे स्त्रियांच्या मानवाधिकाराचे संरक्षण करण्यास समर्थ होऊ शकतील. यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनाही समर्थपणे लढा देणे गरजेचे आहे. समाजाची मानसिकता बदलणेही गरजेचे आहे. मानवी हक्क आयोगाच्या स्त्री हक्कांना बळकटी आणण्यासाठी स्त्रियांनी जास्त सजग होणेही तितकेचे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**


1) नाटाणी प्रकाश नारायण, 'मानवाधिकार एवं कर्तव्य' जयपुरे.
2) गौतम, ओ. पी. 'हयुमन राईटस इन इंडिया'
3) ॲड. निमखेडकर हर्षवर्धन, 'मानवाधिकार आणि त्याचे उद्देश'
4) दाभोळकर नरेंद्र – साधना (साप्ताहिक) 6 मे 2000 रानवार पेठ, पुणे.
5) साने गिता – 'भारतीय जीवन', मोज प्रकाशन, मुंबई.
6) दक्षिणदास विनय, 'शिक्षण संक्रमण', (मासिक) प्रकाशक, पुणे.
7) Journal of the institute of human rights Vol. IV June 2001
8) करिम पंजवाणी, संयुक्त राष्ट्रसंघ व अशासकीय संघटना, 2007.

# मानवाधिकार : मूलगामी मूल्य आणि सद्यःस्थिती

**संदीप तुंडूरवार**, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**विषय मांडणी** : प्रसिध्द न्युरेनबर्ग खटल्यातील सरकारी वकील बेंजामीन बी फेरेक्स म्हणाले होते ''भूतकाळापेक्षा भविष्यकाळ अधिक उज्वल राहील याकरिता आंतरराष्ट्रीय कायदे विकसीत होणे आवश्यक आहे.''[1] (आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय, व्ही. एन. पेशवे, मंदाकिनी पेशवे, मानक पब्लिकेशन्स प्रा.लि. न्यु दिल्ली, प्र.आ. 2003, ISBN 81-7827-087-0, पृ.क्र. 1) या वक्तव्याची सद्याःच्या स्थितीत आठवण होणे हे अनेक संदर्भात गरजेचे आहे. जागतिक पटलावर सरते वर्षातील शेवटचा महिना व नव्या वर्षातील पहिल्याच महिन्यात 'मानवाधिकाराची मुस्कूटदाबी' झाली आणि त्यातून जगभरात सामान्य जनमानसाला मोठा मानसिक धक्का बसलेला आहे. तिनही घटनेतील साम्य म्हणजे जीवित व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची जाहिरपणे गळचेपी करण्यात आली या घटनेने जागतिक समुदाय सुन्न झालेला असून मानवाच्या अस्तित्वा संदर्भात व तिच्या भविष्याबद्दल चिंतीत झालेले आहे. एका बाजूला भविष्य सुवर्णमयी असू शकते असा आशावाद तर दुसऱ्या बाजूला वर्तमान मात्र 'रक्ताळलेला' या पार्श्वभूमीवर सहमतीचे कायदे व अनुकरण घडू शकेल काय? हा चिंतनिय प्रश्न घेऊन विषयाचे आंतरिक पदर उलगडावे लागेल. 7 जानेवारी 2015 ला पॅरिस येथील व्यंगरेषा लाल झाली. 'शार्ली एब्दो' या व्यंगचित्र साप्ताहिकावर दहशतवाद्यांनी हल्ला करून संपादकासह अन्य दोन व्यंगरेषाकाराची हत्या घडवून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला लातला. फ्रान्सने 1789 मध्ये मानवी मूल्यांची प्रस्थापना करतांना स्वातंत्र्य समता, बंधुत्वाचा उद्घोष करून मानवी सभ्यतेच्या वाटचालीत ठासीव पाऊलवाट निर्माण केली तिथेच आघात पोहचवून 'मानवी मूल्यांना' गतिरोध निर्माण केलेला आहे. राज्य निर्मितीच्या सिध्दांतात सामाजिक कराराची मांडणी करणारा रूसो, हॉब्ज, लॉक युरोपियन व्यवस्थेतून आलेले आहेत, त्यांच्या मांडणीत व्यक्ती प्रतिष्ठा प्राधान्याने असून व्यक्तीच्या करारातून राज्य निर्माण झाल्याचा ते उत्क्रांतीवादी सिध्दांत मांडतात याचा अर्थ मानवाने आपली सभ्यता चिरस्थायी करण्याकरिता राज्य अस्तित्वात आणले परंतु सद्यःस्थितीत धर्म राज्यव्यवस्थांच्या आणि मानवी व्यवस्थांच्या विषयाला कारणीभूत ठरू पाहत आहे याचा अर्थ धर्मरचना मानवाच्या सामाजिक कराराच्या रचनेला सुरूंग लावून व्यक्ती प्रतिष्ठा बाधित करीत आहे.

एका अंगाने विचार करता दहशतवादी यंत्रणा सभ्य व्यवस्थेला नष्ट करू पाहत आहे असे म्हणतानाच त्यांना स्वधर्माचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्वाचे वाटत असून त्यात येणाऱ्या अडथळयांना आम्ही दूर करतो या दूराभिमाने आणि अहंगडाने कृती करू लागल्याने 'मानवाधिकार' या संकल्पनेतील गुंतागुंत वाढू लागलेली आहे. फ्रान्स मधील उदाहरण भिन्न धर्मियावरील व विरोधी प्रवाहावरील हल्ला समजावयाचा झाल्यास एक प्रश्न अनुत्तरीत राहतो तो म्हणजे पाकिस्तानातील पेशावर मधील 'आर्मी स्कूल' वरील विद्यार्थ्यावर बेछूट गोळीबार करून दहशतवाद्यानी 138 शाळकरी मुलांना अतिशय जवळून ठार मारलेत. तर 10 जानेवारी 2015 ला नायजेरियातील मैदुगिरी भागात 'बोको हराम' या संघटनेने तब्बल 2000 आपल्याच नागरिकांचे शिरकान घडवून आणले. या दोन उदराहरणात धर्म रचना कशी लक्षात घ्यावी हा मुख्य प्रश्न निर्माण होतो. अन्य धर्मियांची टिका वा घृणा विरोधातून लक्षात घेतली जात असेल तर स्वधर्मियांकरीता कोणती फूटपट्टी लावून दहशतवादांच्या कार्याचे विश्लेषण करावे हा सद्यःस्थितीत उपस्थित झालेला भयावह प्रश्न आहे.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याकरिता अनेक अनामानी आजपर्यंत रक्त सांडवून भविष्यातील पिढयांची गळचेपीतून व हिंसेतून सूटका केली असली तरी मानवी व्यवस्थांच्या शांततामयी जीवनाचे प्रश्न आता उग्र बनू लागलेले आहेत. 'शार्ली इब्दो' या व्यंगचित्राचा संपादक रोलिंस्की यांनी मूलतत्ववाद्यांसमोर गुडघे टेकविणारा नाही अशी सुरूवातीपासून भूमिका घेतली एक तर फ्रान्समध्ये स्वातंत्र मूल्य आधिक्याने जपली जातात त्यामुळे सर्व प्रकारच्या टिका टिप्पणिंना त्यामध्ये वाव आहे. 1960 मध्ये जॉर्ज बेनियर व फ्रॅकाईस कॅव्हान यांनी 'हाराकिरी' या नावाने हे साप्ताहिक सुरू केले त्यावेळी एका वाचकाने याचे वर्णन 'डम्ब ॲन्ड नॅस्टी' असे केले होते. तेव्हापासूनच या साप्ताहिकाने जनमानसात आपला जम बसवून आंतरिक इच्छांना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याची किंमत जीविताच्या रूपाने संपादक व अन्य दोन व्यंगचित्रकारांना मोजावी लागली. गेल्या वर्षभरात अनेक धमक्या आल्यानंतरही माघार न घेता अभिव्यक्ती स्वातंत्र्य जोपासत मानवी हक्काप्रती आपली बांधिलकी कायम ठेवली. संपादक बोलन्सी यांनी या संदर्भात मत व्यक्त करताना म्हटले होते ''मला कशाचीही भीती वाटत नाही, कारण मला बायको–मुलं नाहीत, वाहन नाही, आर्थिक पतही नाही. मात्र, गुडघे टेकून जगण्यापेक्षा ताठ मानेन मरण पत्करणे मी पंसद करेन'' त्यांच्या या भावनेमध्ये स्वप्रतिष्ठा सामावलेली असून व्यक्तींना मार्गदर्शक आहे. व्यक्ती प्रतिष्ठेमध्ये सन्मानाने जीवन जगणे हे अभिप्रेत आहे.

फ्रान्सच्या 1789 च्या जाहिरनाम्यानुसार मानवाचे अधिकार हे नैसर्गिक व अदेय असतात आणि नागरिकांचे अधिकार सकारात्मक असतात असे म्हटले आहे. ''मानवाच्या मूलभूत अधिकाराच्या कल्पनेच्या विकासात नैसर्गिक सिध्दांताच्या संकल्पनेने (Theory of Natural Rights) सर्व श्रेष्ठ व प्रमुख भूमिका बजावलेली आहे. या पृथ्वीवरील राज्याची व्यक्तींच्या संदर्भात असलेली शक्ती ही सकारात्मक कायद्यामुळे मर्यादित झालेली आहे. या सकारात्मक कायद्याच्या मर्यादित झालेली आहे. या सकारात्मक कायद्याच्या पाठिशी निसर्ग नियमांचा सिध्दांत आहे, असे स्ट्रॉईक, ग्रिक व सिसेरो सह रोमन तत्वनेत्यांनी व कालांतराने ख्रिश्चन धर्मगुरूनी मान्य केले.[2] (सिमोत्तर दहशतवाद व मानवाधिकार सृजनावरील उपाय, व्ही. एम. पेशवे, सौ मंदाकिनी पेशव मानव पब्लिकेशन्स प्रा.लि. दिल्ली, 1998, पृ.क्र. 11 )

## मूलगामी मूल्य

मानवाधिकाराच्या सिध्दांतानुसार ''सर्व मानवांना किमान चांगले जीवन जगता यावे. याकरिता आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचा एक समान आकृतीबंध निश्चित केला जावा. मानवाधिकार नागरिकांच्या हातातील प्रभावी शस्त्र आहे. ज्यामुळे प्रश्न विचारता येतात.''[3] (कित्ता, पृ.क्र. 2) दोन जागतिक महायुध्दानंतर मानवी अधिकाराचा प्रश्न प्रामुख्याने चर्चीला घेतल्या गेल्या. 24 ऑक्टो. 1945 मध्ये जागतिक संयुक्त राष्ट्रसंघटना उदयास आली. त्यासोबतच मानवी हिताच्या दृष्टिने इलोन्हार रूझव्हेल्ट यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून मानवाधिकारांचा प्रश्न प्राधान्याने हाताळल्या गेला. यामधूनच 10 डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेने मानवाधिकारांचा जाहिरनामा घोषित केला. त्यातील विभिन्न कलमांच्या अनुषंगाने हनन होणाऱ्या नागरिकांचे हक्क अबाधित राखल्या गेले. मानवी चळळींना विस्तार मिळू लागल्यानंतरच 'अमेस्टी इंटरनॅशनल संस्था' उदयास आल्यात आणि त्या त्या देशातील राज्यकर्त्यांच्या धोरण निर्णय आणि वर्तणूक यावर वचक ठेवण्यास सुरूवात झाली. जगभरातील माणसांच्या शिरकावाचा अहवाल ही संस्था तयार करू लागल्यानंतर लोकशाही वा साम्यवादी अथवा सर्वकषतंत्रात वावरणााऱ्या राज्य मनोवृत्तीचा बुरखा फाडून जनतेसमोर येऊ लागला.

मानवी क्षेत्रात कार्य करणाऱ्या चळवळींना बळ मिळू लागल्यानंतर जगभरात सर्वदूरच आपली दखल घेणारी यंत्रणा आहे, हा विश्वास पटू लागल्यानंतर शोषित समुदाय आपल्या आक्रंदित भावनांना व्यक्त करू लागले ही चळवळींची मोठी उपलब्धता होती. शितयुध्दाचा कालखंडाचे राजकीय सत्तांच्या उद्दामपणावर बऱ्यापैकी विभिन्न संस्थाचे नियंत्रण होते. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर मात्र

जगभरातच अनागोंदी कारभाराला आणि वेगवेगळया पातळीवरून हक्कांचे हनन होण्यास सुरूवात झाली. त्यातूनच नवे प्रश्न उद्‌भवू लागलेली दिसून येते. वस्तुतः मानवी सभ्यतेच्या इतिहास निर्मितीचा कालखंड गेल्या दहा सहस्त्रकात दिसून येतो. मुख्यत्वे मानवी वसाहत आढळणाऱ्या पृथ्वीग्रहाची निर्मिती मात्र 489 लक्षापूर्वीची आहे. त्या तुलनेत मानवी व्यवस्था निर्मिती एकूण कालखंडाच्या पळभर आहे, असे असतांना वेगवेगळया कारणामुळे माणूस नावाच्या व्यवस्थेचे शोषण होत असून लिंगभेदातील शोषण सर्वाधिक आहे. दोन महायुध्दानंतर दोन विचारावर संघर्ष उद्‌भवलेला होता तर शितयुध्दाच्या समाप्तीनंतर धर्म व्यवस्थेच्या उद्रेकामध्ये हनन होण्याची रचना तयार झालेली आहे. शतकभराचा कालखंड अजूनही पूरता झालेला नसतांना व्यक्तीची प्रतिष्ठा धोक्यात आलेली आहे. वास्तविकतः असे म्हटल्या गेले होते की, धर्मभेद, वंशभेद, रंगभेद, लिंगभेद, इ चा विचार न करता मानवीय व्यक्तिमत्वाचा आदर करणे हा परंपरागत निकष होय. मानवाधिकार म्हणजे हे असे मूलभूत अधिकार आहेत जे प्रत्येक स्त्री व पुरूषाला ते 'मानव' आहेत म्हणून मिळालेले असतात व ते अधिकार जगातल्या कोणत्याही भागात वास्तव्य करणाऱ्या स्त्री–पुरूशांना मानव म्हणून जन्माला आल्यामुळेच मिळालेले असतात.''[4] (कित्ता पृ.क्र. 7) मानवाधिकारांचे मूलगामी मूल्य म्हणून या विवेचनाचा विचार करता येतो परंतु आजही जग या विचारातील एका मूल्यापर्यंत पूर्णपणे पोहचू शकले नाही त्यामुळे ही वाटचाल पुढील कालखंडात कायमच राहील हे स्पष्ट होते.

**विषय समारोप**

मानवाधिकारांची चळवळ जागतिक पृष्ठभूमीवर उदयास आल्यानंतर भारतात बऱ्यापैकी जागरूकता येऊ लागली. तत्पूर्वी ब्रिटीश कालखंडात प्रबोधन युगाचा प्रारंभ झाल्यानंतर माणूस व्यवस्था या शब्दाचा विचार पहिल्या पातळीवर होऊ लागला. भारतातील समाजसुधारकांनी अनंत हाल सोसत जाती रचनेतील सर्वापर्यंत हक्क पोहचविण्याचा प्रयत्न केला भारताचे संविधान हे त्याचे उत्कृष्ठ उदाहरण आहे. असे असले तरी भारतातील काही धुरिणांना भारतात भातृत्वाची भावना खोलवर रूजलेली होती असे वाटते. डॉ. एस एस. आर. रेड्‌डी यांनी मांडणी करतांना म्हटले, शांतता, मैत्री, समता, मानव जातीबाबत आदर व सन्मान यांची सांगड घालणाऱ्या भारतीय परंपरेने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला प्रोत्साहन दिले हया परंपरेमुळेच सर्व वर्गातील, खेडयातील, शहरातील, महानगरातील सर्वच लोक स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले आपली स्वातंत्र्य चळवळ म्हणजे मूलभूत मानवाधिकार प्राप्तीसाठी जनतेने केलेली चळवळ होय.''[5] (Fundamentalness of fundamental Rights and directive principles in the Indian Constitution" S.S.R. Reddy, Journal of the Indian Law Institute, Vol. 22, 1980, Page No. 399-407) भारतातील वा जगभरातील मानवी हक्कांची स्थिती अभ्यासल्यास मुळातूनच अधिकारांना अनुकूल भूमी तयार झालेली आहे असे म्हणता येत नाही. भारतात दलित समुदायातील आणि महिलांप्रती भावना अजूनही निकृष्ठ व भोगवादी या स्वरूपातील आहे. पुरूष केंद्रीत व्यवस्था आणि वर्णव्यवस्था परस्परांच्या हातात हात घालून काम करतांना दिसतात. पाश्चिमात्य समूदाय वा अरबी समूदाय येथील ही स्थिती वेगळी नाही. संदर्भ आणि माध्यमे मात्र वेगळी आहे. एवढेच त्यामुळे सद्यःस्थितीतील घटना लक्षात घेतल्यास अजूनही येथील 'माणूस रचना' मातृत्वाच्या पातळीवर आलेली नाही. अन्यथा या एका महिन्यातील घटनांनी वातावरण चिताक्रांत बनविले नसते. व्यक्तीची प्रतिष्ठा निर्माण करण्याकरीता भातृत्वाची गरज आहे आणि भातृत्व तेव्हाच निर्माण होईल जेव्हा सहदृयता आकार घेईल. गांधीचा विश्वास हृदय परिवर्तनावर होता त्यांनी दोनदा हा प्रयोग यशस्वी करून दाखविला. एक द. आफ्रिकेत व दुसरा प्रयोग भारतात. गांधी हृदय परिवर्तनाच्या संदर्भात मात्र एक बाब प्रकर्षाने नोंदवित होते ती म्हणजे हृदय परिवर्तन होण्याकरीता शत्रू मन विचारशील असावे लागते. एका अर्थाने क्रूर ब्रिटीश विचारशील ठरले तर त्यांची हत्या करणारा भारतीय विचारशील ठरला नाही. गांधी नावाच्या माणसाचे तत्व भारतीयांना मानवी संदर्भात महत्वाचे वाटले नाही परंतु मार्टिन ल्युमर किंग, ज्यु. मार्टिन ल्युमर किंग, नेल्सन मंडेला, ऑन सॉ ब्रू की यांना मात्र ते उमगले व वैश्विक पातळीवर मानवी हक्काचा लढा दखलपात्र ठरला त्या लढयातूनच विद्यमान परिस्थिती हातळण्याचे कौशल्य निर्माण करता येते. परंतु त्याकरिता उमद्या विचारांची व त्राण न गमविणाऱ्या मनोरचनाची आत्यंतिक गरज आहे. अन्यथा माणूस समूदाय सांस्कृतिक प्रक्रियेच्या ऱ्हासाकडे वाटचाल करू लागेल.

तळटिपा

1 आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय, व्ही. एन. पेशवे, मंदाकिनी पेशवे, मानक पब्लिकेशन्स प्रा.लि. न्यु दिल्ली, प्र.आ. 2003, ISBN 81-7827-087-0, पृ.क्र. 1

2 सिमोत्तर दहशतवाद व मानवाधिकार सृजनावरील उपाय, व्ही. एम. पेशवे, सौ मंदाकिनी पेशव मानव पब्लिकेशन्स प्रा.लि. दिल्ली, 1998, पृ.क्र. 11

3 कित्ता, पृ.क्र. 2

4 कित्ता पृ.क्र. 7

5 Fundamentalness of fundamental Rights and directive principles in the Indian Constitution" S.S.R. Reddy, Journal of the Indian Law Institute, Vol. 22, 1980, Page No. 399-407

# वेगळया विदर्भाची अपरिहार्यता : एक अवलोकनात्मक विश्लेषण

**कु. कोमल मोरेश्वर ढगे.** एम.ए. (राज्यशास्त्र) बिंझाणी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर

प्रदिर्घ प्राचीन असा गौरवशाली इतिहास लाभलेला 'विदर्भ' आपल्या स्वतंत्र अस्तित्वाची मागणी मागील कित्येक दशकांपासून करतोय. या मागणीला वैदर्भिय जनता सातत्याने शासनासमोर मांडत असते. नुकत्याच पार पडलेल्या 2015 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतपेटीतून प्रतिसाद देत वैदर्भिय जनतेने वेगळया स्वायत्त विदर्भ राज्याप्रति शिक्कामोर्तब करत वेगळा विदर्भ या बाबतची मागणी प्रबळपणे व्यक्त केली. यातून वेगळया विदर्भाकरिता आजही वैदर्भिय जनता आग्रही असल्याचे स्पष्ट झाले. या मागणीचा विचार करता ही मागणी केवळ सद्यःस्थितीतीलच नाही तर स्वतंत्र भारताची घोषणा होण्यापूर्वी आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी ते आजपर्यंत संपूर्ण विदर्भातील विदर्भप्रेमी व विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून विचार करणारी प्रतिष्ठित मंडळी सातत्याने मांडत आहे. अशा या विदर्भातील व्यक्तिंच्या अस्तित्वाचा तसेच राजकीय इच्छाशक्ती अभावी दुर्लक्षित विषय असलेल्या त्यांच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी योग्यरित्या लक्षात घेणे गरजेचे आहे म्हणून विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विभिन्न आयोगाच्या माध्यमातून झालेली स्वतंत्र विदर्भ राज्याची वाटचाल तसेच चळवळीचे सद्यःस्थितीतील आकलन इ. मुद्यांची चिकित्सा करणे व त्यातून वेगळया विदर्भाची अपरिहार्यता स्पष्ट करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

**विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी.** विदर्भाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करता विदर्भ प्रांत हा राजकीयदृष्टया वऱ्हाड व नाग–प्रदेश या प्रकरणात विभाजित होता. वऱ्हाडला 'बेरार' असे म्हणत व या वऱ्हाडात बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ हया चार जिल्हयांचा समावेश होता आणि नाग–प्रदेशात नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा व भंडारा या जिल्हयाचा समावेश होता. असा हा वऱ्हाड व नागप्रदेश मिळून बनलेला विदर्भ कृष्णाच्या काळाच्या पूर्वीपासून एक वेगळा राज्यप्रदेश म्हणून अस्तित्वात होता. 1802 पूर्वी वऱ्हाड हा भोसल्यांचा पराभव करून वऱ्हाड भोसल्यांकडून जिंकून मित्र निजाम यास बक्षिस म्हणून दिला. पुढे तैनाती फौजेच्या कायद्याअंतर्गत राजस्व अधिकार इंग्रजांनी स्वतःकडे घेतला मात्र कायदेशीर अधिकार निजामाकडे ठेवण्यात आले.[1] नाग–प्रदेश देखील भोसल्यांच्या ताब्यात होता. असा हा प्राचीन ऐतिहासिक वैशिष्टयांनी युक्त असलेला विदर्भ सद्यःस्थितीत महाराष्ट्राचा एक महत्वपूर्ण घटक प्रदेश आहे.

डॉ. नि. आ. वक्काणी यांच्या मते, 'अजून समग्र मानवसमाज विकासाच्या पूर्ण अवस्थेपर्यंत पोचू शकला नाही. मानव समाजाचे काही गट अर्धविकसित अवस्थेत आहेत. काही गटांना आपल्या कर्तृत्वाची चमक दाखविण्यास योग्य अशी संधी लाभली नाही, तर काही गटांजवळ पर्याप्त कर्तृत्व असुनही तो योग्य प्रमाणात प्रकाशात आलेला नाही, विरदर्भ हा असाच एक भूभाग आहे. विदर्भाजवळ कर्तृत्वशक्ती निश्चितच आहे पण त्याला सर्वांगीण अनुकुलता प्राप्त झाली नाही, जेणेकरून त्याचे कर्तृत्व–कमल पूर्णपणे विकसित व्हावे अशी तक्रार आहे. तरी देखील विदर्भाचे कर्तृत्व अगदी निद्रिस्त राहिले नाही. त्याचे आपल्या कर्तृत्वाची चमक दाखविली आहे.[2] व या कर्तृत्वाच्या माध्यमातून विदर्भातील जनतेने वेळोवेळी शासनाच्या त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायपूर्ण वागणुकीला उत्तर दिले आहे. तसेच आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला विविध मागण्यांच्या माध्यमातून शासनकर्त्यासमोर मांडले आहे. प्रसंगी आंदोलनाच्या स्वरूपात त्या पुढे आल्या आहेत. या पैकी एक महत्वपूर्ण आंदोलन म्हणजे 'महाविदर्भ आंदोलन' होय.

महाविदर्भ आंदोलनाच्या मागणीमध्ये कुठल्याही प्रकारचे राजकीय आंदोलन व राजकारण नसून या मागणीकर्त्याच्या मते विदर्भ हे एक पृथक घटकराज्यापूर्वी होते व आता ते होवू शकते आणि तशी त्याची योग्यता व क्षमता आहे. या दृष्टीकोनातून महाविदर्भ आंदोलन सुरू झाले. या आंदोलनाच्या मुळ कारणांचा विचार करता, विदर्भातील वऱ्हाड या प्रातांला भोसल्यांकडून विजय प्रस्थापित करून इंग्रजांनी नवाबाला बक्षिस म्हणून भेट दिला. 5 नोव्हेंबर 1902 रोजी हैदराबादच्या नवाबाने वऱ्हाड नेहमीसाठी ब्रिटिशांना देऊन टाकला व ब्रिटिशांनी त्याला मध्यप्रांताला जोडून दिला. हेच महाविदर्भ आंदोलनाचे खरे मुळे आहे.[3] 1 ऑक्टोंबर 1903 पासुन मध्यप्रांताला वऱ्हाड जोडण्यात आला व नविन प्रातांचे नामाभिधान प्राप्त आणि वऱ्हाड (Central Provinces and Berar) असे करण्यात आले. नागपूर ही या प्रांताची राजधानी असुन यात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, अकोला, वाशीम, अमरावती आणि बुलढाणा या अकरा जिल्हयांचा समावेश होता.

वऱ्हाड प्रांत हा मध्यप्रांताला जोडल्यामुळे वऱ्हाडात या विरोधात तीव्र आंदोलन झाले. या आंदोलनाचे नेतृत्व दादासाहेब खापर्डे (गणेश श्रीकृष्ण खापर्डे) यांनी केले. खापर्डे यांनी 'वऱ्हाड व मध्यप्रांत' युतीचा स्पष्ट विरोध केला. वऱ्हाडला प्रगतीशील मुंबई प्रांताशी जो मराठी भाषी प्रांत आहे. जोडण्यात यावा अशी इच्छा व्यक्त केली. परंतु ब्रिटिश शासनाने याकडे लक्ष दिले नाही. मध्यप्रांताला वऱ्हाड जोडल्यानंतर वऱ्हाडचा विकास होऊ शकला नाही. संपन्न असलेल्या वऱ्हाड प्रांताला सोन्याची कुऱ्हाड म्हणत असत व या संपन्नतेचा व त्यातून मिळणाऱ्या महसुलाचा फायदा मध्यप्रांताला प्रगत करण्याकरिता होऊ लागला. वऱ्हाडवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात विरोधक आपल्या मागण्या मांडू लागलेत व यातून एक महत्वपूर्ण परिणाम झाला. पूर्वीपासुन हिंदीभाषी मध्यप्रांतात असलेला नागप्रदेश व वऱ्हाड हे दोन्ही एकाच भाषेचे व एकाच संस्कृतिचे भूप्रदेश एकत्र जोडण्यात आले व या दोन्ही भूभागाचे पुढारी संयुक्तपणे जनजागृती करू लागले. इ.स. 1937 पर्यंत वऱ्हाडच्या बुलढाणा, अकोला, अमरावती या चार जिल्हयांचे वेगळे घटकराज्य बनविण्यात यावे अशी वऱ्हाडवासियांची तीव्र मागणी होती पण ही मागणी पूर्ण झाली नाही. म्हणून ही मागणी प्रबळपणे रेखाटण्यासाठी त्यावेळच्या आठ जिल्हयांच्या विदर्भाला मध्यप्रांतापासून वेगळा करण्याचा विचार समोर आला त्या आठ जिल्हयांमध्ये बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर व भंडारा हया आठ जिल्हयाचा समावेश होता. या विचरातूनच, 1938 मध्ये बॅरिस्टर रामराव देशमुख यांनी मराठी भाषिक प्रदेशाचा 'विदर्भ' या नावाने स्वतंत्र प्रदेश बनविण्यात यावा अशी मागणी करणारा ठराव मध्यप्रदेशाच्या विधीमंडळात मांडला व 1 ऑक्टोबर 1938 रोजी मध्यप्रांत व वऱ्हाड कौन्सिलमध्ये बॅ. रामराव देशमुख यांचा मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये असलेला मराठी भाषा बोलणाऱ्यांच्या प्रदेशाला (आठ जिल्हयाचा विदर्भ) वेग्हा प्रांत बनविण्यात यावा हा ठराव पारित झाला.[4] यातुनच महाविदर्भ प्रदेशाच्या स्वायत्त राज्य या कल्पनेचा जन्म झाला. वऱ्हाड ऐवजी 'वऱ्हाड व नागप्रदेश' या दोहोंचा 'संयुक्त विदर्भ' करावा ही मागणी कायदेशीररित्या समोर आली. विदर्भाऐवजी 'महाविदर्भ' असा शब्द मांडण्यात आला. पण व्यावहारिक दृष्टीने तो सफल घटकराज्य होईल की नाही यावर विचार–विमर्श करण्यासाठी 'यवतमाळ डिस्ट्रीक्ट असोसिएशन' ने लोकनायक बापूनी अणे यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नियुक्त केली. त्या समितीने अभ्यास करून महाविदर्भ एक स्वयंपूर्ण व सफल राज्य होईल असा निर्णय दिला. यातुन सर्वत्र उत्साहाचे वातावरण संचारले व लोकनायक अणे यांनी इ.स. 1939–40 मध्ये नाग–प्रदेश व वऱ्हाड या दोन्ही भू–भागात जागोजागी भाषणे देवून कमालीची जनजागृती केली. तसेच महाविदर्भ प्रांत हा वेगळा व्हावा या दृष्टीने प्रचार–प्रसार करण्यासाठी 18 ऑगस्ट 1940 रोजी बॅ. रामराव देशमुख, यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभा या नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली.[5] यातून हळूहळू महाविदर्भ आंदोलनाने गती घेतली व महाविदर्भ एक स्वयंपूर्ण राज्य होवू शकते असा प्रचार जोरात सुरू झाला.

महाविदर्भ सभा स्थापन करते वेळी सर्वानुमते एक ठराव पारित करण्यात आला होता. त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीस मदत करणे हे उद्दिष्ट समाविष्ट करण्यात आले होते. स्वतः महाविदर्भ सभेचे बॅरिस्टर देशमुख यांनीही विदर्भाच्या मागणीचे वर्णन 'महाराष्ट्र राज्य एकीकरणाची पहिली पायरी म्हणूनच केले होते. इ.स. 1943 च्या अमरावती येथील महाविदर्भ सभेच्या दुसऱ्या अधिवेशनात अध्यक्षस्थान भूषविलेले बॅ0 जयकर यांनीही आपल्या भाषणातून महाराष्ट्र एकीकरण चळवळीस पूर्ण पाठिंबा दर्शवून स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला त्या चळवळीचाच एक भाग असल्याचे प्रतिपादन केले होते.

एका बाजूला स्वतंत्र विदर्भ राज्याचा बिगुल फुंकल्या जात होता तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचा एकत्रित भाग म्हणून विदर्भ स्वतंत्र नसावा असा विचार मुंबई व प. महाराष्ट्र या पातळीवर होत होता. यातुनच पुढे विदर्भाच्या संदर्भातील कराराची निर्मिती होऊ लागली. यामधील अकोला व नागपूर करार महत्वपूर्ण मानला जातो.

**अकोला करार (8 ऑगस्ट 1947)** शंकरराव देव, शेषराव वानखेडे, बापूजी अणे, पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील, पूनमचंद रांका, रामराव देशमुख, दा. वि. गोखले, द. वा. पोतदार, धनंजयराव गाडगीळ, ब्रिजलाल बियाणी, गोपाळराव खेडकर, प्रमिला ओक, गं. त्र्यं. माडखोलकर व जी. आर. कुलकर्णी या 16 जणांनी अकोला शहरात 7 व 8 ऑगस्टला वाटाघाटी करून करार केला तो अकोला करार म्हणून ओळखला जातो. त्यातील कलमे पुढीलप्रमाणे–

- 'संयुक्त महाराष्ट्राचा एका प्रांतात महाविदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र असे दोन प्रांत असावेत.'
- त्या दोन प्रांतांना स्वतंत्र कायदे मंडळे व मंत्रिमंडळे द्यावीत.
- उपप्रांतासाठी दोन वरिष्ठ न्यायालये स्थापन करावीत.
- उपप्रांताच्या कायदे मंडळाच्या निवडणुका स्वतंत्रपणे घ्याव्यात.
- संपूर्ण प्रांतासाठी एक गर्व्हनर व दुय्यम गर्व्हनर असावा आणि एक लोकसेवा आयोग असावा.[6]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संविधानसभेने 1948 मध्ये श्री. दार यांच्या नेतृत्वात भाषिक राज्य समितीची स्थापना करण्यात आली व या समितीने डिसेंबर महिन्यात याच वर्षी आपला अहवाल सादर करीत म्हटले की, भाषिक राज्याची कल्पना जनतेमध्ये पक्की जरी झाली असली तरी सद्यःस्थितीतील परिस्थिती लक्षात घेता भाषिक राज्यावर लक्ष देणे योग्य ठरणार नसल्याचे मत मांडले. या समितीच्या अहवालावर देशस्तरावर मोठा विरोध झाला व या विरोधाची तीव्रता कमी करण्यासाठी जे.व्ही.पी. आयोग नेमण्यात आला या आयोगात पंडित नेहरू, वल्लभभाई पटेल, पट्टाभी सितारामय्या यांचा समावेश होता. या आयोगानेही दार समितीच्या अहवालाप्रमाणेच भाषावार प्रांतरचनेला विरोध दर्शविला मात्र या विरोधाला न जुमानता श्री पोट्टी श्रीरामलू यांनी स्वतंत्र आंध्रपदेशची तेलगू भाषिक राज्य म्हणून निर्मिती करिता आमरण उपोषण केले व त्यात बलीदान दिले यातून दंगे उसळून प्रथम भाषिक राज्य 1953 मध्ये तेलगु भाषिक राज्य म्हणून आंध्रपद्रेशची निर्मिती झाली.[7] या भाषिक राज्यनिर्मितीनंतर मराठी भाषिक राज्याचा प्रश्न समोर ठेवत स्वामी रामानंद तीर्थ हे संयुक्त महाराष्ट्राची मागणी वारंवार करत होते. याचवेळी अणे व बियाणी यांनी सवतंत्र विदर्भाची मागणी उचलून धरली. त्यास प्रतिशह देण्यासाठी म्हणून तिन्ही विभागातील (विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा) मराठी माणसे एकत्र आणून नागपूर येथे बैठका झाल्यात व ज्यातून नव्या महाराष्ट्राची निर्मिती झाली तो करार म्हणजे 'नागपूर करार' होय. या करारातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे–

**नागपूर करार – 22 सप्टेंबर 1953.** भारतातील राज्यांची नव्याने स्थापना व पुर्नरचना करण्याच्या प्रश्नावर अहवाल देण्यासाठी एका उच्चधिकार आयोगाची नेमणूक करण्यात आली व या आयोगाने मराठी भाषिक राज्य स्थापन करण्याच्या दृष्टीने खालील निर्णय घेतले.

- मुंबई, मध्यप्रदेश व हैदराबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून महाराष्ट्र राज्य स्थापन केले जावे.
- या राज्याच्या सिमेत व मर्यादेत कोणत्याही भागाचे वेगळे अस्तित्व राहू नये.
- त्या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश म्हटले जाईल व मुंबई ही त्याची राजधानी असेल.
- या राज्याचे विकास व प्रशासनासाठी महाविदर्भ मराठवाडा व राज्याचा बाकीचा भाग असे तीन विभाग असतील.
- लोकसंख्येच्या प्रमाणात विविध प्रदेशांवर गरजेनुसार खर्च केल्या जाईल परंतु मराठवाडयाची अविकसित स्थिती लक्षात घेता या विभागाकडे विशेष लक्ष दिल्या जाईल.
- सरकारच्या रचनेत त्या त्या विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान राहील.
- शिक्षण संस्थांमध्ये त्या विभागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य व समान संधी उपलब्ध करून देण्याची हमी देण्यात आली.
- या नव्या राज्याच्या मुख्य न्यायालयाचे मुख्य पीठ मुंबई येथे तर दुसरे पीठ नागपूर येथे असेल.
- त्या–त्या विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात सरकारी किंवा सहकारी नियंत्रणाखाली असलेल्या संस्थामध्ये नोकऱ्या दिल्या जाईल.
- विकेंद्रिकरणाला प्रशासनात महत्वपूर्ण स्थान दिल्या जाईल.
- विधानसभेचे वर्षातील एक अधिवेशन नागपूरमध्ये घेतले जाईल व निश्चित काळासाठी सरकार तथे हलवले जाईल.
- सर्व मराठी भाषिकांना राज्यात सामावून घेण्यासाठी खेडे हा घटक धरून ताज्या जनगणनेनुसार जिल्हयांच्या सीमा आखल्या जातील.[8]या ऐतिहासिक कराराद्वारे विदर्भ भषिक राज्यांत सामील होण्याचे अभिवचन देण्यात आले होते. भाषावार पुर्नरचनेचा प्रश्न तसेच राज्यांच्या फेररचनेचा समग्र प्रश्न सखोल अभ्यास करून सोडविण्याकरिता डिसेंबर 1953 मध्ये 'राज्य पुर्नरचना आयोग' (State Re-organisation Committee) ची स्थापना सय्यद फजल अली यांच्या नेतृत्वात करण्यात आली. 30 सप्टेंबर 1953 रोजीच्या फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली के.एम. पाणिक्कर व हृदयनाथ कुंझरू हे दोन सदस्य असलेल्या या आयोगाने आपला अहवाल सादर केला. यावेळी विदर्भातील लोकमत विदर्भाचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे या मताचे होते. याचा विचार करून राज्यपुर्नरचना आयोगाच्या अहवालात स्वतंत्र विदर्भात मान्यता देण्यात आली होती. या आयोगातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे–

**राज्य–पुर्नरचना आयोग (डिसेंबर 1953)**

- विदर्भ प्रदेशातील अनेक प्रमुख नेत्यांचे मत महाराष्ट्रात सामील होण्यासाठी अनुकूल नसून विदर्भाचा स्वतंत्र प्रांत असावा असे आहे.
- विदर्भ शिलकी राज्य होईल आणि मुंबई वगळता महाराष्ट्र हे तुटीचे राज्य असल्याने येथील लोकांना भीती वाटते की, येथील संपूर्ण पैसा येथील लोकांवर खर्च होणार नाही.
- मुंबई जर महाराष्ट्रात सामील झाल्यास महाराष्ट्र राज्य तुटीचा प्रांत राहणार नाही. मग विदर्भासह मुंबई प्रांतात सामील करावयास हरकत नाही परंतु मुंबई महाराष्ट्रात सामील करावी अशी आमची शिफारस नाही.
- विदर्भ जर महाराष्ट्रात सामील झाला तर प्रांतात जातीयता वाढेल अशी विदर्भातील लोकांना भीती वाटत आहे.

वरील सर्व कारणांचा विचार करता फाजल अली आयोगाने वेगळया विदर्भ राज्याची शिफारस केली होती. त्याचप्रमाणे मध्यप्रदेशच्या तुलनेत विदर्भात मोठया प्रमाणात औद्योगिकरण झाले होते व कापसाची मोठी बाजारपेठ विदर्भात असल्या कारणाने सुतगिरण्यांना येथूनच कापूस मिळेल आणि त्या बळावर औद्योगिकदृष्टया अधिक सक्षमपणे उभा राहू शकेल असा निष्कर्ष राज्य–पुर्नरचना आयोगाने काढला होता. महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या द्वैभाषिक राज्याची शिफारस या आयोगाने केली होती. परंतु या आयोगाच्या वेगळया विदर्भाच्या शिफारशीकडे दुर्लक्ष करीत शंकरराव देव यांच्यासारख्या नेत्यांनी मराठी भाषिकांचे बहुमत वाढविण्यासाठी विदर्भाचा द्वैभाषिक राज्यात समावेश करावा असा आग्रह धरला होता. या आग्रहाला स्वीकृती देऊन कॉग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी इ.स. 1956 मध्ये विदर्भासहित महाराष्ट्र व सौराष्ट्रासह गुजरात यांचे एक महाद्वैभाषिक राज्य निर्माण करण्यात आले.

राज्यपुर्नरचना आयोगाच्या या शिफारशींना राज्यभर तीव्र विरोध झाला. महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या इच्छेविरूध्द महाद्विभाषिक राज्य त्यांच्यावर लादण्यात आले. महाद्विभाषिक राज्याला विरोध म्हणून संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची मागणी मांडण्याकरिता संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहून महाराष्ट्रभर उग्र आंदोलने होऊ लागलीत. शेवटी केंद्रिय नेतृत्वाने संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करत. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र या मराठी भाषीक राज्याचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उदघाटन झाले. त्यावेळी मुंबई विभाग, पुणे विभाग, नागपूर विभाग व औरंगाबाद विभाग असे चार विभाग होते. या चारही विभागात एकूण सव्वीस जिल्हे समाविष्ठ होते. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवेळी एक मात्र निदर्शनास येते की यात विदर्भ स्वायत्तपूर्ण असे स्वतंत्र राज्य व्हावे याकरिता पुढाऱ्यांमध्ये फारसे एकमत नव्हते. परंतु त्यांना विदर्भाचे महाराष्ट्रात सामिलीकरण मान्य झाले नाही त्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी आंदोलन उभे केले व आपली मागणी स्पष्टपणे मांडली. लोकनायक बापूजी अणे हे त्यांचे पुढारी बनले. सुरूवातीला या आंदोलनास विदर्भातील सुशिक्षित व विदर्भप्रेमींचा पाठिंबा होता. परंतु ज्याप्रमाणे महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जसे जनआंदोलन व जनतेचा सहभाग लाभला तसे वातावरण मात्र 'वेगळा विदर्भ' या आंदोलनाला मिळू शकले नाही. 1960 मध्ये महाराष्ट्र निर्मितीचे विधेयक प्रस्तुत करतांना यशवंतराव चव्हान यांनी वैदर्भिय जनतेला आश्वासन देत म्हटल आहे की,....''नागपूर करारातील तरतूदींचे पालन तर करूच परंतु येथे शक्य असेल तेथे त्याही पेक्षा जास्त देवू...'' हे यशवंतराव चव्हाण यांचे आश्वासन आज केवळ राजकीय उदाहरण म्हणून अस्तित्वात आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर अगदी सुरूवातीपासुचन विदर्भातील जनतेच्या इच्छा–आकांक्षा व त्यांच्या विकासात्मक दृष्टीकोनातून विचार न करता, त्याकडे दुर्लक्ष केले गेले. वसंतराव नाईक यांनी देखील प्रादेशिक विकासाचा आग्रह करत जिल्हा हाच विकासाचा घटक माणून ऑगस्ट 1969 रोजी ऐतिहासिक नागपूर करार गुंडाळून ठेवला. जाबुंतराव धोटेचे देखील स्वतंत्र विदर्भाबाबतचे प्रयत्न व्यर्थ ठरले. त्यानंतरच्या काळात केवळ विधानसभा, लोकसभा निवडणुकीच्या वेळी वेगळया विदर्भाच्या मुद्याला राजकारणी, राजकीय नेते केवळ स्वार्थ प्राप्तीकरीता उचलून धरत असतात परंतु या मागणीकडे त्यांनी दुर्लक्ष केलेले जाणवते.

**चळवळीचे सद्यःस्थितीतील आकलन..**वेगळा विदर्भ चळवळीचे सद्यःस्थितीतील आकलन करताना एक जाणवते की वेगळया विदर्भ राज्याच्या जुन्या मागणीला वर्तमानकाळात अधिक व्यापक असे जनआंदोलनाचे स्वरूप धारण होत आहे. मध्यंतरीच्या काही दशकांचा विचार करता विदर्भाच्या मागणीला काही नेतमंडळी व राजकीय पक्षांचा पाठिंबा असला तरी त्याला जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. सद्यःस्थितीत मात्र 'वेगळा विदर्भ' राज्याच्या मागणीकरीता केलेल्या आंदोलनाला जनमताचा व राजकीय पक्षांचा पाठिंबा प्राप्त होत असल्याने सत्ताधाऱ्यांना त्याकडे लक्ष देणे भाग पडले आहे. 2003 मध्ये बनवारीलाल पुरोहित, वसंत साठे, एन.के.पी. साळवे यासारख्या नेत्यांनी स्वतंत्र विदर्भ पक्षाची स्थापना करून वेगळया विदर्भासाठी प्रयत्न केला. तसेच 2004 मध्ये कॉग्रेसचे विदर्भातील जेष्ठ नेते श्री. रणजीत देशमुख यांनी वेगळा विदर्भाला पाठिंबा दर्शवित निवडणूकीत बंडखोरीचे निशान फडकावले. 2010 मध्ये देखील विदर्भात अनेक लहान मोठे पक्ष एकत्रित येऊन विदर्भ बंद ची घोषणा दिली व या विदर्भ बंद ला विदर्भातील कानाकोपऱ्यातून उत्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. वरील सर्व सद्यःस्थितीतील घटना व नुकत्याच झालेल्या 2014 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या काळातील वेगळया विदर्भाच्या मागणीला जनतेचा असलेला सकारात्मक कौल विचारात घेता एकंदरीत वर्तमान परिस्थितीमध्ये वैदर्भिय जनता स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला पाठिंबाच देताना स्पष्ट होते.

**मूल्यांकन..**वरील सर्व मुद्यांचा विचार करता वेगळया विदर्भाची मागणी ही सद्यःस्थितीतील मागणी नसुन या मागणीला एक स्वतंत्र असा इतिहास लाभला आहे. यामुळे ही मागणी आजही सातत्याने पुढे येत आहे. परंतु राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे विदर्भाच्या विकासाच्या बाबतीत दुर्लक्षितपणाची व दुय्यमपणाची वागणूक विदर्भातील जनता अनुभवत आहे. नुकतच नागपूर शिक्षण मंडळातर्फे संचालित श्री बिंझाणी नगर महाविद्यालयात, राज्यशास्त्र पदव्युत्तर विभागातर्फे, स्टूडंट ओरिएंटेशन प्रोग्राम अंतर्गत दि. 24/01/2015 रोजी 'वेगळा विदर्भ कशासाठी?' या विषयावर ख्यातनाम विधिज्ञ ॲड. श्रीहरी अणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या माध्यमातून ॲड. श्रीहरी अणे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण व समर्पक संदर्भाच्या आधारे विदर्भाचा इतिहास व सद्यःस्थितीतील विदर्भावर होणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या दुय्यम वागणुकीचे वर्णन केले. त्यात त्यांनी नागपूर कराराला विद्यार्थ्यासमोर थोडक्यात मांडतांना स्पष्ट केले की,''नागपूर करारात विदर्भातील लोकांना पैसा, नोकऱ्या व शैक्षणिक सुविधा 22 टक्के मिळतील असा करार झाला परंतु आजपावेतो त्या सुविधांपासून विदर्भवासी अलिप्त राहिलेत. अशी खंत व्यक्त केली. या तीन वर्षाचा आढावा घेतल्यास 52 टक्के नोकऱ्या पुणे विभागाला तर 2.5 टक्के नोकऱ्या नागपूर व अमरावती विभागाला देण्यात आल्यात. ही वास्तविकता आहे. 1984 मधील दांडेकर कमिटीने 1400 कोटी रूपये विदर्भावर खर्च व्हावा अशी शिफारस केली. परंतु आजही विदर्भातील जनता त्यापासून वंचित आहे. त्याकरिता वेगळा विदर्भ असणे गरजेचे आहे, असे विचार व्यक्त करून 'विद्यार्थ्यांच्या राज्याला पर्याय नाही तो आपला हक्क आहे' असे मत व्यक्त केले, या संपूर्ण व्याख्यानाच्या माध्यमातून 'वेगळया विदर्भाची अपरिहार्यता' सहज लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) डॉ. नि. आ. वक्काणी, आधुनिक विदर्भाचा इतिहास, 1847–1950, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 2003.
2) कित्ता, पृष्ठ क्र. 277
3) कित्ता, पृष्ठ क्र. 281
4) कित्ता, पृष्ठ क्र. 285
5) कित्ता, पृष्ठ क्र. 285
6) प्राचार्य, डॉ. एस. एस. गाढाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. 1818–1960) के. एस. अतकरे, कैलाश प्रकाशन्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. 366.
7) डॉ. अलका देशमुख, भारतीय शासन आणि राजकारण, ललित पुराणिक, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, 2011, पृष्ठ क्र. 378, 379.
8) प्राचार्य, डॉ. एस. एस. गाढाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. 1818–1960) के. एस. अतकरे, कैलाश प्रकाशन्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. 367–369.

# स्त्रीमूक्तीसाठी समाजसूधारकांचे कार्य

**डॉ. गणेश बी. खुणे** (सहा. प्राध्यापक) राज्यशास्त्र विभाग प्रमूख महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी, जि. गडचिरोली
e-mail- gkhune@rediffmail.com

---

**प्रस्तावना** :– ''जगातील सर्वच देशात, सर्व समाजात लिंग भेदावर आधारीत स्त्री पूरूष विषमतेची समाज रचना आहे. प्रचंड वैज्ञानिक प्रगतीचा पल्ला गाठून 21 व्या शतकात प्रवेश करणाऱ्या आधूनीक मानवी संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या आजच्या जगामध्ये संपूर्ण स्त्री पूरूष समता कोणत्याही समाज अथवा देशात अस्तीत्वात नाही. अमेरीका, कॅनडा, स्वीडन आदी जगातील श्रीमंत, विकसीत व वैज्ञानिक दृष्टया प्रगत देशांतही स्त्री पूरूष समता निर्देशांक नाही. म्हणजेच स्त्रीयांचा दर्जा पूरूषांच्या समान पातळीवर नाही.''[1] भारत हा पारंपराप्रीय देश आहे. या देशाने अनेक चांगल्या वाईट प्रथा, परंपरा जोपासल्या. त्यामूळे काही घटकांना अत्याधिक फायदा झाला तर काही घटकांना उपेक्षेचे, कष्टाचे, बंधनाचे, वंचिततेचे जिवन वाटयाला आले. अशी स्थीती काही जाती–धर्माच्या संदर्भात आहेच. परंतू स्त्री व पूरूष या दोन्ही घटकांमधेही हीच स्थीती आहे. भारतात पूरातन काळापासून पूरूष प्रधान संस्कृतीचे बीजे रोवल्या गेल्याने व या संस्कृतीला निरंतर खतपाणी दिल्याने या परंपरेची मूळे अधिकच पक्के होत गेली. पूरूष प्रधान संस्कृतीने प्राचिन काळापासूनच स्त्रीयांच्या वाटयाला हलाकीचे जिवन आले. 21 व्या शतकातही ही संस्कृती जोपासल्या जात आहे. किंबहूना प्राचिन काळापेक्षा हया स्थीतीत बहूतांश प्रमाणात सूधारणा होत चालली आहे. या सूधारणेचे मूळ उगमस्थान म्हणजे पूनर्जागरणाचा कालखंड होय. या कालखंडात अनेक समाज सूधारकांनी स्त्री सूधारणेला हातभार घातला. राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, सावित्रीबाई फुले अशासारखे अनेक महान समाजसूधारक निर्माण झाले. ज्यांनी स्वताला स्त्री मूक्तीसाठी झोकून दिलेत.

**राजा राम मोहन रॉय.** अंज्ञान, निरक्षरता, अंधश्रध्दा, कर्मकांड यामूळे भारतीय समाज पूर्णता अधोगतीला गेला होता. अश्या समाजात प्रबुध्दतेची फुंकर घालनारा, चेतना निर्माण करणारा पहिला समाज सूधारक म्हणजे राजा राममोहन रॉय होय. ''सतीच्या चालीला विरोध करून स्त्रीला व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तीत्व असते. पतीच्या अस्तीत्वावर ते अवलंबून नसते. म्हणूनच पतीचे अस्तीत्व संपले म्हणजे स्त्रीने स्वताचे अस्तीत्व आत्मदहाणासारख्या क्रुर व पाशवीमार्गाने वा कसेही मिठविण्याची गरज नाही. पती निधनानंतरही ती जगू शकते. समाजाचा ते एक घटक आहे. तीला सती जाण्याची सक्ती करण्याचा या समाजाला काहीच अधिकार नाही. जिवंत राहण्याचा हक्क मग तो पूरूषाचा असो किंवा स्त्रीचा तो सारखाच महत्वाचा आहे असे विचार रॉय यांनी मांडला होता.''[2] स्त्रीदाश्याच्या संदर्भातही त्यांनी आपले विचार मांडले. ज्यांनी ब्राम्होसमाजाची स्थापना करून पारंपारिक भारतीय समाजाला प्रगती पथावर आणण्याचे कार्य केले. भारतीय स्त्रीयांच्या दयनिय स्थीतीत सूधारणा करण्यासाठी ब्राम्होसमाजाची दारे स्त्रीयांना खूली केली. स्त्रीयांसाठी 'नार्मल स्कूल' व 'व्हिक्टोरीया इंन्सिस्टयूट' या संस्था स्थापन केल्या. बहूपत्नीत्व, बालविवाह अशा घातक रूढीं विरूध्द त्यांने कशोसीने प्रयत्न केले. विधवा विवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीयांना समान हक्क इत्यांदी गोष्टींचा पूरस्कार करून समाजसूधारणेचे संघटीत कार्य करण्याचे श्रेय ब्राम्हो समाजालाच जाते.

**ईश्वरचंद्र विद्यासागर.** राजा राममोहन रॉय यांच्या पाठोपाठ बंगालमधील समाजसूधारणेचा विळा उचलणारे दूसरी विभूती म्हणजे ईश्वरचंद्र विद्यासागर होय. त्यांनी धर्मशास्त्रातील कर्मकांड व अनिष्ठ रूढींचा नेहमीच अव्येर केला. स्त्री सूधाराकरीता मूख्यता विधवा विवाहाचा केवळ शाब्दीक प्रचारच केला नाही तर विधवा विवाह घडवून आणण्यात हिरीरीने पूढाकार घेतला. महाराष्ट्रातही समाज प्रबोधन व स्त्रीमूक्तीसाठी अनेक समाज सूधारक व संस्था समोर आल्यात. त्यातील महत्वपूर्ण संस्था म्हणजे प्रार्थना समाज होय. डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, डॉ. आत्माराम पांडूरंग यांच्या प्रयत्नांनी ही संस्था आकारास आली. विधवा विवाहाला प्रोत्साहन देणे, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे, संकटग्रस्त विधवांना मदत, स्त्री शिक्षणाचा पूरस्कार करणे ईत्यादी महत्वपूर्ण कार्य या संस्थेदवारे करुन स्त्री मूक्ती साठी पूर्णतः प्रयत्न केले आहे. लोकमान्य टिळकांनीही स्त्री सूधारणेसाठी कशोसीने प्रयत्न केले. ''त्यांनी समाजसूधारनांना आपल्या घरातही स्थान दिले होते. स्वताच्या मूलींना त्यांनी इंग्रजी शिक्षण दिले. त्यांचे विवाह 16 वर्षानंतर केले. अस्पृष्यता कधीही मान्य केली नाही. विधवा विवाहाचे त्यांनी समर्थन केले.''[3] व सवर्णांप्रमाणे दलीत व स्त्रीयांना शिक्षण मिळाले पाहिजे असे फुले म्हणतात.

**महात्मा ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले**

महाराष्ट्रात असस्पृश्यता, दलीत उध्दार व स्त्री उध्दारासाठी आदय समाजसूधारकाची माळ फुले दांपत्याच्या गळयात पडते. त्यांनीच महाराष्ट्रात या सर्व समाजसूधारणांचा श्रीगणेशा केला. सर्व बाबींचे मूळ अशिक्षीत पणात आहे. त्यामूळे शिक्षणावर भर दिला. ''दलीत वर्ग शिक्षणापासून वंचीत राहिला होता. उच्चवर्णीय शिक्षण घेत होते. ब्रिटीशांनी शहरात शाळा कॉलेज काढले पण महात्मा ज्योतीरावांच्या मते, शिक्षणाची खरी आवश्यकता खेडयात आहे. खेडयामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. शाळा निघाल्या पाहिजे. केवळ शाळा काढून भागणार नाही तर दलीत वर्गातील मूलांना शिक्षणासाठी उत्तेजन दिले पाहिजेत.''[4] ''पूरूषांनी स्त्रीयांना समाजामध्ये दुयम स्थान दिले होते. ते त्यांना मान्य नव्हते. स्त्रीयांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र नव्हते. घराबाहेर पडने देखील दूर होते. स्त्रीयांच्या उध्दाराकडेही महात्मा ज्योतीरावनी लक्ष दिले. सर्वात प्रथम स्त्रीयांच्या शिक्षणावर त्यांनी भर दिला. शिक्षणाशिवाय स्त्रीयांना त्यांच्या अधिकाराची जाणीव होणार नाही अशी त्यांना खात्री होती. बालविवाह, सती जाणे, केशपण या अनिष्ठ चालीरितींना त्यांनी कडक विरोध केला. 'चूल व मूल' हेच त्या काळात स्त्रीयांचे कार्यक्षेत्र होते.''[5] स्त्रीला पूरूषाच्या बरोबरीने मानून स्त्री शिक्षणावर व उध्दारावर अत्याधिक भर दिला. 1848 मध्ये स्त्रीयांना साक्षर करण्याकरीता पूण्यात पहिली मूलींची शाळा काढली. त्याकरीता त्यांना सामाजीक संघर्षाना सामोरे जावे लागले. मात्र खंबीरपणे त्यांनी ब्राम्हणवादी संघर्ष थोपवीला. या संघर्षात सावित्रीबाई फुले यांनी त्यांना बरोबरीने ताट मानेने साथ दिली. किंबहूना त्यासाठी त्यांना दगड, धोंडे, शेण, मातीचा मारही सहन करावा लागला. खास करून दलीत मूलांसाठी व स्त्रीयांसाठी शिक्षण संस्था काढल्या. एकूणच दलीतोध्दार, स्पृश्यास्पृश्य भेदभाव नस्ट करावा, सवर्णाची मक्तेदारी कमी व्हावी व संपूर्ण समाजातील अनिष्ठ प्रथा नष्ठ होउन व्यक्तीला माणूस म्हणून जगता यावे यासाठी 1873 साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा

फुलेंच्या या महनिय कार्यात त्यांच्या पत्नीने खांदयाला खांदा लावून साथ दिली. ज्याकाळात स्त्रीचे कार्यक्षेत्र 'चूल व मूल' इतपर्यंत मर्यादीत होते. त्या काळात धार्मीक बंधने झूगारून समाजाच्या टिकेची पर्वा न करता स्वताला स्त्रीमूक्तीच्या जाळयात झोकून दिले. पर्यायी समाजाचा मूख्यतः सर्वांचा प्रक्षोभही त्यांना सहन करावा लागला.

**स्वामी दयानंद सरस्वती.** बंगालमध्ये व महाराष्ट्रामध्ये चालू असलेल्या धार्मीक व सामाजीक जागरण कार्याच्या धरतीवर उत्तर भारतात या कार्याची मूर्तमेढ रोवणारा महत्वपूर्ण समाज सूधारक म्हणजे दयानंद सरस्वती होय. वैदीक धर्माच्या पूरस्कारासोबतच समाजसूधारणेचे कार्यही हाती घेतले. बालविवाह, जाती व्यवस्था, मूर्तीपूजा यावर त्यांनी हल्ला चढविला, विधवा विवाह व स्त्री शिक्षणाचा त्यांनी पूरस्कार केला. ''पालकांनी अल्प वयीन मूलामूलींची लग्ने ठरविण्याच्या प्रक्रीयेला त्यांनी विरोध केला. संमती वयाचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वी कीत्येक वर्ष दयानंदाने या संबंधी विचार करून पूरूषासाठी 48 व स्त्रीसाठी 24 ही विवाहाची सर्वोत्तम वय सांगीतली होते.''[6] एकूणच वधूवरांनी एकमेकांशी समक्ष भेटल्यानंतर व वैचारीक आदान प्रधानाने लग्न करावे. असा स्त्री स्वतंत्रतेचा पूरस्कार करणारा विचार दयानदांनी मांडला.शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी शाळा व उच्च शिक्षण संस्थाही स्थापन केल्या. हे सर्व कार्य त्यांनी आर्य समाजाची स्थापना करून केल्या. यासबोतच रामकृष्ण मिशन, थीऑसाफीकल सोसायटी यांनी स्त्री सूधारणा व स्त्री शिक्षण यासाठी महनीय कार्य केले.

**निश्कर्श** :– स्त्रीशिक्षण, स्त्रीमूक्ती, स्त्रीउध्दार यासाठी खरी चळवळ ही पूणर्जागरणाच्या काळापासून सूरूवात झाली. या स्त्रीमूक्तीच्या कार्यात अनेकांनी स्वताला झोकून दिले किंबहूना स्वताच्या घराची, समाजाची पर्वा न बाळगता स्त्री कल्यानासाठी पूरजोर प्रयत्न केले. हे प्रयत्न संपूर्ण भारतभर अनेक राज्या राज्यातून पाहायला मिळते. बंगाल, उत्तर भारत, महाराष्ट्र अशा अनेक ठिकानी अनेक संस्था निर्माण करून अनेक समाजसूधारकांनी समाजसूधारनांना प्रारंभ केला. असमानता, भेदभाव, लिंगभेद, बालविवाह, विधवा विवाहाला बंदी, केशवपन, स्त्रीशिक्षणाला विरोध, कर्मकांड, अंदश्रध्दा अशा अनेक बाबींविरोधात बिगूल फुंकले. त्याचीच फलश्रृती म्हणून अनेक स्त्रीया पारंपारिक जोखडातुन मूक्त होउन शिक्षण घेउ लागल्या. शिक्षणाने होणारे बदल त्यांच्यात जानवू लागले. ही या समाजसूधारकांच्या कार्याची फलश्रृती होय की आज स्त्रीया अनेक क्षेत्रात अग्रेसर होउन पूरूषांच्या बरोबरीने दिसू लागल्या आहेत. समाजात दिवसेंदिवस होत चाललेल्या विधवा पूनर्विवाह, बालविवाहाची समाप्ती, सती प्रथा समाप्ती ही सूध्दा या समाजसूधारकांची पूण्याई आहे. कायदयाने जरी यावर कडक निर्बंध घातले असले तरी तत्कालीन स्थितीत अगदी विपरीत समाजमान्यता व परिस्थीतीच्या काळात या मान्यवरांनी जे करून दाखविले ते प्रसंशनिय आहे. जोपर्यंत ही पृथ्वी आहे तोपर्यंत संपूर्ण समाज व मानव जात त्यांना नेहमीच नमन करीत राहील हे निश्चीत.

**संदर्भ ग्रंथ** :–

1) डॉ. देशमूख अल्का, डॉ. गोरे संजय, 'तूलनात्मक शासन व राजकारण,' साईनाथ प्रकाशन नागपूर, 2010, पृ. क्र. 301.

2) डॉ. भोळे भा. ल., 'आधूनिक भारतीय राजकीय विचार,' पिपंळापूरे प्रकाशन नागपूर, पृ. क्र. 59

3) प्रा. सोमवंशी ए. जी., 'राजकीय विश्लेषन व राजकीय तत्वज्ञान,' बजाज पब्लीकेशन अमरावती, प्रथम आवृत्ती 1990. पृ. क्र. 190.

4) डॉ. शृंगारपूरे अरविंद, 'समग्र भारतीय व पाश्चिमात्य विचारवंत,' विद्या प्रकाशन नागपूर, द्वितीय आवृत्ती 2006. पृ. क्र. 53. 54.

5) कित्ता, पृ. क्र. 54.

6) डॉ. भोळे भा. ल., 'आधूनिक भारतीय राजकीय विचार,' पिपंळापूरे प्रकाशन नागपूर, पृ. क्र. 80

.

# महात्मा गांधीचे सर्वोदयविषयी विचार - एक अध्ययन

**डॉ. पी.एच. सुर्यवंशी**
राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय,
नांदगाव खंडेश्वर.

**कु. सपना ज्ञा. गावंडे**
रिसर्च स्कॉलर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

---

***प्रस्तावना :***

महान चिंतक, ग्रामोध्दाराविषयी कळकळ बाळगणारे भारताचे एक थोर पुरूष म्हणून महात्मा गांधी जगात ओळखले गेले. त्यांनी असा समाज निर्माण केला जो सत्य आणि अहिंसा यावर आधारित आहे. ज्यामध्ये कुठल्याही प्रकारचे शोषण होणार नाही तसेच चोहीकडे सहकार्य, सद्‌भाव, प्रेम आणि समानता प्रत्यक्ष दृष्टीत येईल. असे महात्मा गांधींचे भारताच्या समृद्धी व विकासाविषयी स्वप्न होते. जे साकार करण्यासाठी म. गांधींनी आजीवन अथक परिश्रम केले.

आज जगात वेगवेगळे मतप्रवाह, वाद किंवा तत्त्वज्ञान प्रचलित आहेत. जसे समाजवाद, साम्यवाद, भांडवलशाही, समाज व्यवस्था, राज्यव्यवस्था आणि अर्थव्यवस्था कशी असावी ह्याविषयी ही सारी तत्त्वज्ञान मांडणी करतात. सर्वोद्याच तत्त्वज्ञान वरील तीनही पैलूंचा आणि मानवी जीवनाशी संबंधित इतरही पैलूंचा विचार करते. म्हणून आज गांधी तत्त्वज्ञान सर्वोद्य ह्या नावाने ओळखले जाते. आधुनिक जग अतिशय भयानक कालखंडातून जात आहे. अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. जीवनातील स्थैर्य, सुरक्षितता आणि समाधान हरपलं आहे. जग विनाशाच्या दिशेने धावत आहे. ही घोडदौड थांबवून नवी दिशा शोधण्याचा प्रयत्न जगभरातील विचारवंत करताहेत. ही दिशा सर्वोद्याच्या तत्त्वज्ञानात सापडू शकते याचे अध्ययन संशोधकाने शोध निबंधात केले आहे.

**उद्देश :** सर्वोद्याचे जीवन विषयक तत्त्वज्ञान स्पष्ट करणे.

**म. गांधींची सर्वोद्य संकल्पना** :

आज विज्ञान युगात नव-नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. पूर्वीची जीवन पद्धती आणि आजचे जीवन यात फार तफावत निर्माण झाली आहे. नव-नवीन गरजा निर्माण झाल्या आहे. त्या पूर्ण करण्यासाठी साध्य आणि साधने ह्यात समन्वय निर्माण झाला की मानवी गरज पूर्ण होते हे लक्षात घेऊन म. गांधींनी सर्वोद्यी तत्त्वज्ञान निर्माण केले. हे सर्वोद्य तत्त्वज्ञान भारतीय समाजाच्या गरजा भागविणारे कठोर तत्त्वज्ञान आहे. हे सर्वोद्याचे तत्त्वज्ञान भारतीय विचारांना अनुकूल असून ते आजच्या विज्ञान युगातही आचरणीय आहे राज्याचे आणि समाजाचे अंतिम ध्येय सर्वोद्य आहे सर्वोद्य म्हणजे सर्वांचा सर्वच बाबतीत उदय म्हणजे विकास साधून अंतिम कल्याण साधने होय. असे महात्मा गांधीचे मत होते. १९०४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत असताना गांधीजीच्या मित्राने रस्किनने 'अन टू धिस लास्ट' हे पुस्तक त्यांना प्रवासात वाचायला दिले. झपाटल्यासारखी सारी रात्र जागून ते पुस्तक त्यांनी वाचून काढले. खूप प्रभावित झाले. स्वतः पुस्तकाचे गुजराती भाषांतर करून 'इंडियन ओपिनियन' साप्ताहिकात क्रमशः छापले. सर्वात दुर्बल घटकाला सुखी करण्याचा विचार पुस्तकात आहे. गांधीजींनी आपल्या भाषांतरीत पुस्तकाचे नाव 'अंत्योद्य' न ठेवता 'सर्वोद्य' ठेवले. यावरून असे लक्षात येते की, अंत्योद्यापेक्षा सर्वोद्य हे नाव नक्कीच समर्पक असा वेगळा अर्थ सुचित करते.

प्रस्तुत पुस्तकात रस्किनने नफ्यावर आधारित अर्थशास्त्राची निंदा केली. अधिक उपभोग हा अर्थवस्थेचा पाया नसावा. असे अर्थशास्त्र गरीबाचं भलं करू शकत नाही. श्रमिकांच्या शोषणातूनच नफा मिळवला जातो. मर्यादित उपभोग आणि त्याग ह्यावर अर्थव्यवस्था आधारलेली हवी. प्रत्येकाला आपली उपजिविका कमावण्याचा सारखाच अधिकार आहे असे गांधीजींचे सर्वोदय विषयी मत होते. त्यांनी हिंद स्वराज्य मध्ये विचार प्रकट करताना म्हटले की, एखादा वकील आणि केस कापणारा दोघांनाही श्रमाचा सारखाच मोबदला मिळायला हवा. मजूर आणि शेतकऱ्याचे साधे श्रमनिष्ठ जीवनच श्रेष्ठ आहे हे सर्व विचार गांधीजींना पटले, आवडले आणि आपले जीवन तसे घडवण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यासाठी फिनिक्स आश्रमाची स्थापना केली. स्वतःचे आचरण, प्रयोग, अनुभव आणि चिंतन ह्या आधारे म. गांधीजींनी सर्वोद्याच तत्त्वज्ञान विकसित केले. ह्या तत्त्वज्ञानाची सारी बीजे त्यांनी १९०९ मध्ये लिहिलेल्या हिंद स्वराज्य या पुस्तकात मिळतात.

**सर्वोद्याचा अर्थ**

सर्वोद्याला साम्यवाद मान्य नसला तरी 'साम्ययोग' मान्य आहे. सामाजिक समता, समान संधी, श्रमास प्रतिष्ठा व समान किंमत हे साम्ययोगी समाजाचे आधारस्तंभ आहेत. सर्वोद्याचा अर्थ आहे सर्वांचे कल्याण 'अहिरे' आणि 'नाहिरे' ह्या दोन वर्गाची समाप्ती आणि शोषणरहीत सह अस्तित्व.सर्वोदय विचार भारतीय तत्त्वज्ञानाने अनुप्राणित आहे. 'सर्वत्र सुखिनो संतु, सर्वे संतु निरामया।
सर्व भद्राणि पश्यंतु, मा कश्चित् दुःख माप्नुयात।।' याचा मराठीत अनुवाद केल्यास 'सर्वांना सुख लाभावे, तशी आरोग्यसंपदा. कल्याण व्हावे सर्वांचे, कोणी दुःखी असू नये' ह्या श्लोकातील विचार सर्वोदयाचा मूलाधार आहे. जगात जे काही जीवन आहे, ते हे सर्व ईश्वराने बसविलेले आहे. म्हणून त्याचया नावाने त्यागून तू यथाप्राप्त भोगीत जा. कोणाच्याही धनाविषयी वासना राखू नकोस असा सर्वोद्याचा गाभा ईशोपनिषदातील पहिल्या श्लोकात आहे. सर्व चराचर सृष्टी ईश्वराचे निवासस्थान आहे. जो परमेश्वर माझ्यात सामावलेला आहे. तोच इतर सर्वामध्ये सामावलेला आहे. त्यामुळे शोषण आणि विषमतेला स्थानच राहत नाही. प्रत्येक मानसाकडे समदृष्टीने मैत्रीच्या भावनेने पाहण्याची शिकवण सर्वोदय देतो. केवळ मानसाशीच नव्हे तर निसर्ग, पशु-पक्षी, वृक्षवेली सर्वांशी प्रेमाचे नाते जोडण्याची शिकवण सर्वोद्य देतो. हाच विचार आपल्या संतांनी प्रकट केलेला दिसतो. असे म्हटले आहे, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' सर्वोद्यात निसर्गावर अधिकार गाजवण्याची अभिलाषा नाही. निसर्गाशी मैत्रीचं नातं आहे. स्वार्थापाशी निसर्गाला ओरबाडण्याची वृत्ती नाही. शाश्वत अर्थव्यवस्था प्रस्तापित करण्याची अभिलाषा आहे.

म. गांधींच्या मते सर्वाचं भलं आणि कल्याण हेच सर्वोद्याचे अंतिम ध्येय आहे. अहिंसक सत्याग्रहाचा, अहिंसामूलक, शोषणरहित, समताधिष्ठित, शाश्वत समाजाची स्थापना सर्वोद्य करू शकतो. अर्थव्यवस्था ही मानवाचे कल्याण केंद्रस्थानी ठेवणारी शोषणरहित आणि शाश्वत हवी. ह्यासाठी सर्वोद्याच तत्त्वज्ञान विकेंद्रीकरणाचा आग्रह धरत त्यासोबत अर्थव्यवस्थेचा आणि सत्तेचाही विकेंद्रीकरणाचा सर्वोद्य चळवळीच्या माध्यमातून म. गांधीनी आपल्या तत्त्वज्ञानाची सांगड घालून, सत्य, अहिंसा, अस्तेय म्हणजे चोरी न करणे ह्या त्रयींच्या माध्यमातून शक्तिशाली सर्वोद्याचे तत्त्वज्ञान प्रवाहित केले आहे.

**म. गांधीच्या विचारात परिस्थिती परिवर्तन आणि व्यक्ती परिवर्तन आवश्यक**

**परिस्थिती परिवर्तन -**

म. गांधीच्या मते व्यक्तिमत्व विकासा अगोर परिस्थिती परिवर्तन घडून आले पाहिजे. त्याकरिता परिस्थिती परिवर्तनासाठी सर्वोद्य रचनात्मक कार्यक्रम सांगितले आहे. त्यात अठरा रचनात्मक कार्यक्रमाचे वर्णन केले आहे. खादी ग्रामोद्योग व स्वदेशी पासून कुष्ठ व स्त्री प्रश्नापर्यंत आणि दारूबंदी, अस्पृश्यता व धार्मिक सलोख्यापासून शिक्षणापर्यंत अनेक कार्यक्रमांचा समावेशप आहे. हे सर्व रचनात्मक कार्यक्रम चरख्यामुळे आर्थिक व मानसिक लाचारीची परिसिथती बदलेल. स्वाभिमान, स्वावलंबन व स्वदेशीची भावना वाढीस लागेल हा त्यांना विश्वास होता. परिस्थिती परिवर्तनाच्या दृष्टीने वेगळ्या समाजरचनेचा आणि अर्थव्यवस्था विकेंद्रीकरणाचा आग्रह सर्वोद्याच्या तत्त्वज्ञानात आहे.

**व्यक्ती परिवर्तन -**

गांधीजींनी परिस्थिती परिवर्तनानंतर मानवीय गुणांच्या विकासाकरिता व्यक्ती परिवर्तन आवश्यक आहे. त्यासाठीच सर्वोद्यातील व्रतविचारांना महत्त्वाचे स्थान आहे. गांधीजींनी सुरू केलेले सर्व आश्रम सर्वोद्याच्या प्रयोगशाळाच आहे. गांधीजींनी एकूण अठरा व्रते सांगितली आहे. एकादशी व्रतांचा श्लोक पुढीलप्रमाणे - अहिंसा, सत्य, अस्तंय, ब्रह्मचर्य, असंग्रह

शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन,
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना
ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये।।

उपरोक्त विश्लेषीत व्रतांचा संबंध केवळ पूर्वी आपल्या संस्कृतीत आध्यत्मिक जीवनाशी होता. परंतु संसारीक जीवन जगण्यासाठी व्रत आचरणात आणणे आवश्यक आहे. यापूर्वीच महात्मा गांधीनी सांगितलेल्या अकरा व्रतात आनखी सहा व्रतांची भर घालून त्यामध्ये नवा आशय भरला आणि सर्वसामान्य सांसारिक जीवन जगण्यासाठी व्रतपालन आवश्यक मानले.

**सर्वोद्याची आधारभूत तत्त्वे**

सर्वोद्य महत्त्वाच्या चार तत्त्वावर आधारलेला आहे. ही चार ततत्व सर्वोद्याचे आधारस्तंभ आहेत. १) विकेंद्रीकरण २) ट्रस्टीशिप ३) यंत्रसंस्कृतीला विरोध ४) साधनसुचिता. उपरोक्त विश्लेषित तत्त्वे गांधजींनी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनाला दिलेली महत्त्वपूर्ण देणगी आहे. सर्वोद्याच भवन विकेंद्रीकरण विश्वस्तवृत्ती, यंत्रसंस्कृतीला विरोध आणि साधनसुचिता ह्या चार स्तभांच्या आधारे उभे आहे. ह्या स्तंभांना आपल्यामध्ये सामावून घेणारे छत आहे. व्रतविचारच हे छतच सर्वोद्याच तत्त्वज्ञान सुरक्षित ठेवतं आणि त्याच्या भिंती गांधीजींनी सांगितलेल्या रचनात्मक कार्यक्रमात आहेत.

**निष्कर्ष**

जगात आज भांडवलशाही आणि साम्यवादी ही दोन तत्त्वज्ञान प्रचलित आहेत. परंतु दोन्हीही तत्त्वज्ञान सामान्य मानसाचं भलं करू शकलेली नाहीत. पण त्यावर सर्वोद्य हाच तिसरा पर्याय आहे तोच सर्वांच कल्याण साधू शकतो. सर्वोद्याकडे पाठ फिरवून म्हणजे सर्वनाशाची दिशा धरण्यासारखं आहे. महात्मा गांधींनी आपल्या जीवनातील ज्ञान व अनुभवाच्या सहाय्याने सर्वोद्याच्या माध्यमातून आपले तत्त्वज्ञान सादर केले आहे. ग्रामस्वराज्य ही संकल्पना म्हणजे एक भावनिक स्पर्श आहे. यातून कुटुंब व्यवस्था जशी महत्त्वाची असते त्याचप्रमाणे ग्रामस्वराज्य ही संकल्पना महत्त्वाची मानून सर्वांनी सर्वोद्य अंगीकारावे असे करण्यावर किंवा संरक्षण यंत्रणेवर बसून देशातील प्रत्येक गाव, व्यक्ती किती स्वयंपूर्ण आहे यावर अवलंबून आहे. सर्वोद्याच्या माध्यमातून त्यांनी सामान्य माणसात आत्मसन्मानाची, आत्मगौरवाची भावना निर्माण केली आहे. या चळवळीतील प्रत्येक मानव हा धर्मनिरपेक्ष असला पाहिजे. सत्य आणि अहिंसा या विचारधारेशी एकनिष्ठ राहून समाज उन्नती साधली पाहिजे.

**संदर्भ सूची**


१) सोर वासंती, 'एकविसाव्या शतकात गांधी', परधाम प्रकाशन, पवनार, वर्धा, २०११, पृ.क्र. २४-२९.
२) गांधीजी, 'माझ्या स्वप्नांचा भारत', परधाम प्रकाशन, पवनार, वर्धा, २०१०, पृ.क्र. ४१-४२.
३) गांधीजी, 'मेरे सपनो का भारत', नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद, २००८, पृ.क्र. ६७.

# आजच्या जगात गांधी विचारांची आवश्यकता

**प्रा. डॉ. रामभाऊ भाकरे** राज्यशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली मो. ९१७५०३५६११

**सारांशः-**आज संपूर्ण जगात भोगवाद व चंगळवाद वाढला आहे. याबरोबरच प्रचंड उत्पादन स्पर्धा, वस्तू विकण्याची चढाओढ यातून जीवघेणी स्पर्धा वाढीस लागली आहे. अनेक प्रकारच्या वस्तूच्या उत्पादनामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर होत आहे. तर जमीन, हवा, पाणी यांचे प्रदूषणही वाढले आहे. मानवी जीवन अनेक समस्यांनी त्रस्त बनले आहे. प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे शोषण करण्याचा प्रयत्न करीत आहे. या सर्व समस्या देशाला अनुरूप असे विकासाचे, शिक्षणाचे, सामाजिक विकासाचे प्रतिमान न स्वीकारण्याने निर्माण झालेले आहेत. भारताला पाश्चात्य विचारसरणीची व राहणीमानाची औद्योगिक प्रगतीची, सांस्कृतिक आचार विचाराची गरज नाही असे गांधीजीचे स्पष्ट मत होते. पाश्चात्य विचारसरणी ही भौतिकवादात महत्त्व देणारी आहे, व या सुखासाठी लोक वाटेल तो त्याग करण्यास तयार आहेत. या उलट भारतीय संस्कृती ही आध्यात्मिक विकासास प्राधान्य देणारी आहे. गांधीजींचा यंत्राच्या वापरास विरोध होता, कारण यंत्रामुळे भारतातील लाखो लोकांच्या हातचे काम निघून जाईल असे ते म्हणत. केवळ अशाच ठिकाणी यंत्राचा वापर करावा तेथे तो करणे अत्यावश्यक आहे. नेल्सन मंडेला यांनी गांधी तत्त्वाच्या आधारावरच लढा दिला. गांधीजीच्या अर्थशास्त्राच्या संकल्पनेत पैसा नव्हे तर श्रम महत्त्वाचे आहे.

**प्रास्ताविकः-** महात्मा गांधीजींच्या विचारात १९ व्या शतकातील भारतीय विचारांचे सातत्य जसे प्रतिबिंबीत होते तसेच गांधीजीच्या विचाराची कास आजचे जग हिंसाचार, भ्रष्टाचार, स्वैराचार यांच्या कर्दमात पूर्णपणे फसले आहे. या कर्दमातून बाहेर पडायचे असेल तर गांधी विचारांची कास धरण्याशिवाय पर्याय नाही. जगातले श्रेष्ठ शास्त्रज्ञ, कवी, विचारवंत, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते आता या निर्णयापर्यंत येऊन पोहचले आहेत की, सत्याचा, अहिंसेचा व अपरिग्रहाचा जो मार्ग गांधीजीनी सांगितला होता तोच मार्ग योग्य आहे व त्या मार्गाने गेले तरच मानवजात वाचेल. आज सगळे जग वेगाने भोगवादाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. हिंसा, भ्रष्टाचार, लुटमार, चोरी, लाचलूचपत व डाके इत्यादी मार्गाचा जगभर ऊत आला आहे की सामान्य माणसाचीच काय, पण भल्या भल्या लोकांची मती गुंग होऊन जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे. जीवन व्यवहाराच्या सर्व पद्धतीवर राजकारणाचा जबरदस्त पगडा असून या सर्व स्थितीतून शांततापूर्ण व निरामय जगण्याचा रस्ता कसा काढावा याविषयी जगातले विचारवंत संभ्रमात आहेत. विकसित राष्ट्रे ही अविकसीत राष्ट्रांच्या भूमीवर भयंकर युद्धे खेळत आहेत. त्यामुळे विनाशकारी शस्त्रांची निरंतर निर्मिती होत असून सगळी मानवजातच नष्ट होईल की काय अशी भीती वाटायला लागली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जगभर जे जाळे पसरले आहे त्यामुळे आता प्रत्यक्ष युद्धाने कुठल्याही दुर्बल राष्ट्राला गुलाम बनविण्याची गरज राहिली नाही. आर्थिक नाड्या आवळल्या की राष्ट्रे आपोआपच गुलाम होतात. ही जीवघेणी अर्थव्यवस्था बदलण्याची इच्छा असली तरी अनेक देश ते करू शकत नाहीत. जे बलवान देश आहेत ते अर्थसत्ता व राजसत्ता दोघांवरही काबू करू इच्छितात. एकमेकांना पूरक असणाऱ्या या सत्ता शोषणाचे वेगवेगळे मार्ग शोधून काढतात.

सांप्रदायिकता, गरिबी, चारित्र्यहिनता, स्त्रियावरचे अत्याचार, बालमजूरांचे शोषण, समाजातल्या प्रत्येक गटाचे दुसऱ्या गटापासून वाढणारे अंतर, भाषा, सीमा, पाणी यावरून होणारे प्रांताचे झगडे इत्यादींनी जनता ही गांजली आहे, व सरकारही गांजले आहे. विनाशाच्या अगदी जवळ उभ्या असलेल्या या जगाला आजही महात्मा गांधींच्या विचारांमध्ये मुक्तीची वाट आढळते. जगातल्या सत्तरापेक्षा अधिक नोबेल पुरस्कार विजेत्यांनी, गांधी विचारांनी पुढे गेली तरच मानव जात शिल्लक राहील अशी निःसंदिग्ध ग्वाही दिली आहे. त्यामुळे आजच्या जगात गांधीजींच्या विचारांची गरज आहे. गांधीजींनी आपल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात पाश्चात्य संस्कृतीचे वर्णन 'आसुरी' या शब्दात केले आहे. ते म्हणतात की, संस्कृती भौतिकवादी तर आहेच पण इंद्रियसुख हेच तिचे मुख्य ध्येय आहे. सुखामागे वेड्यासारखे धावणाऱ्या या लोकांना आयुष्यातल्या अन्य उदात्त प्रवृत्तीसाठी वेळ नाही. ते या सुखामध्येच जीवनाची सार्थकता व पुरूषार्थ समजतात. या युगात स्पर्धा ही अनिवार्य मानली जाते. स्पर्धेत सर्वांनी उतरावे स्पर्धेचा नियम एकच असतो. 'मोठा मासा लहान माश्याला गिळेल.' खरे तर हा प्राणी जगताचा नियम आहे पण स्पर्धेने तो मानवी संस्कृतीवर लादला.

विश्वामध्ये वर्तमानकाळात चांगल्या आणि वाईट गोष्टींची एक आश्चर्यजनक सरमिसळ झाली आहे. हे आयुष्य अधिक सुंदर व्हावे असे अनेक शोध माणसाने लावले. मृत शरीरातली अंगे जिवंत शरीरात रोपण करून लोकांना पुनर्जीवन दिले. जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात असलेल्या व्यक्तीबरोबर त्वरीत बोलता येईल याची व्यवस्था झाली. अर्थात एक बाजू चांगली तर दुसऱ्या बाजूने जगाचा फार मोठा भाग अज्ञान, रोगराई, भूक दारिद्र्य यांच्याशी झुंजत आहे. निसर्ग असमतोलपणा, वाढणारी वाळवंटे, एड्स, स्वाईन फ्ल्यू यासारखी नवे रोग या सर्वांचे थैमान वाढले. विकासाच्या एका अंधळ्या संकल्पनेने माणसाचा विवेक जणू हरवूनच गेला आहे. औद्योगिकरणाचा राक्षस आवरता येईल की नाही यांची लोकांना चिंता पडली.महात्मा गांधीचा यंत्राला विरोध नव्हता परंतु माणसाच्या हातातले काम काढून घेणाऱ्या यंत्राला अवश्य विरोध होता. विज्ञान, टेक्नॉलॉजी, यंत्रे ही शेवटी मानवासाठी आहेत. ती जर मानवालाच निरर्थक ठरवत असतील तर ती हवीत कशाला? विकासाविषयी चर्चा करणारे विद्वान यांनी केवळ एक महिन्यासाठी झोपडपट्टीत जावून राहावे, म्हणजे त्यांचे खरे शिक्षण होईल. विकास वगैरेचा विचार करताना आधी माणसाचा विचार करावा याचे ज्ञान त्यांना मिळेल.

आजच्या भयंकर हिंसक वातावरणात जगणाऱ्या जगाला आता कुठे गांधीजींचे अहिंसेने व्यापलेले जीवन महत्वाचे आहे हे कळायला लागले. विचार, वाणी आणि वर्तन यात पूर्णपणे अहिंसक असलेल्या गांधीजींनी राजकारणही अहिंसक पद्धतीने करता येते हे दाखवून दिले. गांधीजीमध्ये विभिन्न परस्परविरोधी वस्तु व विचारांचा समन्वय घडविण्याची एक विलक्षण ताकद होती. त्यांनी स्वातंत्र्य संग्रामाची धामधूम चालू असतानाच दुसऱ्या बाजूला ते हरिजनोद्धार, दारूबंदी, स्त्री शिक्षण, वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, औद्योगिकरण, विकेंद्रीकरण, शांती, युद्ध, शिक्षण व्यवस्था व ट्रस्टीशिप याविषयी विचारपूर्वक रचनात्मक कार्यक्रम आयोजित करीत होते. जॉर्ज मिडलटन मुरी यांनी एका लेखात असे लिहिले होते की, "प्रेम ही ख्रिस्ताने पेटवलेली ज्योत तेवत ठेवली नाही तर पाश्चिमात्य संस्कृतीला जिवंत राहण्याची आशा करायला नको." गांधीजीने आयुष्यात प्रेमाला सर्वाधिक महत्त्व दिले. ते यंत्राच्या जागी 'प्रेम' हा शब्द ठेवा अनेक प्रश्न चुटकीसरशी सुटतील असे सांगायचे. गांधीजीनी वंशद्वेषाविरूद्ध व वसाहतवादाविरूद्ध हिंसेविरूद्ध या तीन क्रांत्या केल्या असे समाजवादी विचारवंत पन्नालाल खुराणा यांनी म्हटले आहे. दक्षिण आफ्रिकेतल्या अनुभवापासून धडा घेऊन गांधीजीनी या सर्वाच्या विरूद्ध सर्वकष लढा उभारला. शांततामय प्रतिकाराने या गोष्टी मोडून काढता येतात हे त्यांनी दाखवून दिले. डॉ. नेल्सन मंडेला यांनी गोऱ्या सत्ताधाऱ्यांशी गांधी मार्गानेच दीर्घ काळ लढा दिला व शेवटी वंशवादातून मुक्त झालेले एक स्वतंत्र राष्ट्र

जन्माला आले. अविकसीत व निर्बल असलेल्या अनेक लहान लहान राष्ट्रांनी उपनिवेशवादाचे घोंगडे झुगारून दिले, व गांधीजींनी दाखवलेला अहिंसक प्रतिकाराचा मार्ग अवलंबिला.

पर्यावरणाचा जो भयंकर विनाश मानवाने केला त्यांची किंमत जग चुकवतेच आहे. आमच्या विकासाची दिशा आम्ही ठरवू. आम्हाला आमच्या राष्ट्राला जो परवडेल तो आमचा दिवस हे गांधीजीचे म्हणणे अगदी रास्त होते. गांधीजीच्या या विकासाच्या संकल्पनेत सर्वात शेवटी असलेल्या माणसाच्या किमान गरजा पूर्ण होणे म्हणजेच खरा विकास होणे होय. केवळ भौतिक विकास म्हणजे काही बरा विकास नव्हे. मानवाचे जीवन जेवढे नैतिक मूल्यांवर आधारलेले असेल तेवढे ते अधिक सार्थक समजले जाईल. गांधीजींनी विचारपूर्वक त्यासाठी शब्द वापरला होता. 'सर्वोदय' सर्वांचा उदय ज्या योगे होईल ते खरे स्वराज्य. 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात गांधीजींनी विकासाची परंपरागत संकल्पनाच पार बदलून टाकली आहे. आजच्या अर्थव्यवस्थेने कष्टकऱ्यांची इतकी कोंडी केली आहे, की त्यांचे जगणेच मुश्किल व्हावे. गांधीजींचे अर्थशास्त्र या अनर्थशास्त्राचे उत्तर आहे. त्यांच्या अर्थशास्त्रात पैसा महत्त्वाचा नाही. श्रम करणाऱ्या समाजाच्या पायाभूत असलेल्या सुविधा महत्त्वाच्या आहेत. गांधीजीच्या दृष्टीने तळथरातल्या प्रत्येक माणसाला किमान या पायाभूत असलेल्या सुविधा मिळणे आवश्यक होते व त्यासाठी आजची प्रस्थापित व्यवस्था सर्वथा अयोग्य होती. जगात आज अस्तित्वात असलेली समाजव्यवस्था सर्वार्थाने विषम आहे. मूठभर धनिक राष्ट्रे एका बाजूला व अर्धवट उपाशी, दारिद्र्याने गांजलेली, कर्जात बुडालेली, गरीब राष्ट्रे दुसऱ्या बाजूला असे विभाजन स्पष्ट दिसते. या विषमतेसोबतच शस्त्रास्त्रांची जीवघेणी स्पर्धा, सर्व क्षेत्रात बोकाळलेला चंगळवाद, मानवाची किंमत शून्यापर्यंत येणे व संपत्तीची किंमत थेट आकाशला भिडणे, नीतिमूल्ये, साधेपणा, सचोटी, परिश्रम, बंधुभाव, करूणा यांना जीवनात नगण्य स्थान लाभणे, वाढती यंत्राधिनता हे व यासारखे अनेक प्रश्न या सामाजिक व्यवस्थेपुढे आहेत. या सर्वावर गांधी तत्त्वज्ञान हे एकच उत्तर आहे असे म्हणणे कदाचित हट्टाग्रहाचे ठरेल. पण यातल्या बहुसंख्य प्रश्नांची उत्तरे गांधी तत्त्वज्ञान व गांधी जीवन यात मिळतात, कारण गांधी तत्त्वज्ञान हे प्रत्यक्ष प्रयोग व परिणाम यावर आधारलेले वास्तववादी तत्त्वज्ञान आहे.

**सारांश:-**आज संपूर्ण जगात भोगवाद व चंगळवाद वाढला आहे. याबरोबरच प्रचंड उत्पादन स्पर्धा, वस्तू विकण्याची चढाओढ यातून जीवघेणी स्पर्धा वाढीस लागली आहे. अनेक प्रकारच्या वस्तूच्या उत्पादनामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर होत आहे. तर जमीन, हवा, पाणी यांचे प्रदूषणही वाढले आहे. मानवी जीवन अनेक समस्यांनी त्रस्त बनले आहे. प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे शोषण करण्याचा प्रयत्न करीत आहे. या सर्व समस्या देशाला अनुरूप असे विकासाचे, शिक्षणाचे, सामाजिक विकासाचे प्रतिमान न स्वीकारण्याने निर्माण झालेले आहेत. भारताला पाश्चात्य विचारसरणीची व राहणीमानाची औद्योगिक प्रगतीची, सांस्कृतिक आचार विचाराची गरज नाही असे गांधीजीचे स्पष्ट मत होते. पाश्चात्य विचारसरणी ही भौतिकवादात महत्त्व देणारी आहे, व या सुखासाठी लोक वाटेल तो त्याग करण्यास तयार आहेत. या उलट भारतीय संस्कृती ही आध्यात्मिक विकासास प्राधान्य देणारी आहे. गांधीजींचा यंत्राच्या वापरास विरोध होता, कारण यंत्रामुळे भारतातील लाखो लोकांच्या हातचे काम निघून जाईल असे ते म्हणत. केवळ अशाच ठिकाणी यंत्राचा वापर करावा तेथे तो करणे अत्यावश्यक आहे. नेल्सन मंडेला यांनी गांधी तत्त्वाच्या आधारावरच लढा दिला. गांधीजीच्या अर्थशास्त्राच्या संकल्पनेत पैसा नव्हे तर श्रम महत्त्वाचे आहे.

आज आपल्याला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्षात वापर करून मात करता येते. मात्र त्यासाठी गांधी विचारांचा अभ्यास अंगीकारण्याचा विचार आणि प्रत्यक्षात गांधी विचार अंमलात आणण्याचा ठाम निश्चय करणे अत्यंत आवश्यक आहे. गांधी विचारांचा स्वीकार व त्यानुसार आचरण करणे ही केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात काळाची गरज ठरेल.

**संदर्भ :-**

१.भारतीय राजकीय विचारवंत - प्रा.डॉ.विलासआघाव, प्रा.डॉ.सुखनंदन ढाले
२.हिंद स्वराज्य - महात्मा गांधी
३.गांधी विचार दर्शन (राजकारण), संपा. भाऊ धर्माधिकारी
४.एकला चलो रे - श्री. श्रीपाद केळकर
५.गांधी जसे पाहिले जाणले विनोबांनी - संपादक - कांती शाह

# पूर्व विदर्भात नक्षलवादी चळवळीचा उगम आणि विकास

**प्रा.डॉ. रवि साहेबराव धारपवार** चिंतामणी महाविद्यालय, घुग्घूस. जि. चंद्रपूर

प्रस्तावना : ' नक्षलवाद 'हा मागील पाच दशकापासुन भारतीय राजकारणाला भेडसावनारी समस्या आहे. भारतातील 13 राज्ये आणि त्यांच्यातील 223 जिल्हे आज नक्षलवादाच्या कचाटयात सापडलेली आहे.जे देशाच्या विकासास घातक आहे. आज हे आदोंलन महाराष्ट्रातील पूर्व विदर्भातील चंद्रपुर,गडचिरोली,गोंदिया, भंडारा,वर्धा आणि कहीसा नागपूर जिल्हयात आपले पाय पसरविण्यात यशस्वी झालेले दिसुन येतात.कारण या भागात घनदाट जंगल आहे व विरळ लोकसंख्या असुन या भागात प्रामुख्याने गोंड, माडिया ,पप्रधान ,राजगोंड ,खुटला गोंड,धुरगोंड व अन्य काही जाती अल्प प्रमानात आढळतात.या भागात खणिज संपत्ती मोठया प्रमानात आहे.अशा या जगातील श्रीमंत अशा भुभागावर जगातील सगळयात गरीब समाज म्हणजे आदिवासी समाज वसलेला आहे.या समाजातील लोक प्रमुख्याने शेतकरी ,शेतमजुरी व कामगार आहेत.अशा या गरीब आदिवासीच्या दुबळेपणाचा फायदा नक्षलवादी घेत आहेत.

नक्षलवादाचा उगम : हेगेलच्या डाव्या विचारसरणीनुसार कार्ल मार्क्स शोषितांचे व पीडितांचे सामाजीक स्थान निश्चित करनारे आद्य क्रान्तीकारक आहेत.कार्ल मार्क्सच्या कामगार व कृषक वर्गासाठी सन्मानजनक धडयांना लेनिनने रषियात प्रत्यक्षात उतरवीले.चिन मध्ये सुद्वा कामगारांचे हाल झाले व हळुहळु चिनमध्ये साम्यवाद प्रास्तापीत झाला.नक्षलवाद ही सुद्वा अशाच प्रकारे निरमान झालेली चळवळ आहे. नक्षलवाद ही उग्र संघटनाची क्रान्तीकारी चळवळ मानली जाते.या चळवळीचा प्रारंभ स्वातंत्र्यपूर्व काळात किसान आंदोलन म्हणून झाला.इ.स.1948 मध्ये पहिलयादा साम्यवादी जहालांनी शस्त्रबद्ध हिंसात्मक कृत्यांनी सुरवात केली.भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात माओ च्या तत्वावर आधारीत भूमि सुधार व विकास कायाच्या स्वरूपात नक्षलवादी चळवळ उदयास आली. भारत चिन युद्धानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे दोन गट पडले.त्यापैंकी ज्योती बसु.,बी.टी.रणदिवे इत्यादीनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला.व सन 1967 च्या निवडनुकीत यश संपादन करून बंगाल मध्ये संत्तेवर आला. तेव्हा या पक्षातील तरून वर्ग विचारू लागला की,काय हा पक्ष क्रान्तीचा मार्ग टाकुन संसंदीय मार्गाचा स्विकार करणार त्याना प्रश्नाचे उत्तर न मिळल्याने चारू मुजुमदार, कानू सन्याल,विनोद मिश्रा,व महादेव मुखर्जी हयांनी पक्ष सोडला आणि सन 1969 मध्ये नव्या कम्युनिस्ट पक्षाची घोषना केली.या पक्षाने आपले कार्य प. बंगाल मधील दार्जलिंग जिल्हयातील 'नक्षलवाडी'या गावापासुन सुरू केले.त्यामुळे या चळवळीला नक्षलवाद असे नाव प्राप्त झाले. पुढे तिन वर्षानंतर चारू मुजूमदार पकडले गेले.त्याच्या गटातील काही लोक भुमिगत झाले.काही काळानंतर त्यांचे अनेक गट उदयास आले.महाराष्ट्रात मात्र कोंडापल्ली सितारमय्या यांच्या नेतुत्वामध्ये 'पिपल्स वॉर ग्रुप ही अंत्यत उग्र संघटना निरमान झाली.सन 1978 मध्ये चंद्रपुर जिल्हयामध्ये रेड्डी गट कार्यरत होता. हा गट चंद्रपूर जिल्हयातील सिरोंचा भागाचे सर्वेक्षण करण्यासाठी आला.तेव्हच खरे पाहता याच भागातुन नक्षलवादाचा प्रथम प्रवेश झाला.

पूर्व विदर्भात नक्षवादी चळवळीचा प्रवेश : सन 1979 मध्ये आंध्रप्रदेशातील तेलंगना प्रांतातून पाच नक्षलवादी गट सर्वेक्षणासाठी सिरोंचा भागात आले.त्यांना तेथे असे आढळुन आले की, तेथील आदीवासी शेतकरी ,शेतमजुर,कामगार यांचे जिवन अगदी हलाखीचे आहे.कारण त्यांना मजुरी फार कमी मिळते.तेव्ह या आदीवासीच्या मजुरीत वाढ करून दिली तर हे आपल्याहातात येतील असे त्याना वाटत होते.त्यांनी या भागातील प्रमुख दोन प्रश्नांकडे लक्ष दिले.

1 तेंदुपाने खुडण्याच्या मजुरीत वाढः चंद्रपूर,गडचिरोली, जिल्हयातील आदीवासींच्या उत्पन्नाचे महत्वाचे साधन म्हणजे तेंदुपाने संकलीत करणे होय.हे काम मे– जुन महिण्यामध्ये केले जाते.दिवसभर पाने खुडने व कंत्राटदाराला सोपउन देउन आपली मजुरी घेणे.शंभर पुडयाला सन 1980–81 मध्ये साडे चार रूपये मिळत होते.परंतु कंत्राटदार मोजमाप करतांना दिडसे पुडे शंभर भरवायचे नक्षलवादी यांनी हाच प्रश्न हाती घेतला.गावोगावी सभा घेतल्या सर्व परीसर पिंजुन काढला.गावकरी वर्ग साथ देउ लागला.सगळीकडे काम रोखले गेले.शेवटी कंत्राटदारांना मान्य करावे लागले.या आंदोलनाच्या यशामुळे नक्षलवादीचे मनोबल वाढले.सिरोंचा ते आष्टी पर्यत हा वनवा पेटत आला.परीनामी नक्षलवादी चळवळीस पोषक वातावरण तयार झाले.

2 बांबू संकलनाचा प्रश्न : या भागामध्ये दुसरा महत्वाचा रोजगार म्हणजे बांबू संकलन करणे होय.या जंगलातुन मोठया प्रमानात बांबु मिळतो. त्यापैकी प्रथम दर्जाचा बांबु शहरात जातो.अन्य बांबु बल्लारपुर पेपर मिल ला पुरवीला जातो व मिल मालकाकडून आदिवासी मंजुरांना योग्य मोबदला दिला जात नाही.हा प्रश्न नक्षलवादी चळवळीनी हाथी घेतला व आदिवसीना न्याय मिळउन दिला परीनामी नक्षलवादी

चळवळीस बळकटी प्राप्त झाली. या चळवळीचे अस्तित्व आजही टिकउन आहेत व हळुहळु आपला विस्तार करीत आहेत.

नक्षलवादी चळवळीच्या विकासास कारणीभूत घटक :

1:निस्तार योजनेचे नाममत्र स्वरूप : ब्रिटीशकाळात आदीवासीना निंस्तार हंक होते.म्हणजे आदीवासीना आवश्यक असलेला लाकुडफाटा ते जंगलातुन आनु शकत होते.त्यावेळी जंगलावर मालकी हंक आदीवासींचा होता.तर सरकारी मालकीच्या जंगलामध्ये निस्तार योजना ही आदिवासींना दिलेली सवलत होती.तशी वनकायद्यात तरतुद करण्यात आली होती परंतु हया तरतुदी केवळ कागदावरच होत्या. आदिवासींना या योजनांची माहिती कोणीही दिली नाही.व आदिवासींच्या नावांवर अधिकारी वर्ग मैज करू लागला.

2 राजकीय पक्ष कमी पडले,नक्षलवाद्यांना मात्र फावले : नक्षलवाद्यांच्या विचारांना प्रभावित होउन पुर्व विदर्भातील अनेक तरूण नक्षलवाद्यांसोबत मिळाले. कारण स्थानिक राजकारण्यांनी तिकडे लक्ष दिले नाही. तरूणांना त्याच्या चुकीच्या मार्गाची जानीव कोणी करून दिली नाही.सरकारला ही काही देण घेण नव्हत केवळ या क्षेत्रातील तीन आमदारकीच्या जागा मिळवने एवढाच उद्देश होता.त्यामुळे नक्षलवाद्यांना आदिवासींची सहानुभूती मीळाली.

3 नक्षलवाद्यांचा हिंसाचार : आजपर्यत नक्षलवाद्यांनी अनेक लोकांच्या हत्या केल्या आहेत दृगावचा सरपंच ,पोलीस पाटील ,खब–या पंचायत समिती सदस्य ,वनअधिकरी,पोलीस, ग्रामसेवक, पटवारी, याशीवाय जाळपोळ ,रस्ता जाम यासारख्या हिंसक मार्ग स्विकारून मानवी जिवन अस्तव्यस्त केले आहे.

4 आदिवासींवर नक्षल चळवळ थोपवीने : आदिवासी समाज शतकानुयातके शोषकांचा बळी ठरला आहे.हा समाज आजही गरिबीत जिवन जगत आहे. मानवाच्या मुलभूत गरजादेखील हा समाज पुर्ण करु शकत नाही.तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे अतिशय आदिम स्वरुपाचे जिवन जगत आहेत.अशा या समाजाला मावोवाद;लेनिनवाद;मार्क्सवादी तत्वज्ञान कितपत समजेल हा एक प्रश्न निर्माण झाला.ज्या व्यक्तींना आदीवासी समाज ओळखत नाही त्यांची विचारसनी कशी काय समजेल हा एक संशोधनाचा विषय आहे. तेव्हा ही चळवळ आदीवासीची आहे असे समजुनद त्याच्यावर थोपविने चुकीचे आहे.

5 आदिवासी विरुद्ध आदिवासी : आदिवासी समाजाचे अनेक लोक तुरुंगात असलेले दिसतात कारण आदिवासी तरुण तरुणींना अनेक गुन्हयात गोवले जाते. कधी नक्षल समर्थक म्हणून तर कधी पोलीसांचा समर्थक म्हणून त्यांच्यावर गुन्हा नोंदविल्या जातो.कधी जबरीने बंदुकीच्या जोरावर भोजन पुरविण्यास सांगीतले जाते.बरेच वेळा पोलीसांच्या भितीने तरुण गाव सोडून पळून जातात व पुन्हा गावामध्ये परत येंउ शकत नाहीत परीनामी ते नक्षलवादयांसी जाउन मिळतात तर कधी हलाखीच्या परिस्थितीमुळे किंवा द्रारीद्रयामुळे ;बेरोजगारीमुळे तरुण नक्षली चळवळीत सहभागी होतात.दुसरीकडे अॅक्शन प्लॅनच्या नावाने सरकारने आदीवासी युवकांना पोलीसामध्ये भरती केले जाते व नक्षली चकमकीत आदीवासी पोलीसांच्या म्रुत्युचे प्रमान जास्त आहे.अशप्रकारे पुर्वविदर्भात आदीवासी विरुद्ध आदीवासीची जिवघेनी स्पर्धा सुरु आहे.

समारोप : आज आदिवासी समाज नक्षलवादयापासुन दुर जात आहे.नक्षलवादयाचे शरण येण्याचे प्रमाण वाढले आहे.व शासनाने शरण आलेल्या नक्षलवादयाचे विचार आज बदललेले दिसुन येत आहेत.आदिवासी लोकांची साथ आता पुर्वीप्रमाने मिळत नसल्याची खंत नक्षलवादयांनी व्यक्त केली आहे.पुर्वविदर्भात पोलीसांची सतत गस्त व आधुनिक तंत्रज्ञान;यामुळे नक्षलवादयांचे मनोबल खचलेले दिसुन येते. नक्षलवादयाकडुन बरेचदा शासनाकडून चालु असलेली कामे बंद पाडण्याचे कार्य केले जाते.परीनामी पुर्वविदर्भात रोजगाराच्या संधी रखडलेल्या दिसतात.त्यामुळे पुर्वविदर्भात विकास करण्यात शासनााला अपयश येत आहे.हे अपयश टाळण्यासाठी शासनाला जीकरीचे प्रयत्न करावे लागनार आहे.आदिवासीचा प्रस्तापीताकडुन होनारा छळ थांबण्यासाठी उपाययोजना कराव्या लागणार आहे. पुर्वविदर्भात बंदुकीच्या जोरावर ज्या नक्षली कारवाया सुरु होत्या त्या पुर्णपने बंद करता येणार नसल्या तरी काही काळपर्यत बंदुकीचा वापर करावाच लागेल मात्र हे सर्व करत असताना आदिवासीच्या हक्क व संसस्कुती;धर्मश्रद्धा यांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी लागनार आहे.

संदर्भग्रंथसुची

नक्षलवादी आणि आदीवासी : गोविंद गारे
चंद्रपूरचा इतिहास : अ.ज. राजुरकर
आदिवासी बोलू लागला : माधव बंडू मोरे
दंडकारण्यातील संमातर सरकार : सी.वनजा

# राष्ट्रीय सत्तेच्या घटकांचे बदलते स्वरूप

**डॉ. रविंद्र भणगे,** सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना:** राष्ट्रीय सत्तेत वृद्धी करणे हे प्रत्येक देशाचे प्रमुख कार्य असते. राष्ट्राच्या उभारणीत या राष्ट्रीय सत्ते अंतर्गत येणारे घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. यामध्ये पारंपारीक व आधुनिक घटक असे प्रकार पडतात. या घटकांचा प्रभाव बदलत्या परिस्थितीनुसार, काळानुसार बदलत असतो. राष्ट्रसत्तेच्या घटकानुसारच प्रत्येक राष्ट्र आपले अंतर्गत व बाह्य धोरण ठरवत असते. या आधारावरच तो देश आपली शक्ती संचय व वृद्धी करतो. या घटकांचा वापर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने करण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्राचा असतो. पूर्वी या घटकात सैन्यशक्ती, लोकसंख्या, भूप्रदेश हे घटक महत्त्वपूर्ण होते. सध्या यात आर्थिक व तांत्रिक घटक अत्यंत प्रभावीपणे अंतर्भूत झाले आहेत अशा या राष्ट्रसत्तेच्या घटकांच्या बदलत्या स्वरूपाचा आपण प्रस्तुत लेखात आढावा घेणार आहोत.

**राष्ट्रसत्तेतील घटक:**

सशक्त राष्ट्राच्या निर्मितीत जे घटक आवश्यक असतात व ज्या घटकांच्या सहाय्याने राष्ट्रास सत्ता सामर्थ्य प्राप्त होते ते घटक म्हणजे राष्ट्रसत्तेचे घटक होय. राष्ट्र सत्तेचे घटक हे काळानुसार बदलतात पण काही घटक स्थायी असतात. फक्त त्याचा काळानुरूप प्रभाव बदलत असतो. पूर्वीच्या काळी राष्ट्रसत्तेच्या घटकात भौगोलिक घटकाला महत्त्वपूर्ण स्थान होते. या भौगोलिक घटकात हवामान, भू-प्रदेश, स्थिती किंवा स्थान, सिमा नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा समावेश होतो. कोणत्याही देशाचे भौगोलिक स्थान हे संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असते त्यामुळे पूर्वीच्या काळी युद्धामध्ये जय-पराजयवर प्रामुख्याने भौगोलिक घटकाचा प्रभाव पडत असे. भौगोलिक घटकात भूप्रदेश, हवामान स्थिती किंवा स्थान, आकारमान इत्यादी घटक महत्त्वपूर्ण असून राज्य विस्तार करून आपली राष्ट्रीय सत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला जात होता. त्यानुसार नवीन प्रदेश जिंकून सत्ता वृद्धींगत केली जात होती. सिंकदरने आपली राष्ट्रीय सत्ता वाढवण्यासाठी जग जिंकण्याची मोहिम काढली पण तो भारताच्या पूर्व सिमेवर प्रतिकूल हवामानामुळे थांबला व त्याला या घटकाच्या प्रभावाने मर्यादा आली. त्याच पद्धतीने दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने रशियावर आक्रमण केले होते तेव्हा रशियाच्या प्रतिकूल हवामानाने जर्मनीचे सैन्य हरले. याप्रकारे भूप्रदेश लहान अथवा मोठा यावरून ही त्या राष्ट्राच्या सत्ते वाढ अथवा कमी दिसत होती. लहान भूप्रदेश असणारे देशाचे धोरण लवचिक असे. अशाप्रकारे पूर्वीच्या काळी याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवत होता.

आधुनिक काळात या घटकाचा प्रभाव कमी होत चाललेला आहे. आज युद्धनीती बदललेली आहे. भूप्रदेश बळकावणे अथवा आक्रमण करण्याचे धोरण युनोच्या व आंतरराष्ट्रीय लोकमताच्या हस्त क्षेपामुळे बंद झाले आहे. तसेच प्रतिकूल हवामानावर ही तंत्रज्ञानाच्या प्रगतीने मर्यादा आणल्या आहेत. याचबरोबर आज लहान भूप्रदेश असणारे देश सुद्धा आपल्या तांत्रिक व आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर महासत्ता बनत आहेत व विविध मार्गानी आपली राष्ट्रीय सत्ता वाढवत असल्याचे दिसून येते. यामुळे राष्ट्रसत्तेच्या घटकातील भौगोलिक घटकाचा प्रभाव सध्या मर्यादित झाला आहे. राष्ट्रसत्तेच्या घटकात सैन्यशक्ती हा घटक अत्यंत प्रभावी असतो. पूर्वीच्या काळात आणि आताही फक्त त्याचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी सैन्यशक्ती ही किती सैन्यसंख्या आहे/ यावरून ठरवली जात होती. त्या काळात युद्धाचे स्वरूप पारंपारिक असे होते. त्यामुळे सैन्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. सैन्य शक्तीचे स्वरूप बदलले आहे. सैनिकाच्या हातातला भाला, धनुष्य, पारंपारिक शस्त्रे जावून आता बंदुक, बॉम्ब गोळे यासारखी आधुनिक शस्त्र आली. तसेच अणुचा शोध लागल्याने अणुबॉम्बची निर्मिती झाली. क्षेपणास्त्राची निर्मिती मुळे सैन्य संख्येवर मर्यादा आल्या आहेत. सैन्यासाठी अत्याधुनिक यंत्र सामग्रीच्या निर्मिताने जगातील युद्धाचे स्वरूप बदलले. युद्धात नव-नविन तंत्रज्ञानाने शस्त्रांची निर्मिती होवू लागली व आज या जोरावर देश आपली राष्ट्रशक्ती वाढवतात पण हे वाढवताना प्रत्येक देशावर मर्यादा आल्या आहेत. कारण कोणत्याही देशाला युद्ध नको आहे. युद्धाचे परिणामाच्या जाणीवेतून युद्ध टाळले जाऊन फक्त अवरोधनाची स्थिती ठेवली जात आहे. जेणेकरून सत्ता समतोल साधला जाईल.

राष्ट्रसत्तेच्या घटकातील विचारधारा हा घटक सध्या मागे पडला आहे. १९९० पर्यंत याचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो परंतु नंतर याचा प्रभाव जाणवत नाही. आज प्रत्येक राष्ट्राशी विचारधारा वेगवेगळी असली तरी प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्र हिताच्या दृष्टीने इतर राष्ट्राशी प्रस्थापित करताना दिसून येते. राष्ट्र सत्तेच्या घटकात नैसर्गिक साधन संपत्ती व खनिज संपत्ती हे ही घटक सत्ता वाढवण्याचा आवश्यक आहेत. औदयोगिक क्रांतीनंतर खऱ्या अर्थाने नैसर्गिक साधन संपत्ती व खनिज संपत्ती याचा प्रभाव राष्ट्रसत्तेच्या घटकात वाढू लागला. प्रत्येक देश आपल्याकडे उपलब्ध असणाऱ्या साधनांचा वापर करून आपल्या राष्ट्राच्या शक्ती वाढ करू लागला. तसेच आपले धोरण ही ठरवू लागला. खनिज संपत्तीत तेल हा घटक महत्त्वपूर्ण असून या घटकाचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात पूर्वीही होता व आताही आहे. तेल संपन्न राष्ट्रे या घटकाचा वापर आपली राष्ट्र सत्ता वाढवण्याबरोबरच आपला प्रभाव इतर देशावर पाडण्यासाठी करीत आहेत. याचा अलीकडे प्रभाव कमी झाला असला तरी महत्त्व कमी झाले नाही आज ही विकसनशील राष्ट्रांवर या घटकांचा प्रभाव पडत असतो. आज प्रत्येक राष्ट्र ऊर्जा साधनाचा शोध लावत आहे. जेणेकरून ऊर्जा या घटकात तो स्वयंपूर्ण बनेल व आपली राष्ट्र सत्ता वाढवेल उदा. अमेरिकेने खनिज तेलाला पर्याय शेल गॅसचा शोध लावला आहे, जेणेकरून त्याचे खनीज तेलाबाबतचे परावलंबन कमी होईल.

राष्ट्रसत्तेच्या घटकात नव्याने प्रभावीत झालेला घटक म्हणजे आर्थिक घटक होय. जो आज प्रत्येक देशाने अवलंबलेला असून त्याचा प्रभाव दिसून येतो. आर्थिक घटकामध्ये व्यापार, शेअर बाजार, औदयोगिकरण अशा अनेक गोष्टीचा अंतर्भाव होतो. आर्थिक घटक प्रामुख्याने जागतिकरणामुळे प्रत्येक राष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण ठरू लागला. लहान अथवा मोठे राष्ट्र या घटकाचा वापर करून आपली सत्ता वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. आज जपान, भारत, चीन, ब्राझील ही राष्ट्रे आपला प्रभाव वाढवत आहेत. भारताने आपले माहिती तंत्रज्ञान क्षेत्र व बाजारपेठ या दोन घटकावर आपला व्यापार वाढवत जगातील सर्व देशांचे लक्ष वेधले आहे व आर्थिक महासत्तेच्या दिशेने मार्गाक्रमन करत आहे. चीनने 'सेझ' प्रकल्पाच्या माध्यमातून आपली उत्पादने जगभर पसरवली आहेत. यातून चीनचा बोलबाला प्रत्येक राष्ट्राच्या बाजारपेठेमध्ये आहे व डंपीग पॉलीसी वापरून आपली मक्तेदारी निर्माण करत आहे. दक्षिण कोरिया, जपानसारखे छोटी राष्ट्रे आज आपली तांत्रिक उत्पादने व कंपन्याच्या जोरावर जगातील आर्थिक महासत्ता बनली आहेत. आज प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेच्या संकल्पनेत आर्थिक घटक महत्त्वपूर्ण असून हा घटक धोरण ठरवताना महत्त्वपूर्ण ठरत आहे. आज राष्ट्र हे आर्थिक धोरणाचा प्राधाण्याने विचार करून आपले जगभर संबंध निर्माण करत आहे. या घटकाचा प्रभाव सर्वात जास्त आज राष्ट्रसत्तेच्या घटकात दिसून येतो.

राष्ट्रसत्तेच्या या घटका प्रमाणेच राजकीय घटकातील राजदूत, परराष्ट्र धोरण, राजकीय नेतृत्व हे ही घटकाचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी परराष्ट्र धोरणात वैविधता नव्हती, राजनयाचे स्वरूप मर्यादित होते व त्याचे कार्य महत्त्वपूर्ण असले तरी त्या व्यक्तीवर अवलंबून होते आज यात बदल झाला आहे. राजकीय नेतृत्व हे राष्ट्र हिताचा विचार करून निर्णय घेत आहे. आज परिषद राजनय, शिखर राजनय या सारख्यातून राजनयाचे स्वरूप व्यापक झाले पण यात पारदर्शकताही आली आहे. विविध जागतिक संघटनाच्या बैठकीतून व प्रादेशिक संघटनांच्या सहभागात राजकीय नेतृत्वाची कसोटी लागते व यातून राष्ट्रसत्तेचा प्रभाव पडतो आहे. आज राष्ट्रप्रमुख विविध देशाचे दौरे करतात या माध्यमातून ते संबंध वाढवताना आपले राष्ट्रहित जपत असतात. याचप्रमाणे यावर प्रत्येक राष्ट्रातील राजकीय व्यवस्थेचाही प्रभाव पडतो. तेथील व्यवस्थेनुसार राष्ट्रसत्तेच्या वाढीवर प्रभाव पडतो. आज जगात विविध व्यवस्था कार्यरत असून प्रत्येक व्यवस्थेत मूलभूत फरक आढळतो पण हाही घटक नव्याने राष्ट्रसत्तेच्या घटकासाठी महत्त्वपूर्ण आहे.

राष्ट्रसत्तेच्या घटकात विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रभाव सध्या प्रकर्षाने जाणवतो. यामुळे राष्ट्रसत्तेच्या इतर घटकात मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता वाढवत आहे. आज मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नवनवीन संशोधन, होत आहे. आयटीक्रांती, मोबाईल क्रांती, इंटरनेट क्रांती यासारख्या घटकांनी जग खेडे बनवले आहे. त्यामुळे कृषी, आरोग्य, सैन्य अशा विविध घटकात बदल घडवला आहे. आज प्रत्येक देश याचा वापर करून आपली राष्ट्रसत्ता वाढवत आहे.

अशाप्रकारे राष्ट्रसत्तेच्या या विविध घटकाचा बदलता परिणाम आपणास प्रत्येक राष्ट्रात दिसून येतो. आज आर्थिक व तंत्रज्ञान हे घटक अत्यंत प्रभावी ठरत असून प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेत व स्वरुपात यामुळे बदल झालेला आहे.

**समारोप** :

राष्ट्रसत्तेचे पूर्वीचे भौगोलिक, खनिसंपत्ती, सैन्य शक्ती व इतर घटक आजही राष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण आहे पण या घटकाचा प्रभाव मर्यादित होवून आर्थिक, विज्ञान तंत्रज्ञान, राजकीय बदल, विविध संघटना याचा प्रभाव वाढला आहे. या घटकात एकदम बदल न होतो सातत्यपूर्ण परिस्थितीतूनचा बदल होत गेले आहेत पण या घटकांचा वापर प्रत्येक राष्ट्र पूर्वी ही व आताही आपले राष्ट्रीय हित जपण्यासाठी करताना दिसून येतात.

**संदर्भ :**

१.सिंहल एस. पी.:अर्थराष्ट्रीय राजनिती, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा, २०१०.

२.सिंहल एस. पी:अंतर्राष्ट्रीय संबंध, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा, २००८.

३. प्रतिभा भोरजार संपा :२१ व्या शतकातील भारतातील परराष्ट्र धोरणापुढील आव्हानाचे व्यवस्थापन, आधार प्रकाशन, अमरावती,२०१४.

# बदलत्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत महिलांची भूमिका

**प्रा. रमेश एम. राठोड** राज्यशास्त्र विभाग प्रमुख श्री वसंतराव नाईक महा. धारणी, जि. अमरावती.

---------------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावना:** २१ व्या शतकाच्या सुरूवातील माहिती-तंत्रज्ञानाच्या विस्फोटांमुळे तांत्रिक प्रगती झाली, त्याचा परिपाक म्हणजे संगणक, मोबाईल, इंटरनेटच्या वाढत्या वापारामुळे समाजात आज फार मोठा बदल घडून येत आहे. आजचे युग हे 'विचारप्रणाली' चे युग म्हणुन ओळखले जाते. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारमतवादाच्या धोरणाचा परिणाम सध्या स्त्री-जीवनावर सुध्दा मोठ्या प्रमाणात दिसुन येत आहे. आज महिला पुरूषाच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात कामे करत आहे. याचा परिणाम महिलापुढे नवनवीन आष्टाने सातत्याने पुढे येत आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ ते ३५ मध्ये स्त्री-पुरूषाच्या व्यक्तीमत्व विकासासाठी समान मुलभूत हक्काची तरतुद केली आहे. एवढेच नव्हे तर सामाजिक, राजकीय, आर्थिक न्यायाची व्यवस्थाही भारताच्या संविधानात समान स्वरूपाची आहे. परंतु काय खरचं ! स्त्रियांना सामाजिक न्याय मिळाला आहे ? काय स्त्रियांना त्यांचे राजकीय अधिकार मिळाले आहे. भारतीय स्त्री आर्थिक बाबतीत स्वावलंबी बनली आहे ? संशोधनांती सर्वच प्रश्नांची उत्तरे नकारात्मक देता येईल. कारण आज भारतीय समाजामध्ये स्त्री-भृण हत्या, बलात्कार, स्त्री-अत्याचार, हुंडाबळी, अपहर, निर्भयासारखे दिल्ली प्रकरण थांबले नाही.

'महिला सक्षमीकरण' करतांना त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याबरोबरच त्यांना घटनेने दिलेले मलभुत अधिकार मिळावे त्यांचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा उचवावी, महिलांना शिक्षण, संपत्ती व सत्तेत समान हक्क मिळावे. त्याचबरोबर स्त्रीयांचे लैंगिका अत्याचार, हुंडाबळी, स्त्री-भृणहत्या, बलात्कार, छेड्छाड यासारखे स्त्री अत्याचार थांबणे गरजेचे आहे. आज जग बदलते आणि विस्तारते आहे. जगण्याची शैली बदलते आहे. नवनवीन आव्हाने आपले दरवाजे ठोठावत आहेत. कालानुरूप आपण ही बदलतो आहोत. पण पुरेसे आपले मानसिक आणि वैचारीक जग विस्तारते काय? आपण अज्ञान आणि कालबाह्य मुल्यांना नकार देतो आहोत का? जे नवे आकाराला येत आहे. त्यात स्त्रियांना कोणते स्थान आहे ? या सर्व गोष्टी सारासार विचार करणे आणि त्याचा शोध घेणे गरजेचे आहे. आज राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रियांचे कर्तृव्य बहरत असतांना त्यांना अन्त्युच्या सन्मान प्राप्त होत असतांना त्याचा लाभ किती महिलांना होत आहे हे बघणे उद्‌बोधक ठरेल.

बदलत्या सामाजिक परिस्थितीत महिलांची भूमिका :-प्राचीन काळी भारतात अनेक स्त्रियां सुशिक्षित होत्या. गार्गी, मैत्रेथी यांच्या सारख्या विदुषीना समाजमान्यता होती. त्या वेद अध्ययनात अग्रेसर होत्या. लीलावती यांनी सभा मंडप गाजवलेल्या होता. ज्ञानांची कवोड स्त्रियांसाठी खुली होती.

मध्ययुगीन काळात स्त्री फक्त सेवा करणारी राहिली. घरात व शेतात राबतांना ज्ञानांचे भंडार तिच्यापासून दूर राहिले रूढी परंपराचा पगडा अधिक झाल्याने हळूहळू स्त्रियांचे स्वातंत्र्य नष्ट होऊन त्यांचे कार्यक्षेत्र स्त्रियांकडे पाहिलं जाऊ लागलं. प्रजनन करून वंशवृध्दी करणारी, घर सांभाळणारी, पुरूषप्रधान संस्कृतीच्या ओझ्याखाली दबलेली अशीच सर्वसामान्य स्त्रियांची प्रतिमा होती.ब्रिटिशांच्या काळापासून स्त्रियांच्या स्थितीत हळूहळू सुधारणा होत गेली. आज भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान मुलभूत हक्क, व्यक्तीमत्व विकासाच्या समान संधी दिल्या या संदर्भात पंडित नेहरू म्हणतात...

***"You can tell the condition of nation by looking at the status of women."***

समाजाने स्त्रीला कोणते स्थान दिले यावरून त्या समाजाची प्रगती व संकृतीची जाणीव होते. समाजात स्त्रीचे स्थान हे तिने संपादन केलेल्या शिक्षणावरून निश्चित होत असते. म्हणून स्त्री साक्षरतेकडे जास्तीत जास्त लक्ष पुरविणे महत्वपूर्ण ठरते. जग झपाट्याने व अधिक गतीने बदलते आहे. आज प्रत्येक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून येत आहे. यामध्ये आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, माहिती व तंत्रज्ञान, सण-उत्सव, समारंभ, चालिरीती-रिवाज, परंपरा, सामाजिक ग्रामीण, शहरी, सर्वच क्षेत्रात तळागाळातून बदल घडून येत आहे. यात कृषी, वैद्यकीय, अभियांत्रिकी आदी क्षेत्राला अपवाद नाही. वाहतूक मार्ग, वाहतुकीची साधने, त्यांची गती, पर्यावरणीय बाबी, संदेशवहन, संपर्क माध्यमे, विविध साधने यामध्ये खुप मोठा बदल घडून येत आहे. या सर्वांमध्ये स्त्रीची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.

सामाजिक भुमिका

१.स्त्री शिक्षणावर भर देणे
२.सुसंस्कृत नागरीक घडविणे
३.स्त्री-भ्रूण हत्या रोखणे
४.स्त्री-पुरूष समानता निर्माण करणे
५.स्व-सुरक्षिततेची काळजी
६.हुंडाबळी, बालविवाह विरोध
७.स्त्री-अत्याचाराविरूध्द आवाज
८.अनिष्ट रूढी-प्रथा परंपरांतून मुक्ती




९.अंधश्रध्दा निर्मुलन
१०.स्वावलंबी बनणे
११.पर्यावरण जागृती
१२.आरोग्य जागृती
१३.सामाजिक ऐक्यासाठी प्रयत्न
१४.प्रशासन आणि राजकारणात सहभाग

आजची स्त्री उच्चशिक्षित झाली. पण तेवढीच संकुचित, स्वार्थी झाली. मी-माझे कुटुंब, माझी नोकरी, माझे पद, माझी प्रतिष्ठा, साडी-गाडी-माडी या चक्रव्युहात अडकली. शिकलेल्या स्त्रीने घराला पुढे नेले पण दाराचे काय? आपलेच घर आपलीच मुलं सुसंस्कारीत बनवणे, एवढीच मर्यादित जबाबदारी स्त्रियांवर नाही. तर आपण ज्या समाजात राहतो, तो समाज, गाव, प्रदेश, देश सुधारण्याची जबाबदारी ही आज स्त्रियांवर आली आहे. समाजामध्ये वावरतांना ही मी स्त्री आहे. म्हणून इतरांशी मला स्त्री-दाक्षिण्य दाखवावे, मगच मी पुढे जाणार ही रडखाऊ भुमिका सोडून द्यावी लागणार आहे. ९३% आरक्षणाच्या कुबड्याची वाट न पाहता गुणवत्तेच्या जोरावर तिला आपला अधिकार सिध्द करावा लागणार आहे. कारण मुक्तअर्थव्यवस्थेत आरक्षण ही संकल्पनाच मोडीत निघणार आहे.

स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू नसून ती समाजातील एक जीवंत -घटक आहे. आज जवळपास स्त्रिया नोकरी व्यवसाय व इतर कामासाठी घराबाहेर पडतात, बाहेर काम करतांना तिला विविध समस्यांचा सामना करावा लागतो. स्त्री म्हणून हेटाळणी करणे, विनयभंग, हुंडाबळी, बलात्कार, मारहाण, प्रसंगी खुन, अॅसीडहल्ले, अपहरण, इत्यादी. समस्यांना सामोरे जावे लागते. जेव्हा महिला रात्रीच्या वेळी सुखरूपपणे घरी पोहचतील तेव्हाच खऱ्या अर्थाने भारताला सामाजिक स्वातंत्र्य मिळाले आहे. असे मी समजेन व मानेन. असे पंडीत नेहरू स्त्री विषयी बोलतांना म्हणत. नेहरूंनी महिलांना पूर्ण स्वातंत्र्य हे स्वप्न पाहिलं होतं. पण भारताला स्वातंत्र्य मिळून ६७ वर्ष झाली. अद्यापही त्यांचे वास्तव चित्र आज आपणाला पहायला मिळालं नाही. उलट तिच्यावर अन्याय वाढत आहे. बलात्कार, लैंगिक शोषण, छळ यांनी ती ग्रासली आहेत. आपल्याला प्रश्न पडतो हेच आहे का स्त्री स्वातंत्र्य?

**बदलत्या राजकीय क्षेत्रातील महिलांची भुमिका :-**

राजकारण हे समापरिवर्तनाचे एक महत्वाचे साधन असल्याने स्त्रियांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यावर खरी स्त्री-पुरूष समानता अवलंबून आहे. स्त्री ही राजकीय दृष्टिने जेवढी जागरूक होईल, तेवढाच तिचा राजकीय सहभाग अधिक वाढेल. याचा परिणाम महिलांचे राजकीय सामाजिकीकरण अधिक प्रमाणात होईल. स्त्रिया ज्या ज्या वेळी राजकारणात सक्रिय झाल्यात, संसदेत संसद-सदस्य म्हणून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाकडे त्या राजसत्तेचे लक्ष आकृष्ट करू शकल्या व त्या अन्यायाविरूध्द कठोर उपाययोजना करायला राजसत्तेला भाग पाडू लागल्या. आज स्त्री ही राजकारणा बद्दल उदासिन दिसून येते. परंतु राजकारणाबद्दलची अशी उदासीनता दाखवून इत:वर स्त्रियांनी चालणार नाही. इतर क्षेत्रात बुध्दीमान आणि कर्तृत्ववान स्त्रियांनी आजच्या काळात आघाडीवर जायचा प्रयत्न करणे ही आजच्या दृष्टीने आवश्यक बाब आहे. काही विशिष्ट मुल्ये उराशी बाळगून आलपे व पर्यायाने समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात राजकारणाच्या क्षेत्रात स्त्रीने अग्रेसर झाले पाहिजे. राजकारण या साधनाचा वापर करून समाजाला पवित्र आणि मंगलमय करण्यासाठी एका नव्या जोमाने या क्षेत्रात पदार्पण करून मोठ्या संख्येने पुढे आले पाहिजे.

१६ व्या लोकसभेसाठी निवडणूक लढविणाऱ्या एकूण ५४३२ उमेदवारापैकी महिलांची संख्या फक्त ४०२ म्हणजे ७ टक्के होती. २००९ च्या निवडणुकीत ही संख्या ५५० होती. तर १९९१ च्या निवडणुकीत महिला उमेदवारांची संख्या ६०० होती. दिड शतकात निवडणुक लढणाऱ्या महिलांची संख्या घटत घटत १२ टक्क्यावरून ७ टक्क्यावर आली. १६ व्या लोकसभेत ५४३ पैकी ६१ महिला आहेत. म्हणजे महिलांचे प्रमाण ११ टक्के आहे. २००९ च्या निवडणुकीत ५९ महिला लोकसभेवर गेल्या होत्या. म्हणजे ५ वर्षात फक्त २ महिला वाढल्या हे अधोगतीचे द्योतक आहे. आज ही भारतीय स्त्री सामाजिक न्याय, समता, विश्वबंधुता या संकल्पनेपासून ती अधिक दूर आहे. शासनाने महिलांसाठी ३३% किंवा ५०% जागा शिक्षण व राजकारणामध्ये आरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु अजून ही महिलांना या क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करता आले नाही. म्हणजे पुरूषांची मक्तेदारी आज ही राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. महिला त्या पदांवर नामधारी म्हणून स्थानापन्न आहेत. त्या अधिकार वापरू शकत नाही व निर्णय घेऊ शकत नाही असे आजचे सत्य व वास्तव आहे.

महिलांनी राजकीय क्षेत्रातील आव्हान मोडून काढायचे असेल तर त्यावर आपला ही अधिकार आहे हे सर्वप्रथम स्त्रीने मनात ठसवावे. या क्षेत्रात प्रावीण्य मिळवायचे असेल तर आत्मविश्वास, धडाडी, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण अंगी बाळगावे लागतील. प्रत्येक गोष्ट समजावून घेऊन निर्णय प्रक्रियेत सामील व्हावे लागेल. मी म्हणजे रबर स्टॅम्प नाही हे कर्तृत्वानेच सिध्द करावे लागेल. पहिल्या महिला IPS अधिकारी किरण बेदी आपल्या मजल दर मजल या ग्रंथामध्ये म्हणतात, जो पर्यंत स्त्रिया स्वत:मधील निर्णय घेण्याची क्षमता आणि आत्मविश्वास या गुणाचा विकास करून घेत नाही, तो पर्यंत त्या पदरांमध्ये तोंड लपवून रडतीलच!

२१ व्या शतकात स्त्री परिवर्तनाचे वारे भारतात वाहू लागले आहे. स्त्रियांना आज स्वातंत्र्याची नवनवीन दालने खुली झाली आहे. आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याबरोबर राजकारणात ही महिला राज येऊ लागले आहे. आजच्या परिस्थितीत मात्र स्त्रिया राजकारणात मुक्तपणे वावरतांना दिसतात. लोकसभेत पंतप्रधान मनमोहनसिंग यांना अभ्यासपूर्ण जाब विचारणाऱ्या आजच्या तरूणाईचा आदर्श माजी विरोधी-पक्ष नेत्या सुषमा स्वराज, एका बलाढ्य पक्षाच्या धुरंधर व मातब्बर अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पंतप्रधान पद नाकारून आदर्श घालून दिला असला तरी सर्व सुत्रे मात्र त्या सांभाळतात. यावरून त्यांच्या राजकीय डावपेच्याची उंची समजते. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या शिरपेचात भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान खोवला गेला. उत्तरप्रदेशाच्या माजी मुख्यमंत्री मायावती, दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शिला दिक्षित, तामिळनाडूच्या जयललिता, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उमाभारती, अंबिका

**सोनी, सर्वात तरूण महिला केंद्रिय मंत्री अनाथा संगमा, स्मृती इराणी, भावनाताई गवळी या सर्व महिला राष्ट्रीय राजकारणात आपली सक्रीय भुमिका खंबीरपणे सांभाळत आहेत.**

**महिलांसाठी राजकीय परिस्थिती पोषक नाही, असे म्हणता येणार नाही. महिलांच्या विकासाच्या दृष्टिने एक महत्वपूर्ण पाऊल म्हणजे महाराष्ट्र सरकारने ६ मार्च या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांचे आरक्षण ५०% पर्यंत वाढविण्याचा निर्णय ९ मार्च २०११ या दिवशी घेऊन खऱ्या अर्थाने स्त्रियांना अर्धे आभाळ कर्तव्य गाजवण्यासाठी मोकळे करून दिले. याचा परिपाक खालील जिल्हापरिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतमध्ये कार्यरत असलेल्या महिलांची संख्या अतिशय बोलकी आहे.**

| पंचायत राज संस्था | वर्गीकरण | एकूण | आरक्षित जागा | प्रत्यक्ष कार्यरत महिला |
|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषद | सदस्य<br>अध्यक्ष | १९६१<br>३३ | ६५४<br>११ | ६७५<br>१८ |
| पंचायत समिती | सदस्य<br>अध्यक्ष | ३९२२<br>३५१ | १३०७<br>११६ | १३३७२<br>१४८ |
| ग्रामपंचायत | सदस्य | २२३८५७<br>२७९०९ | ७४६२०<br>९२१० | ७५९५०<br>९४४८ |

**समारोप : निष्कर्ष :-**

**वरील सर्व गोष्टीचा विचार करता युग व काळ बदल जाणार आहे. बदलत्या सामाजिक चक्रांमध्ये प्रापतस्थितीला अनुसरून महिलांची भुमिका बदलत जाणार आहे. महिलांनी मनपरिवर्तन करून मानसिकता बदलून भुमिका पार पाडाव्या लागणार आहे. वेळोवेळी बदलणारी सामाजिक स्थिती, प्रश्न, समस्या, अडीअडचणी यावर मात करून आपली भुमिका निभवावी लागेल. स्त्रीशक्तीमध्ये खूप मोठी उर्जा आहे. मनोबल, हिंमत, धैर्य खचू न देता आपले जीवन कार्य पुढे घेऊन जायचे आहे.सर्व क्षेत्रातील पुरूषांची मक्तेदारी स्त्रीला संपवायची असेल तर स्त्रियांनी शिक्षणाची कास धरावी. शिक्षणामुळेच तळागळातील स्त्रियासुध्दा स्वावलंबी व आत्मनिर्भर बनेल. पुरूष प्रधान संस्कृतीचा वरचष्मा घालविण्यासाठी स्वत: स्त्रियांनीच पुढाकार घेऊन स्त्री-समस्या, स्त्री-अत्याचार विषयी जागृती करून मुळ समाजाची मानसिकता बदलण्याची भूमिका महत्वाची आहे.**

**संदर्भग्रंथ सूची :-**

१) महाजन लैला :- स्त्री मुक्ती आंदोलन :- पृष्ठ क्रं. २९
२) आचार्य वेलणकर अ.द. :- स्त्री काल, आज, उद्या :- यशोदा प्रकाशन, अमरावती १९९१
३) भागवत विद्युत :- स्त्री प्रश्नांची वाटचाल :- २००४
४) भोळे भा.ल. :- भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे पब्लिकेशन अँड कंपनी, नागपूर २००३
५) डॉ. गायकवाड प्रमोद :- स्त्रियांच्या समस्या एक अभ्यास, अथर्व पब्लिकेशन, जळगांव
६) प्रा. सावंत एस.डी. :- आधुनिक भारताच्या जडणघडणीत महिलांचे योगदान
७) दै. हिंदुस्थान :- शनिवार दि. १० ऑक्टो. २०१३
८) लोकराज्य :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मार्च २०१०, मार्च २०११

# महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता

प्रा.डॉ. सुभाष लोहे, श्री समर्थ महाविद्यालय आष्टी,जि.वर्धा

---

महात्मा गांधीजींच्या राजकीय, आर्थिक, चिंतनाचा पाया अध्यात्मावर आधारित आहे. त्यांच्या जीवनावर रामायण,महाभारत,भगवदगीता,वेद,उपनिषद या हिन्दू धर्मग्रंथातील तत्वज्ञानाचा जबरदस्त प्रभाव होता. बायबल.कुराण या खिस्ती व मुस्लिम धर्मग्रंथांचेही त्यांनी अध्ययन केले होते. महात्मा गांधींचे वैचारिक विश्व फार मोठे होते,विचारांच्या क्षेत्रात गांधीजींची तुलना फक्त ॲरिस्टॉटलशीच केली जावू शकते. ॲरिस्टॉटलचे लिखान व्यापक आहे, तसेच अनेकविध विषयांवर गांधीजींनी आपले विचार व्यक्त केले आहे. गांधीजींचे एकुण जीवनच श्रेष्ठ नैतिक दर्जाचे होते.

राजकारणाचे आध्यात्मिकीकरण– गांधीजींना राजकारणाचे आध्यात्मिकीकरण हवे होते. धर्म आणि राजकारण सोबत असले पाहिजे, असे ते म्हणत.विवेकानंद म्हणाले, "धर्म हा भारताचा प्राण आहे," राजकारणातून धर्म वजा केल्यास राजकारण भ्रष्ट होईल.आज गांधीजींच्या या विचारांची प्रचीती येत आहे. स्वातंत्र्यानंतर सेक्यूलॅरिझम,धर्मनिरक्षेता, निधर्मीपणा यांचे सोयीचे अर्थ लावून राजकारणातून धर्माला हद्दपार केले. राजकारणातील नैतिकता संपुष्टात आली. धर्माचे बाबतीत स्वामी विवेकानंदांचे विचार व गांधीजींच्या विचारात एकदम साम्य आहे. विवेकानंद म्हणतात,"धर्म हा भारताचा प्राण आहे."योगी अरविंद,लोकमान्य टिळक यांनी सुध्दा असेच विचार मांडले आहेत.या महापुरुषांना धर्माचा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. धर्म हा व्यक्तिला समष्टीशी जोडतो, व्यक्ती व समष्टीला चराचर सृष्टीशी जोडतो. व्यक्ती हा सृष्टीचा अभिन्न घटक आहे. व्यष्टी, समष्टी व सृष्टी यांना परस्परांशी जोडून ठेवणारे तत्व म्हणजे धर्म.

भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने धर्म ही वैश्विक संकल्पना आहे. "वसुधैव कुटुम्बकम" संपूर्ण विश्व हे एक कुटुम्ब आहे. अशी हिन्दुस्थानच्या सामान्य माणसाची धारणा आहे.परस्पर

समन्वय,सौहार्द हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय आहे. धर्माचा संबंध जसा नीतिमत्तेशी आहे, तसाच कर्तव्याशी पण आहे. राजधर्म, शिक्षकधर्म, शेजारधर्म , व्यक्तिधर्म, कुटुम्बधर्म , समाजधर्म येथे धर्म म्हणजे कर्तव्य. या दृष्टिने महात्माजींना राजकारणाचे आध्यात्मिकीकरण अपेक्षित होते. निधर्मी राजकारणाला शक्य तेवढया लवकर तिलांजली देणे आज काळाची गरज झाली आहे. गांधीजींचे जीवनच मुळी धर्मप्रधान होते. धर्माशिवाय जीवन ही कल्पनाच ते करू शकत नव्हते. गांधीजींच्या शब्दातच सांगायचे तर,"मेरा जीवन धर्म के सहारे चल रहा है।

मै कह रहा हूँ कि मेरी राजनीति के मूल मे धर्म ही है।"एका पत्रामध्ये गांधीजींनी लिहिले होते,"जिसका जीवन धर्म मे रंगा हुआ है उसके अनुसार राजनीति और अर्थशास्त्र धर्म के ही अंग है और वह उनमेसे एक को भी छोड नही सकता।"4 ऑग. 1919 ला जी.एस.अरुंडेल यांना लिहिलेल्या पत्रातील लिखान गांधीजींची धर्माप्रती असलेली जवळीक प्रकट करते. ते लिहितात, मेरे मन का झुकाव राजनीति की ओर नही, धर्म की ओर है। राजनीति में मै भाग लेता हुँ, क्यों की मेरे ख्याल से जीवन का एक भी अंग ऐसा नही, जिसे धर्म से अलग किया जा सके। गांधीजींचे राजकीय विचार, धार्मिक विचार, सामाजिक विचार परस्पर पूरक आहेत. कारण त्यांचे चिंतनाचा आधारच भारतीयत्व आहे.

संकट आधुनिक सभ्यतेचे– इंग्रजांच्या शाळांमधील शिक्षणातून एक इंग्रजाळलेला मध्यम वर्ग त्याकाळी निर्माण झाला होता. हा वर्ग स्वतःला उच्चभ्रू व आधुनिक समजत होता. त्यांचेबाबत गांधीजी म्हणतात, भारतावरील खरे संकट साम्राज्यवादाचे नाही,तर तत्कालीन आधुनिक सभ्यतेचे आहे. "हिन्दुस्थान इंग्रजांच्या टाचेखाली नव्हे, तर आधुनिक सभ्यतेच्या टाचेखाली भरडला जात आहे." त्यामुळे हिन्दुस्थान धर्मभ्रष्ट (अनैतिक) होत चालला आहे. गांधीजींचे हे विधान आजच्या स्थितीत तंतोतंत लागू पडते आहे. चंगळवाद,अमर्यादित भ्रष्टाचार यांचा आज बोलबाला,व्यवहारातील शुचिता जवळ जवळ संपलेली,युवा पिढी व्यसनाधिनतेकडे चाललेली,राजकारणातील जीवघेणी स्पर्धा,सत्तेच्या अतिरेकी केन्द्रीकरणातून सरंजामशाहीची स्थिती, राजकीय पक्षांवर एकाच घराण्याची मालकी.आजच्या भारताचे हे भयानक स्वरुप. क्षणभर कल्पना करु, आज गांधीजी हयात असते तर,त्यांनी आधुनिक जीवन शैलीच्या हव्यासाविरोधात व त्यातून उदयास आलेल्या या भ्रष्ट नेत्यांच्या व समाजधुरिणांच्या विरोधात आंदोलन छेडले असते.

अस्पृश्यतेसंबंधी मत–गांधीजीं अस्पृश्यतेच्या विरोधात होते. समाजातील स्पृश्य –अस्पृश्यता ,उच्च–निचता त्यांना मान्य नव्हती. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी आयुष्याच्या अंतापर्यंत प्रयत्न केले.या प्रयत्नांना मोठया प्रमाणात यश मिळाले. अस्पृश्यता समाजाच्या उत्थान कार्यातील सर्वात मोठी बाधा आहे, असे गांधीजी मानत होते. स्पृश्य –अस्पृश्य भावना दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या साबरमती आश्रमात एका हरिजन कुटुंबाला आश्रय दिला. अस्पृश्यतेला गांधीजी सामाजिक विकृती असे संबोधत होते. अस्पृश्यता निवारणासाठी स्पृश्य समाजाचे ५दय परिवर्तन होणे व त्या नेतृत्वाने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे डॉ.आंबेडकर म्हणाले होते. अस्पृश्यतेर समाज जेवढया अधिक संख्येने पुढे येईल,तेवढी समाजातील ही विकृती लवकर नष्ट होईल,असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते. आज अस्पृश्यता नाहीशी झाली असली तरी,समाज मात्र राजकारणाने जाती,पंथ व गटांमध्ये विभागला आहे.तथाकथित सेक्यूलर राजकारणाने मतपेढयांच्या नादापायी, प्रांतवाद, भाषावाद, अल्पसंख्यकांचे अवाजवी तुष्टीकरण चालविले आहे. सत्तेच्या राजकारणात समाज व राष्ट्रहिताचा बळी दिल्या गेला व आजही दिल्या जात आहे. गांधीजींनी आपल्या "हिन्द स्वराज" या पुस्तिकेत भारताने ब्रिटीशांची पार्लमेंट्री सिस्टीम स्विकारु नये,असा इशारा दिला होता. गांधीजींच्या विचारांकडे त्यांच्याच वारसदारांनी दुर्लक्ष केले. त्याचे दुष्परिणाम देश व समाज आज भोगत आहे.

भारताचे विभाजन व गांधीजी– स्वातंत्र्य संग्रामातील गांधीजींचे योगदान व त्यांचे स्थान पराकोटीचे उच्च होते. स्वातंत्र्य आंदोलनात जनतेचा प्रचंड सहभाग, यामुळे ब्रिटीश हादरले होते. मुस्लिम लिग ला हाताशी धरुन आंदोलनात खीळ घालण्याचे त्यांचे डावपेच लपून राहिले नव्हते. व्दि–राष्ट्रवादाचा मुद्दा पुढे केला जात होता. गांधीजी पूर्णपणे भारताच्या विभाजनाचे विरोधात होते.इ.स.1928च्या कलकत्ता अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा संकल्प केल्या गेला. डिसें 1929 लाहोर अधिवेशनात उपस्थित प्रतिनिधींनी संपूर्ण स्वराज्याची शपथ घेतली. 26जाने 1930 ला वसंत पंचमीचे दिवशी सकाळी 10 वाजता उपस्थित सर्वांनी संपूर्ण स्वराज्याची जी प्रतिज्ञा घेतली, ती गांधीजींनी लिहिली होती. इ.स.1940 ला मुस्लिम लिग ने पाकिस्तान निर्मितीचा प्रस्ताव लाहोर अधिवेशनात मंजूर केला, त्यावरील गांधीजींची प्रतिकिया "हरिजन" या साप्ताहिकात प्रसिध्द झाली, गांधीजी म्हणतात, "भारताचे विभाजन या कल्पनेनेच माझा आत्मा थरारतो आहे; ज्या भूमिला परमेश्वराने निर्माण केले,तिला मानूस कसा विभागू शकेल?" याही पुढे गांधीजी म्हणतात, "आधी माझ्या शरीराचे तुकडे होतील, नंतरच भारताचे विभाजन होईल." यावरून गांधीजींचा फाळणी विरोध स्पष्ट होतो. नंतरही गांधीजी आपल्या भुमिकेवर ठाम होते. 8 मार्च 1947 ला कॉंग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीत त्यांनी ब्रिटीश पार्लमेंटने मंजूर केलेल्या प्रस्तावाचा विरोध केला. ज्यामध्ये एक किंवा दोन राज्यांच्या स्वरुपात भारताला स्वातंत्र्य देण्यात येईल असे म्हटले होते. लॉर्ड माऊंट बॅटन यांचेशी झालेल्या चर्चेतही आपला फाळणी विरोध त्यांनी स्पष्टपणे सांगितला. ब्रिटीशांचा भारत विभाजनचा डाव उधळून लावण्याची शक्ती एकटया गांधीजींमध्ये आहे, हे माऊंट बॅटनने ओळखले होते. त्यामुळे त्याने घाईगर्दीतच विभाजनाची योजना तयार करुन,उर्वरित कॉंग्रेस नेत्यांशी व मुस्लिम लिग शी वाटाघाटी करुन भारताचे विभाजन करविले. यावेळी गांधीजी कॉंग्रेस मध्ये एकाकी पडलेले दिसतात. आज सारा भारत विभाजनाचे दुष्परिणाम भोगतो आहे.

राष्ट्रीय एकतेच्या संदर्भात –

गांधीजी म्हणतात, सुरवातीपासून हा देश एक होता. वेद आणि उपनिषदांच्या काळापासून हा देश एक होता, याविषयी संशयाला काही जागाच नाही. अठरापगड जाती, अनेकानेक पंथ, संप्रदाय, धार्मिक मते आणि धर्म असूनही या देशाचे एकत्व नेहमीच अक्षुण्ण आणि अखंडित होते,याला इतिहास साक्ष आहे, असे गांधींचे मत होते. प्राचीन काळी लोक रामेश्वर, जगन्नाथपुरी, हरिव्दार अशा देशाच्या वेगवेगळया टोकांना असलेल्या पवित्र स्थळांची यात्रा करीत. यामागे केवळ धार्मिक हेतू नव्हता, कारण ईश्वर भजन तर घरबसल्याही करता येते, परंतु या भूमीचे जे नैसर्गिक व भौगोलिक एकत्व होते, त्याचे रुपांतर एक प्रकारे राष्ट्रीय एकतेच्या भावनेत व्हावे, हा या प्राचीन प्रथा, परंपरांचा खरा उद्देश होता. हे राष्ट्रीयत्व सांप्रदायिक नव्हते, तर वेगवेगळया जाती, धर्म, पंथ यांच्यावर उठणारी अशी एक एकत्वाची देशव्यापी जाणीव होती. त्याच्या बुडाशी बंधुभाव होता.

वर्तमान परिस्थितीत गांधी विचारांची आवश्यकता– विश्वातील अनेक विचारक, दार्शनिक, समाजसुधारक या सर्वांमध्ये गांधीजी युगपुरुष होते. 20 व्या शतकात भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाला त्यांनी सर्वव्यापी, सर्वस्पर्शी स्वरूप प्राप्त करुन दिले. सामान्य मानसाला आंदोलनासी जोडून ब्रिटीश सत्तेला झुकविण्यास बाध्य केले. एकप्रकारची ती प्रचंड जनकांती होती आणि या कांतीचे नायक निर्विवादपणे गांधीजी होते.

गांधीजींनी संपूर्ण भारताचे भ्रमण करुन सर्व प्रकारच्या समस्यांचे गंभीरपणे चिंतन केले, आणि या समस्यांच्या निवारणासाठी सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, उपवास या पवित्र साधनांना सामाजिक स्वरुप प्रदान केले. गांधीजींचे विचार आणि कार्यकम म्हणजे सैध्दांतिकता व व्यावहारिकता यांचा सुंदर समन्वय आहे. कोरी भाषणबाजी व नारेबाजी त्यांना मान्य नव्हती. या गोष्टींच्या ते कठोर विरोधी होते. गांधीजी सत्याचे पुजारी होते. त्यांचे तत्वज्ञान आणि व्यवहार यात तफावत नव्हती. त्यामुळे त्यांच्या विचारांना देशातच नव्हे तर संपूर्ण विश्वात स्वीकार्यता प्राप्त झाली. आज आपल्या देशाची परिस्तिथी भयावह अशी होत आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनातून मूल्ये तीव्र गतीने नाहीशी होत आहे. राष्ट्रीय चारित्र्याचे घोर अधःपतन होत आहे. तेंव्हा मनात प्रश्न उठतो की, वर्तमान परिस्थितीत गांधीजींचे विचार आणि त्यांचे रचनात्मक कार्यकम यांचेव्दारे समाजाला दिशा मिळेल? जीवघेणी स्पर्धा, भ्रष्ट राजकारण,आर्थिक शोषण, हिंसाचार, नैतिक पतन या दुर्गती मधून बाहेर पडण्यासाठी गांधीजींनी दाखविलेल्या आध्यात्मिक मार्गाची कास धरावी लागेल .

संदर्भ–

1. हिन्द स्वराज– गांधीजी
2. महात्मा गांधींचे हिन्द स्वराज आणि नवे मन्वंतर– सु. श्री. पांढरीपांडे
3. महात्मा गांधीं और पं. दीनदयाल उपाध्याय

# पंचायतराज व्यवस्था विकेंद्रीकरणाचे राजकारण आणि आव्हाने

**प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण**. लोकप्रशासन विभाग प्रमुख राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना **ई–मेल** ptchavan72@gmail.com

पंचायतराज व्यवस्थेत खेडी हा मुलभूत घटक आहे. खेडयांच्या सर्वांगिण विकासासाठी पंचायतराज व्यवस्था महत्वाची भूमिका पार पाडते. स्वयंम शासन हे पंचायत राज्यामधील महत्वाचे सूत्र असते. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायतराज व्यवस्थेचे मुलभूत पायावर ग्रामीण भागात सबलीकरण करण्याची गरज आहे. पंचायतराज व्यवस्थेचे सबलीकरण आणि सुधारणा तसेच विश्वासर्हता वृध्दीची नवी योजना आहे. पंचायतराज योजनेच्या सबलीकरणाचा विचार करता भावी काळात निर्णय क्षमता, कृती आणि अंमलबजावणी यावर भर देणे आवश्यक आहे. याकरीता सध्या पंचायत राज्य व्यवस्थेतील विकेंद्रिकरणाचे राजकारण आणि आव्हाने यांना जाणून घेणे आवश्यक आहे.

**पंचायतराज व्यवस्थे बाबत सद्यःस्थिती** :– केंद्र सरकारने 1994 मध्ये 73 वी घटनादुरूस्ती केली. 24 एप्रिल 1994 ला या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. महाराष्ट्राने पंचायतराज कायदा तातडीने लागू केला. 'रयतेचे राज्य' या संकल्पनेखाली विषयांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया 2000 ते 2004 दरम्यान जोरात झाली. हस्तांतरीत झालेले विषय चार वर्षात जिल्हा परिषदांना मिळाले. मात्र त्यानंतर ही चळवळ थांबल्याचे चित्र आहे. ग्राम विकास विभागाने गेल्या पाच वर्षात तीन वेळा मंत्रिमंडळापुढे विषय हस्तांतराचा प्रस्ताव सादर केला. त्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली नाही.

**अंमलबजावणी** :– पंचायतराज कायदा अस्तित्वात आल्यानंतर राज्य घटनेत 243 (जी) हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. राज्यसरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्याचे यात नमुद करण्यात आले आहे. राज्यसरकारच्या हाती कारभार असलेल्या 29 प्रमुख विषयांचे हस्तांतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडे करण्याचे बंधनकारक करण्यात आले होते. स्थानिक प्रश्नांशी निगडीत असलेले विषय स्थानिक पातळीवरच सुटावे. त्यासाठी मंत्रालयात फेऱ्या मारायची वेळ येऊ नये. हा मागाचा हेतू होता. मात्र सोळा वर्षात 11 विषयांचे हस्तांतर राज्य सरकारने केले आहे. त्यातही अकरा विषय जसेच्या तसे स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सोपविलेले नाहीत. तर यामधील काही योजनांचा कारभार सरकारने जिल्हा परिषद, पंचायत समित्या, आणि ग्रामपंचायतीकडे दिला आहे.

**शासनाने हस्तांतरीत केलेले विषय** :–

- **सूक्ष्म सिंचन, पाणी व्यवस्थापन आणि पाणलोट क्षेत्र विकास** :– यामधील केवळ सूक्ष्म सिंचन विषय सध्या सुरू आहे. पाणी व्यवस्थापन आणि पाणलोट विकासाबाबत अधिकारांचे हस्तांतर झालेले नाही.
- **पशुसंवर्धन व दुग्ध विकास** :– केवळ गायी–म्हशी वाटप करण्यापुरता मर्यादित विषय प्रगती समाधानकारक नाही.
- **ग्रामीण घरबांधणी** :– केवळ नावापुरता हस्तांतरित झालेला विषय केंद्र आणि राज्याच्या घरकुल योजनेपलीकडे काम नाही.
- **पिण्याचे पाणी** :– अत्यंत महत्वचा विषय फक्त देखभाल आणि दुरूस्ती पुरताच स्थानिक स्वराज्य संस्थांचा अधिकार मोठया योजनांसाठी मंत्रिस्तरावर मान्यता जीवन प्राधिकरण जलस्वराज्य या योजनांचा प्रभाव नेमक्या किती योजना दिल्या हे स्पष्ट नाही.
- **अपांरपारिक ऊर्जास्त्रोत** :– स्थानिक स्वराज्य संस्थांना काहीही अधिकार नाहीत. कोणतेही धोरण स्पष्ट नसलेले विषय.
- **शिक्षण** :– प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणासह हा विषय जिल्हा परिषदेकडे देण्यात आला. मात्र शाळांच्या मान्यता, अधिकाऱ्यांच्या बदल्या याचे अधिकार मंत्रालयातच वापरले जातात.
- **तंत्रशिक्षण आणि व्यवसाय शिक्षण** :– काहीही अर्थ नसलेले विषय यासाठीच्या सर्व मान्यता शाळांची निवड मंत्रीच करतात. त्याच्या मान्यते शिवाय कोणतेही अनुदान अथवा पायाभूत सुविधा दिल्या जात नाहीत.
- **सांस्कृतिक कार्यक्रम** :– विषय देतांना सरकारला काय अभिप्रत आहे हे स्पष्ट नाही. त्यामुळे गुलदस्तातच असलेला विषय
- **आरोगय आणि स्वच्छता** :– प्राथमिक आरोग्य केंद्र, रूग्णालये आणि दवाखान्यासह हा विषय जिल्हा परिषदांकडे दिला. अत्यंत बिकट अवस्था असलेला विभाग दुरावस्था आणि अनियमितपणा हीच ओळख राज्य सरकारचा हस्तक्षेप असल्याने ही अवस्था
- **महिला आणि बालविकास** :– बऱ्यापैकी काम सुरू असलेला विषय, केंद्र, राज्य सरकारच्या योजनांत आघाडीवर
- **सामाजिक न्याय** :– केवळ अपंग आणि मतिमंद एवढया पुरताच मर्यादित विषय हस्तांतरीत झाला आहे.

**हस्तांतरीत न झालेले विषय** :–

- **कृषी** :– हा विभाग हस्तांतरणाचा निर्णय झाला आहे.

जमीन सुधारणा, भू सुधारणांची अंमलबजावणी, मृदसंधारण मस्त्य सामाजिक वनीकरण आणि कृषी वने लहान जंगल उत्पादने लघु उद्योग :– अन्न प्रक्रिया उद्योगासह खादी आणि ग्रामोद्योग इंधन आणि चारा रस्ते पूल बांधणी, वाहतूक, जलमार्ग आणि तर दळणवळण ग्रामीण विद्युतीकरण :– विद्युत वितरणासह दारिद्रय निर्मूलन कार्यक्रम युवक आणि अपांरपारिक शिक्षण ग्रंथालय बाजार आणि मेळावे कुटूंब कल्याण आर्थिक दुर्बल कल्याण : प्रामुख्याने मागासवर्ग आणि आदिवासी जमातीसह नागरी अन्नपुरवठा प्रक्रिया (शिधावाटप प्रक्रिया) सामाजिक मालमत्ता देखभाल कर1

**जिल्हा परिषदांना आर्थिक व प्रशासकीय स्वातंत्र्य नाही** :–

***आर्थिक*** – सत्तेचे विकेंद्रिकरण झाले. परंतू तरीही आज अनेक बाबतीत राज्य सरकारवरच जिल्हा परिषदांना अवलंबून रहावे लागत आहे. केंद्र सरकारकडून बाराव्य वित्त आयोगाचा निधी मिळत असला तरी त्याचे स्वातंत्र्य जिल्हा परिषद आणि पंचायत समित सदस्यांना नाही. जिल्हा परिषद व पंचायत समितींना उपलब्ध होणारा महसुली उत्पन्नावरील सेस जिल्हाधिकारी आणि आयुक्तांच्यावर अवलंबून असतो. जिल्हा परिषदांना अनुज्ञेय असणारा आणि प्रत्यक्ष मिळणारा निधी यात तफावत असते. प्रलंबित असलेला निधी मिळावा म्हणून जिल्हा परिषदेचे पदाधिकारी सरकारकडे सातत्याने पाठपुरवठा करीत असले तरी त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. याउलट मर्यादित निधीतून खर्च करण्याचे आदेश देऊन हा प्रलंबित निधी इतर बाबींकडे वळविला जातो.

**प्रशासकीय** –

आर्थिक अधिकारापुतीच मानहानी मर्यादीत नसून प्रशासकीय स्तरावरही जिल्हा परिषद पदाधिकारी व सदस्यांना कोणतेही अधिकार ठेवण्यात आले नाहीत. विकास कामे व अधिकारांचे विकेंद्रीकरण न झाल्याने जिल्हा परिषद पदाधिकारी आणि सदस्य कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवू शकत नाहीत.2

**पालक मंत्र्यांचे वर्चस्वः–**
73 व्या घटना दुरूस्तीनंतर जिल्हा नियोजन मंडळ आले. या नियोजन मंडळाचा अध्यक्ष हा जिल्हा परिषदांचा अध्यक्ष असतो. इतर राज्यांनी ते केले पण महाराष्ट्राने जिल्हा नियोजन मंडळाचे अध्यक्षपवद पालकमंत्र्यांकडे ठेवले म्हणजे आमदार व मंत्री विधान सभेत बसून राज्याचे नियोजन करणार आणि खाली जिल्हयांचा कारभार ही त्यांच्याच ताब्यात.3

**कार्यकर्त्यांची सोय :–**
सरकारला स्थानिक स्वराज्य संस्था हव्या आहेत पण केवळ कार्यकर्त्यांना सोय म्हणून या संस्थांनी फारसा काया पालट घडवू नये व लोकशाही बळकट ही करू नये अशी सरकारची अतिव इच्छा दिसते. जिल्हा परिषद ही कार्यकर्त्यांची सोय लावण्याचे हक्काचे ठिकाण बनले आहे. आमदारकीचे तिकिट मागणाऱ्यांची गर्दी याच आश्वासनावर तर कमी करता येते. राजकीय कार्यकर्त्यांना सोयीला लावण्याचे हे ठिकाण म्हणून पाहिजे जाते.4

**ठेकेदारी पध्दत :–**
स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये जे लोकप्रतिनिधी नेतृत्व करत आहेत त्याचा ही रस हा गाव सुधारण्यापेक्षा 'ठेकेदारीत' अधिक आहे. बहुतांश पंचायतराज सध्या असे ठेकेदारच चालवत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद या तिनही संस्था अनुदानासाठी आपसातच भांडत आहेत.5

**ग्रामपंचायतींना बजेट नाही :–**
महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींना बजेट नाही. सरकार बजेट देत नाही. तर थेट योजना किंवा अनुदान पाठविते बऱ्याचदा योजनांचे अनुदान जसे सरकारकडून येते. तसेच योजना राबविणारे ठेकेदार सुध्दा सरकार किंवा जिल्हा परिषदच ठरविते. म्हणजे ग्रामपंचायतींनी फक्त योजना पोहचली एवढी पोहच पावती द्यायची.6

**ग्लोबल व्हिलेज संकल्पना :–**
लोकशाही विकेंद्रीकरण जिल्हा परिषदांचे स्थान अधिक बळकट झालेच, शिवाय राजकीय विकेंद्रीकरणही घडून आले असे असतांना पंचायतराज व्यवस्था द्विस्तरीय करण्याचाविचार पुढे यावा ? उत्तर एकच विकास निधीला वाटा फुटल्या ! टक्केवारीमुळे प्रत्यक्ष योजनांवरच्या निधीला गळती लागली. त्रिस्तरीय रचना झाली तरी मंत्रालयातील गर्दी कमी झालेली नाही. उलट निर्णय प्रक्रियेतील विलंबामुळे कामे आडली. ग्लोबल व्हिलेज संकल्पना ही रचना मारक ठरत असल्याचे यातील एक कडी काढून घेण्याचा विचार पुढे आला.7

**पंचायत राज्य व्यवस्थेत राजकारणाचे संदर्भ :–**

**केंद्राचा राज्य सरकारवर विश्वास कमी –**
पंचायत राज्याच्या बंमलबजावणीत राज्य सरकार टाळाटाळ करत असल्याचे केंद्र सरकारच्या लक्षात आले आहे. या कायद्याची पुर्णपणे अंमलबजावणी होत नसल्याने योजना अंमलात आणण्याचे अधिकार थेट स्थानिक संस्थाना देण्याचे धोरण स्वीकारत आहे. देशात त्रिस्तरीय व्यवस्था स्थापन करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. जिल्हापरिषद आणि पंचायत समितीत्यांची सध्याची अवस्था पाहता या यंत्रणेमुळे प्रशासकीय रचनेत अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. गाव हा विकासाचा मूळ घटक मानून थेट निधींचे वाटप ग्रामपंचायतींना केल्यास त्याचा फायदा अधिक होईल. असे मत केंद्र सरकारचे आहे. देशात उत्तम आणि पारदर्शक प्रशासनासाठी त्रिस्तरीय रचनेचे महत्व अधिक असल्याने ग्रामपंचायतींना प्राधान्य देण्याची भूमिका केंद्राने घेतली आहे. पंचायतराज विकेंद्रीकरात ग्रामपंचायत हा मूळ विकासाचा घटक मानण्यात आला आहे. 13 व्या वित्त आयोगाच्या निधी वाटपाच्या या निर्णयाबाबत मतभेद असले तरी ग्रामपंचायतींना दिल्या जाणाऱ्या थेट निधीचे सर्व राज्यांनी स्वागत केले. मात्र यामुळे जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचे भवितव्य धोक्यात असल्याचे मानता येणार नाही. या स्थानिक स्वराज्य संस्थांचे सत्तेच्या विकेंद्रीकरण्यात अढळ स्थान असल्याने त्यांचे अस्तित्व कायम राहिले यात शंका नाही.8

**पंचायतराज व्यवस्थेत महिलांना 50 टक्के आरक्षणाचा निर्णय :–**
स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांचे आरक्षण 50 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेऊन राज्य सरकारने, सार्वजनिक जीवनात महिलांच्या अर्ध्या हक्कावर शिक्कामोर्तब केले. राज्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद नगरपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका मिळून 2 लाख 36 हजार 940 उमेदवार आहेत. 1 लाख 18 हजार 470 महिला सक्रिय राजकारणात येतील.9

**सामान्य कुटूंबातील महिलांना संधी :–**
स्थानिक स्वराज्य संस्थामधील राजकारणावर चर्चा करतांना पंधरावर्ष महिलांना या संस्थामध्ये आरक्षण दिल्याचा, महिलांना आणि त्यांचा कारभाराचा संस्थांना नेमका काय लाभ झाला यावर विचार होणारच महिलांच्या सहभागामुळे या संस्थांचा कारभार सुधारला का किंवा भ्रष्टाचार कमी झाला का, याचे होय किंवा नाही असे नेमके उत्तर देता येणार नाही. महिलांचा वावर वाढला तरी या संस्थांच्या कारभारांची बव्हंशी सूत्रे अजून ही पुरूषांच्याच हाती आहेत. हा परिवर्तनाचा प्रवास आहे. स्थित्यंतराची प्रक्रिया आहे. आता महिलांच्या कारभाबद्दल चर्चा करतांना हे लक्षात घ्यायला हवे की या प्रवासात प्रथम पुढे आल्या त्या पुढारी पुरूषांच्या नातेवाईक महिला त्यानंतर सामान्य कुटूंबामधील महिलांना संधी मिळणार आहे.10

**राजकीय धृवीकरणाचे गणित :–**
सरकारने 50 टक्के महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतल्यामुळे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून तब्बल 1 लाख 18 हजार 470 महिलांचा राजकारणात सक्रीय होतील. मध्यमवर्गीय महिला राजकारणात येण्याचे प्रमाण सत्ता नसलेल्या पक्षात जास्त आहे. तुलनेत सत्ताधारी पक्षामध्ये असणाऱ्या महिलांमध्ये हे प्रमाण कमी आहे. राजकारणाचा अनुभव असणाऱ्या सत्ताधारी या निर्णयाकडे वेगळया राजकीय धृवीकरणाचे गणित म्हणून पाहिले जात आहे. जे उमेदवार आता काही ही केले तरी निवडुन न येण्याच्या पलिकडे गेले आहेत. अशांच्या जागी महिला उमेदवार आणायच्या आणि राजकीय गाडयांची दिशाच वेगळीकडे न्यायची. अशा वेळी 50 टक्के आरक्षण मिळाले की जी नावे भ्रष्टाचार आणि गैरप्रकाराने बदनाम झाली आहेत. अशांच्या घरातील महिलांना राजकारणात आणले जाईल. पर्यायाने नवी घराणेशाही जन्माला येईल.11

**पंचायतराज विकेंद्रीकरण व्यवस्थे समोरील आव्हाने** :–शहरी–ग्रामीण भागामध्ये मुलभूत सोयी सुविधा व आर्थिक स्तरावरील तफावत वाढत असतांना स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका बदलत आहे. महत्व वाढत आहे. केंद्र व राज्यसरकार कडून थेट ग्रामपंचायतींना मिळणारा पैसा वाढत आहे. या संस्थांच्या कारभाराची दिशा आता बदलली आहे. केवळ घरपट्टी जमा करून त्या पैशातून दिवाबत्ती आणि पाणी पुरवठयाची जबाबदारी सांभाळणाऱ्या ग्रामपंचायतींचे कामे वाढले आहे. वाढत आहे. गरिबांना घरकुले, सांडपणी, व्यवस्थापन, पर्यावरण समतोल अशा विविध योजनांसाठी त्यांना अधिक वेळ द्यावा लागत आहे. गावशिवारातील शेती, कृषी पुरक व कृषी आधारीत उद्योग पाणी

या नैसर्गिक संसाधनांचा वापर व व्यवस्थापनातील पंचायतींना ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण आरोग्य, कुटूंब व्यवस्था, संस्कार मूल्यांची जपवणूक यासाठी प्रयत्न करावे लागेल.बदलत्या परिस्थितीत आपल्या राजकीय व सामाजिक व्यवस्थेतील पाया असलेल्या या संस्थांना पर्यायाने त्यांचा कारभार पाहणाऱ्यांना अधिक सक्रिय होऊन वरील आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे.12

**निर्णयाचा अभ्यास :–**

राजकारणात सक्रिय होणाऱ्या महिलांचे प्रशिक्षण, त्यांचा अभ्यास वाचन, आकलन या सगळयांची कोणतीही तयारी न करता असे निर्णय अंमलात आणल्यामुळे निर्माण होणारे प्रश्न कोणते असतील. त्यातून समाज जीवनावर काय आणि कसे परिणाम होतील याचा अभ्यास करण्याची नितांत गरज आहे.13 राज्याच्या विकासात महिलांचा वाटा वाढविण्याची ही योजना असल्याने त्याची पूर्तता करण्यासाठी दिर्घकाळ प्रयत्न करावे लागतील. समाजात निरक्षर महिलांचे प्रमाण ही लक्षवेधी आहे. त्यामुळेच पुढचे पाऊल टाकतांना मागे राहिलेल्यांचा विचार करावा लागले. राजकारणाची विश्वासर्हता सातत्याने कमी होत असल्याने राजकीय क्षेत्र आव्हानात्मक झाले आहे. आर्थिक उन्मादाने राजकारण ग्रासलेले आहे. केवळ सत्ता मिळविल्यानेच लोकांचे कल्याण करता येते. असा ठाम समज पुरूष राजकारण्यांनी निर्माण केला आहे.14 भारतीय घटनेने समता आणि बंधुभावाचे वैधानिक अभिवचन देऊन भारतीय लोकशाहीचे स्वप्न पाहिले. यामुळे स्त्रियांमधील गुणवत्ता देऊन भारतीय लोकशाहीचे स्वप्न पाहिले. यामुळे स्त्रियांमधील गुणवत्ता राजकारणासह सर्व क्षेत्रात काही प्रमाणात दिसत आहे. परंतू आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा बरोबरच संधीची उपलब्धता कमी स्वरूपात असल्याने काही स्त्रियांमागे राहिल्या कोणत्याही समाजाची गुणवत्ता समाजातील स्त्रियांच्या सहभागावर अवलंबून असते. गुणवत्ता आणि संधी या दोन गुणांची बेरीज ज्या समाजात होते त्यांचे दर्जेदार पाऊल पडते.

**जात दांडग्यांचा प्रभाव :–**

राजकीय पक्षांचा फक्त मतपेढीवर डोळा आहे. प्रत्येक घटनेकडे स्वतंत्र घटना या ॰ष्टीकोणातून पाहण्याचा पोलिसांचा कल आणि गावातील जातदांडग्या व्यक्तीपुढे दबून काम करणारे सरकारी अधिकारी गुन्हयांची वाढती संख्या हे एरवी ही शासन संस्थेपुढील एक आव्हान असतेच मात्र जेव्हा गुन्हेगारी कृत्यांनाच जात आणि समाजाच्या प्रतिष्ठेचे आवरण चढविले जाते. या कृत्यांचे उदात्तीकरण केले जाते. तेव्हा ती गंभीर समस्या बनून पुढे येते. जात पंचायतींच्या बाबतीत नेमके तसेच घडत आहे.सत्तेचे विकेंद्रीकरण करून पंचायतराज व्यवस्था आपण स्विकारली आहे. या पंचायतीचे काम प्रामुख्याने विकास कामांशी संबंधित असते. परंतू सत्तेचे विकेंद्रकरणाबरोबरच लोकशाही घटनेच्या गाभ्याशी असलेली मूल्ये झिरपली पाहिजे. अशी अपेक्षा आहे. त्या ॰ष्टीने या संस्थांनी काम करणे आणि राजकीय पक्षांनी त्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. राजकीय प्रक्रियेतून लोकशिक्षण साधने हे अलिकडे जवळ–जवळ थांबले आहे. ऑनर किलींग' हा जातीय दुराभिमानाचा भिषण अविष्कार होत आहे. त्याचेच दुषपरिणाम म्हणून आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुलांमुलींची हत्या करण्याचे प्रकार जात पंचायतीच्या न्याय निवाडयात पहावयाला मिळत आहे.15

**धनदांडग्यांचा प्रभाव :–**

ग्रामपंचायतीची निवडणुक घेण्याऐवजी बोली लावून महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हयात फुलंब्री तालुक्यातील सोनारी बु. येथील ग्रामपंचायत निवडणुक रद्द करून भारतीय घटनेचा भंग केला. ग्रामपंचायतीचा लिलाव केला. लोकशाहीच्या बोलीचा प्रकार गावातील समजुतदार लोक निमुटपणे पाहत होते. धनदांडग्यांपुढे त्यांचा आवाज दबला गेला. गावातील काही श्रीमंतांनी पावणे चार लाख रूपयात ग्रामपंचायतीची सदस्यपदे विकत घेतली. त्यानंतर गावातून एक ही निवडणुक अर्ज दाखल झाला नाही. बोली लावणारे सातजण ही बिनविरोध निवडुण आले16

**संदर्भ सूची**

1 पंचायतराजचे दोर मंत्रालयाच्या हाती – दैनिक सकाळ 29 नोव्हेंबर 2011
2 जिल्हा परिषदांना हवे आर्थिक व प्रशासकीय स्वातंत्र्य– सुहास देशपांडे
3 मंत्रालयात केंद्रिय पंचायतराज– सुधीर लंके
4 तत्रैव
5 तत्रैव
6 तत्रैव
7 नसती पंचायत, दैनिक लोकमत– नंदकिशोर पाटील
8 पंचायतराज परिषद मुंबई (एनसिपी) दि. 26 फेब्रु. 2011
9 राजकारणाचे अर्धांग, अतुल कुलकर्णी
10 अर्धे आभाळ कर्तृत्वाचा संधीचे –12 फेब्रु. 2011, दै. लोकमत
11 संपादकीय सकाळ– दिनांक 10 मार्च 2011
12 मानवी प्रतिष्ठेचे मारेकरी, दैनिक सकाळ– 21 एप्रिल 2011
13 तत्रैव
14 स्वागताई निर्णय – अनंत दिक्षीत
15 ग्रामपंचायतीची बोली लावण्यांवर देशद्रोहाचा गुन्हा– रऊफ शेख, 29 मार्च 2011
16 अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था रिपार्ट –2015 ग्राम विकासाची दिशा आणि पंचायतराज प्रशासन राज्यवृत्ती आराखडा.

# भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्व व बदलते स्वरुप

**प्रा. नंदकुमार विश्वनाथ मेटे** अर्थशास्त्र विभाग, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ. मो. नं. ९४२१६५४१७१

२०१० च्या एकुण जागतिक लोकसंख्येपैकी (६८९४.८ मिलियन) २६१९ मिलियन लोक (जागतिक लोकसंख्येच्या ३२.३%) कृषीवर कार्यरत असलेले दिसतात. वैश्विक स्थुल देशांतर्गत उत्पादनाच्या ३% वाटा कृषी क्षेत्राचा असलेला दिसतो जो काही दशकाअगोदर तो १/३ होता. तरीपण आजदेखील कमी विकसीत देशांमध्ये त्या देशांच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात कृषीचा वाटा २५% पेक्षा जास्त असलेला दिसतो.कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. जागतिक भौगोलिक क्षेत्रफळाच्या केवळ २.४% क्षेत्र व ४% पाण्याची संसाधने भारताची असली तरी जागतिक लोकसंख्यापैकी १७% लोकसंख्या व १५% पशुधनास आधार देते. १९८०-८१ मध्ये शेतीवर कार्यरत असणारी लोकसंख्या ६०.५% होती ती थोडीशी घडून २००६-०७ मध्ये ५२% झाली.कोणत्याही देशाच्या आर्थिक वृद्धी व विकासामध्ये कृषीक्षेत्र महत्वाची भुमिका वटवत असलेले दिसते. संपुर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासाकरीता कृषीक्षेत्राचा विकास हा अविभाज्य घटक आहे. कारण शेती केवळ राष्ट्रातील लोकांना अन्नधान्यच उपलब्ध करुन देत नाही तर श्रमीकांना रोजगाराच्या संधी देते, बचती पुरविते, औद्योगिक क्षेत्राकरीता कच्चा माल पुरविते आणि दुसरीकडे विदेशी चलन मिळवून देते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळेस भारताच्या राष्ट्रीय उत्पादनात कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा जवळजवळ ५०% असलेला दिसतो तर एकूण कार्यशील लोकसंख्यापैकी ७०% लोकसंख्या कृषीक्षेत्रामध्ये गुंतलेली दिसते. यावरुन भारतीय अर्थव्यवस्था ही मागासलेली व कृषीवर निर्भर असलेली दिसून येते. परंतू स्वातंत्र्योत्तर नियोजनाच्या कालखंडामध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा घटत असलेला दिसतो.

**१) स्थुल राष्ट्रीय उत्पादनातील कृषीचा घटत जाणारा वाटा :** पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय उत्पादनातील कृषीचा वाटा ५५% होता तो १९८०-८१ मध्ये ३८% झाला. त्यात घट हाऊन तो २००४-०५ व २०११-१२ मध्ये अनुक्रमे २०% व १५.२ होता तर २०४० मध्ये तो ५% अनुमानित आहे.राष्ट्र जसजसे विकसीत होत जाते तसतसे राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा वाटा कमी होऊन द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा हा वाढत जात असतो.

**स्थुल राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीचा वाटा (% मध्ये) तक्ता क्र. १**

| वर्ष | राष्ट्रीय उत्पादनातील कृषीचा वाटा |
|---|---|
| १९५०-५१ | ५५ |
| १९६०-६१ | ५१ |
| १९७०-७१ | ४४ |
| १९८०-८१ | ३८ |
| १९९०-९१ | ३१ |
| २०००-०१ | २४ |
| २००४-१५ | २० |
| २०११-१२ (अकरावी पंचवार्षिक योजना) | १५.२ |

**स्त्रोत :** www.indianfarmers.org

**२) स्थुल देशांतर्गत उत्पादनाचा दर व स्थुल देशांतर्गत कृषी उत्पादनाचा दर :** पुढील तक्त्यामध्ये वेगवेगळ्या पंचवार्षीक योजनांमध्ये भारतचा एकुण स्थुल देशांतर्गत उत्पादन व कृषीची स्थुल देशांतर्गत उत्पादनातील वाढीची प्रवृत्ती दर्शविली आहे. पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये एकुण स्थुल देशांतर्गत उत्पादनातील वाढ ही ३.६% होती ती कृषीकरीता २.४% होती ती वाढुन आढव्या पंचवार्षीक योजनेमध्ये अनुक्रमे ६.७%, ४.७% बनलेली दिसते. दहाव्या पंचवार्षीक योजनेत एकुण स्थुल देशांतर्गत उत्पादनातील वाढ ७.८% होती. तर कृषीतील वाढ घटून २.३% झाली. म्हणून भारत सरकारने आर्थिक विकासला चालना देण्याकरीता कृषीक्षेत्रात अधिकचे महत्व देणे आवश्यक आहे.

**योजना निहाय एकुण स्थुल देशांतर्गत उत्पादनाचा दर व कृषी व संलग्न क्षेत्राचा स्थुल देशांतर्गत उत्पादनाचा दर तक्ता क्र. २**

| योजना | वार्षिक सरासरी वृद्धी (प्रतिवर्ष % मध्ये) | |
|---|---|---|
| | एकुण स्थुल देशांतर्गत उत्पादन | कृषीतील स्थुल देशांतर्गत उत्पादन |
| पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५६) | ३.६ | २.४ |
| दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-६०) | ४.१ | २.२ |
| तीसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६५) | २.५ | १.६ |
| चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७३) | ३.३ | ३.६ |
| पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७९) | ५.० | ५.७ |
| सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५) | ५.४ | ३.१ |
| सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०) | ५.८ | १.३ |
| आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९७) | ६.७ | ४.७ |
| नववी पंचवार्षिक योजना (१९९७-०२) | ५.५ | २.४ |
| दहावी पंचवार्षिक योजना (२००२-०७) | ७.८ | २.३ |
| अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-१२) उद्दिष्ट | ९.० | ४.० (३.२ प्रत्यक्ष) |
| बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७) उद्दिष्ट | ९.० | ४.० |

**स्त्रोत :** Ministry of Agriculture Govt. of India (११३४९) (ON ११६)

**३)कृषी वस्तुच्या आयात निर्यातीचे प्रमाण :** भारत निर्यात करत असलेल्या वस्तुमध्ये प्रामुख्याने बासमती तांदूळ, गहु इतर कडधान्य, चहा, कॉफी, तंबाखु, कोंबड्या, दुग्धजन्य पदार्थ, मसाले, काजु, साखर, फळे, भाजीपाला, प्रक्रिया केलेल्या फळांचे रस, मांस, सागरी उत्पादने, कच्चा कापुस, लाकडी वस्तु इ. ची निर्यात करत असला तरी वेगवेगळ्या काळामध्ये त्यांच्या मुल्यात खुप मोठे चढउतार होत असलेले दिसून येतात. तर भारत मुख्यतः दाळी, गहु,

कडधान्य, दुध, साखर, तेलबिया, कॉटन, ज्युट इ. वस्तुची आयात करतो.२००१-०२ पासून एकूण निर्यातीतील कृषी वस्तूची निर्यात व एकुण आयातीतील कृषी वस्तूंच्या आयातीचा विचार केला असता असे दिसून येते की, एकुण निर्यातीतील कृषी वस्तूंचा निर्यातीचे प्रमाण हे एकुण आयातीतील कृषी वस्तूंच्या आयातीच्या प्रमाणापेक्षा जास्त असलेले दिसते. तरीपण एकूण निर्यातीतील कृषी वस्तूंच्या निर्यातीचे प्रमाण जे २००१-०२ मध्ये १४.२२% होते ते घडून २००४-०५ व २०१०-११ मध्ये अनुक्रमे ११.०८% व १०.४७% बनलेले दिसते. कृषी वस्तूंच्या आयातीच्या प्रमाणामध्ये देखील चढउतार होत असलेले दिसते.

**एकुण निर्यातील कृषी वस्तूंची निर्यात व एकुण आयातीतील कृषी वस्तूच्या आयातीचे प्रमाण तक्ता क्र. ३**

| वर्ष | एकुण निर्यातीतील कृषी वस्तूंच्या निर्यातीचे प्रमाण (%) | एकुण आयातीतील कृषी वस्तूंच्या आयातीचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| २००१-०२ | १४.२२ | ६.६३ |
| २००२-०३ | १३.५८ | ५.९२ |
| २००३-०४ | १२.७० | ६.१२ |
| २००४-०५ | ११.०८ | ४.५५ |
| २००५-०६ | १०.७८ | ३.२६ |
| २००६-०७ | १०.९२ | ३.५३ |
| २००७-०८ | १२.०५ | २.९५ |
| २००८-०९ | १०.२२ | २.७१ |
| २००९-१० | १०.५७ | ४.३७ |
| २०१०-११ (अपेक्षीत) | १०.४७ | ३.५० |

**४.स्थुल देशांतर्गत उत्पादनातील कृषी व संलग्न वस्तुंचा वाढता व्यापार :**२००७-०८ मध्ये भारताच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनाच्या १.६% निर्यात ही कृषी वस्तुंची होती ती वाढून २०११-१२ मध्ये २.२% झाली. कृषी वस्तुची आयातदेखील वाढलेली दिसते. याच कालावधीतील आयात अनुक्रमे ०.९% वरुन १.३% इ ाली. भारताच्या एकुण कृषीवस्तुंची निर्यात व आयातीचे स्थुल देशांतर्गत उत्पादनाशी असणारे प्रमाणदेखील वाढून ते २००७-०८ व २०११-१२ मध्ये अनुक्रमे २.५% वरुन ३.५% झाले. कृषी व संलग्न वस्तुंच्या व्यापाराबाबत व्यापार शेष हा अनुकुल असलेला दिसतो.

**स्थुल देशांतर्गत उत्पादनातील कृषी व संलग्न वस्तुंचा व्यापार (%)**

**तक्ता क्र. ४**

| वर्ष | निर्यात | आयात | एकुण व्यापार (आयात + निर्यात) | व्यापार शेष |
|---|---|---|---|---|
| २००७-०८ | १.६ | ०.९ | २.५ | + ०.७ |
| २००८-०९ | १.५ | १.० | २.५ | + ०.६ |
| २००९-१० | १.४ | १.२ | २.६ | + ०.२ |
| २०१०-११ | १.५ | १.१ | २.६ | + ०.५ |
| २०११-१२ | २.२ | १.३ | ३.५ | + ०.९ |

**५. अन्नधान्याच्या उत्पादनातील मोठी वाढ :** १९६०-६१ ते २०१०-११ या कालावधीतील अन्नधान्याच्या उत्पादनातील दसवार्षिक वाढ पुढील तक्त्यात दर्शविली आहे. तक्ता दर्शवितो की १९६०-६१ मधील अन्नधान्याचे उत्पादन जे ८२ मिलियन टन होते ते वाढुन २०१०-११ मध्ये २३२.१ मिनियन टन झाले. १९७०-७१ च्या तुलनेत १९९०-९१ मध्ये अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढ ६२.७% होती ती १९९०-९१ च्या तुलनेत २०१०-११ मध्ये ३१.६% झाली. तांदूळ व गव्हाच्या उत्पादनातील वाढीचा अपवाद वगळता कडधान्याचे व दाळीचे उत्पादन मंदपणे वाढत असलेले दिसते. १९५०-५१ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ५०.८२ मिलीयन टन होते.

**अन्नधान्याचे उत्पादन (मिलियन टनामध्ये) तक्ता क्र. ५**

| पिक | वर्ष | | | | | | वाढ (प्रतिशतमध्ये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | १९७०-७१ च्या तुलनेत १९९०- ९१ मधील वाढ | १९९०-९१ च्या तुलनेत २०१०-११ मधील वाढ |
| तांदूळ | ३४.६ | ४२.२ | ५३.६ | ७४.३ | ८५.० | ९४.० | ७६.१ | २६.५ |
| गहू | ११.० | २३.८ | ३६.३ | ५५.१ | ६९.७ | ८१.५ | १३१.५ | ४७.९ |
| कडधान्य | २३.७ | ३०.६ | २९.१ | ३२.७ | ३१.० | ४०.१ | ६.९ | २२.९ |
| दाळी | १२.७ | ११.८ | १०.६ | १४.३ | ११.० | १६.५ | २१.२ | १५.५ |
| एकुण अन्नधान्य | ८२.० | १०८.४ | १२९.६ | १७६.४ | १९६.७ | २३२.१ | ६२.७ | ३१.६ |

**स्त्रोत :** Economic Survey, Various Issues

**६) भारतातील पिक निहाय उत्पादन :**भारतातील पीकनिहाय उत्पादनाचा विचार करता गहु, तांदूळ, ऊस व तंबाखुच्या उत्पादनात प्रतिहेक्टर उल्लेखनीय वाढ होत असलेली दिसते. परंतू इतर पिकांच्या संदर्भात त्यात उच्यावचन वा चढ-उतार होत असलेले दिसतात. असे असले तरी एकुण अन्नधान्याचे उत्पादन जे १९५०-५१ मध्ये सरासरी प्रतिहेक्टरी ५.२२ होते ते वाढुन २०११-१२ मध्ये २०.५९ झाले. तर एकुण तेलवर्गीय पिकांचे उत्पादन देखील याच कालखंडामध्ये ४.८१ प्रतिहेक्टर वरुन ११.३५ प्रतिहेक्टर झाले.

**संपुर्ण भारतातील पिक निहाय निपज/उत्पन्न (प्रतिहेक्टर क्विंटलमध्ये) तक्ता क्र. ६**

| पिक | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **१९५०-५१** | **१९९०-९१** | **२०००-०१** | **२०१०-११** | **२०११-१२** |
| तांदूळ | ६.६८ | १७.४ | १९.०१ | २२.३९ | २३.७२ |
| ज्वारी | ३.५३ | ८.१४ | ७.६४ | ९.४९ | ९.५४ |
| बाजरी | २.८८ | ६.५८ | ६.८८ | १०.७९ | ११.५६ |
| मका | ५.४७ | १५.१८ | १८.२२ | २५.४ | २४.७६ |
| गहु | ६.६३ | २२.८१ | २७.०८ | २९.८८ | ३१.४ |
| कडधान्य | ४.०८ | ९ | १०.२७ | १५.३१ | १५.९३ |
| हरभरा | ४.८२ | ७.१२ | ७.४४ | ८.९५ | ९.१२ |
| तुर | ७.८८ | ६.७३ | ६.१८ | ६.५५ | ६.५६ |
| एकुण दाळी | ४.४१ | ५.७८ | ५.४४ | ६.९१ | ६.९४ |
| **एकुण अन्नधान्य** | **५.२२** | **१३.८** | **१६.२६** | **१९.३** | **२०.५९** |
| ऊस | ३३४.२२ | ६५३.९५ | ६८५.७८ | ७००.९१ | ७०३.१७ |
| भुईमुंग | ७.७५ | ९.०४ | ९.७७ | १४.११ | १३.०५ |
| मोहरी | ३.६८ | ९.०४ | ९.३६ | ११.८५ | ११.४५ |
| सोयाबीन | ४.२६ | १०.१५ | ८.२३ | १३.२७ | १२.०७ |
| सुर्यफुल | ६.५३ | ५.३५ | ६.०५ | ७.०१ | ६.९२ |
| **एकुण तेलबिया** | **४.८१** | **७.७१** | **८.१** | **११.९३** | **११.३५** |
| कॉटन | ०.८८ | २.२५ | १.९ | ४.९९ | ४.९१ |
| तंबाखू | ७.३१ | १३.५३ | १३.१८ | १६.८७ | NA |

**स्त्रोत :** Directorate of Economics and statistics, Department of Agriculture and Cooperation

**७)अन्नधान्याची दरडोई उपलब्धता :** अन्नधान्याची निव्वळ उपलब्धता काढत असताना स्थुल (एकुण) उत्पादनातून बियाणे, जणावरांना खाण्याकरीता काढून ठेवलेले धान्य, खराब झालेले धान्य, निर्यात इ. बाबी वजा करुन त्यात आयात केलेले धान्य मिसळले जाते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनाच्या कालखंडामध्ये अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड वाढ होत असलेली दिसते. हरितक्रांतीचा परिणाम म्हणून गहु तसेच तांदुळाच्या उत्पादनात भरमसाठ वाढ झाली. त्यामुळे अन्नधान्य साठवून ठेवण्याकरीता गोदामे अपुरे पडू लागली. असे असले तरी अन्नधान्याची दरडोई उपलब्धता ही १९५१ मध्ये जी ३९४.९ ग्रॅम प्रतिदिवस होती ती १९९१ व २०१० ला अनुक्रमे ५१०.१ ग्रॅम प्रतिदिवस व ४३८.६ ग्रॅम प्रतिदिवस झालेली दिसते. ६ मे २००६ रोजी जागतिक बँकेने भारतातील कुपोषणा संदर्भात जो अहवाल तयार केला होता. त्यात म्हले आहे की, भारतातील जवळजवळ सहा कोटी मुले ही कमी वजनाची असुन दोन मुलांपैकी एक मुल हे सहा मोठ्या राज्यातील आहे ती सहा राज्य म्हणजे महाराष्ट्र, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व राजस्थान होय. UNICEF ने २००८ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार 'जगात प्रति तीन सेकंदाला एक मुलगा कुपोषणाने मृत्यु पावेतो' असे म्हटले आहे तर भारतात प्रति नऊ सेकंदाला एक मुलगा मृत्यु पावतो ही भयावह वास्तविकता आहे.

**भारतातील अन्नधान्याची दरडोई निव्वळ उपलब्धता (प्रतिदिवस ग्रॅममध्ये) तक्ता क्र. ७**

| **वर्ष** | **तांदूळ** | **गहू** | **इतर कडधान्य** | **हरभरा** | **दाळी** | **अन्नधान्य** |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५१ | १५८.९ | ६५.७ | १०९.६ | २२.५ | ६०.७ | ३९४.९ |
| १९६१ | २०१.१ | ७९.१ | ११९.५ | ३०.२ | ६९.० | ४६८.७ |
| १९७१ | १९२.६ | १०३.६ | १२१.४ | २०.० | ५१.२ | ४६८.८ |
| १९८१ | १९७.८ | १२९.६ | ८९.९ | १३.४ | ३७.५ | ४५४.८ |
| १९९१ | २२१.७ | १६६.८ | ८०.० | १३.४ | ४१.६ | ५१०.१ |
| २००१ | १९०.५ | १३५.८ | ५६.२ | ८.० | ३०.० | ४१६.२ |
| २००५ | १७७.३ | १५४.३ | ५९.४ | १०.६ | ३१.५ | ४२२.४ |
| २००६ | १९८.० | १५४.३ | ६०.५ | १०.५ | ३२.५ | ४४५.३ |
| २००८ | १७५.४ | १४५.१ | ५४.१ | १०.६ | ४१.८ | ४३६.० |
| २००९ | १८८.४ | १५४.७ | ६३.९ | १२.९ | ३७.० | ४४४.० |
| २०१० | १८४.४ | १६७.९ | ५४.३ | १३.५ | ३१.६ | ४३८.६ |

**स्त्रोत :** Directorate of Economics and statistics, Department of Agriculture and Cooperation

**८) प्रमुख पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व उत्पन्नाची आंतरराष्ट्रीय तुलना :** भारतात बहुतांश पिकांच्या उत्पादनाकरीता अनुकुल हवामान असल्यामुळे येथे विविध पिकांचे उत्पादन घेतले जाते. तांदूळ, गहु, साखर व भुईमुंगाच्या एकुण जागतिक उत्पादनात भारताचा क्रमांक दुसरा आहे. परंतु तांदूळ, गहू, मका यांच्या उत्पादकतेतील क्रमांक जागतिक स्तरावर अनुक्रमे ३० वा २२ वा, ३५ वा आहे. तर भुईमुंग, दाळी व बटाट्यांच्या उत्पादकतेतील क्रमांक

अनुक्रमे ४० वा, ४४ वा व २६ वा असलेला दिसुन येतो. फुले व भाज्यांच्या उत्पादनातील क्रमांक हा दुसरा असुन एकुण जागतिक उत्पादनाच्या अनुक्रमे १०% व ९% उत्पादन भारतात होते.

**प्रमुख पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन व निपज/उत्पन्नाची आंतरराष्ट्रीय तुलना (वर्ष २०१२) तक्ता क्र. ८**

| देश | क्षेत्र (मिलियन हेक्टर) | उत्पादन (मिलियन टन) | निपज/उत्पन्न(प्रतिहे.टनामध्ये ) | उत्पादन |
|---|---|---|---|---|
| **तांदूळ** | | | | |
| जग | १६३.४६ | ७१८.३५ | ४.३९ | १००.०० |
| चिन | ३०.५६ | २०६.०९ | ६.७४ | २८.६९ |
| भारत | ४२.५० | १५२.६० | ३.५९ | २१.२४ |
| इंडोनेशिया | १३.४४ | ६९.०५ | ५.१४ | ९.६१ |
| बांग्लादेश | ११.७० | ३४.२० | २.९२ | ४.७६ |
| व्हिएतनाम | ७.७५ | ४३.६६ | ५.६३ | ६.०८ |
| **गहू** | | | | |
| जग | २१६.६४ | ६७४.८८ | ३.१२ | १००.०० |
| चिन | २४.१४ | १२०.५८ | ५.० | १७.८७ |
| भारत | २९.९० | ९४.८८ | ३.१७ | १४.०६ |
| रशिया | २१.२८ | ३७.७२ | १.७७ | ५.५९ |
| अमेरिका | १९.८३ | ६१.७६ | ३.११ | ९.१५ |
| **मका** | | | | |
| जग | १७६.९९ | ८७५.१० | ४.९४ | १००.०० |
| अमेरिका | ३५.३६ | २७३.८३ | ७.७४ | ३१.२९ |
| चिन | ३४.९७ | २०८.२६ | ५.९६ | २३.८० |
| ब्राझील | १४.२३ | ७१.३० | ५.०१ | ८.१५ |
| मेक्सिको | ६.९२ | २२.०७ | ३.१९ | २.५२ |
| इंडोनशिय | ३.९६ | १९.३८ | ४.८९ | २.२१ |
| भारत | ८.४० | २१.०६ | २.५१ | २.४१ |
| **साखर** | | | | |
| जग | २५.७६ | १७७३.८१ | ६८.८५ | १००.०० |
| ब्राझील | ९.४१ | ६७०.७६ | ७१.३० | ३७.८१ |
| भारत | ५.०९ | ३४७.८७ | ६८.३४ | १९.६१ |
| चिन | १.८० | १२४.१७ | ६८.८१ | ७.०० |
| थायलंड | १.३० | ९६.५० | ७४.२३ | ५.४४ |
| पाकिस्तान | १.०५ | ५८.०४ | ५५.४९ | ३.२७ |
| **भुईमुंग** | | | | |
| जग | २४.६३ | ४१.२७ | १.६८ | १००.०० |
| चिन | ४.७३ | १६.८८ | ३.५१ | ४०.७१ |
| भारत | ४.९० | ५.७८ | १.१८ | १४.०० |
| नायजेरिया | २.४२ | ३.०७ | १.२७ | ७.४४ |
| अमेरिका | ०.६५ | ३.०६ | ४.७० | ७.४१ |
| म्यानमार | ०.८८ | १.३७ | १.५६ | ३.३२ |

**स्त्रोत :** FAO, Regional office for Asia and the Pacific, Bangkok

**९. घटत जाणारे सरासरी धारण क्षेत्र :** भारतात सर्वसामान्य शेकऱ्यांच्या शेताचा आकार बराच लहान असलेला दिसतो. भारतातील शेतजमिनीचा सरासरी आकार १९७०-७१ मध्ये २.२८ हेक्टर होता तो घटून १९९०-९१ ते २०१०-११ (अनुमानित) मध्ये अनुक्रमे १.५५ व १.१६ हेक्टर झाला. इंग्लंड व अमेरीकेमध्ये शेकतऱ्यांच्या शेताचा आकार अनुक्रमे ५५ हेक्टर व १५८ हेक्टर आहे. १९७० च्या दशरकानंतर भारतीय कृषी संरचनेत महत्वपुर्ण संरचनात्मक बदल होत असलेला दिसुन येतो. १९७०-७१ मध्ये सिमांत व लघु शेतकऱ्यांची (ज्यांच्याकडे ०.१ ते २ हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे.) संख्या ६९.७% होती ती २०००-०१ मध्ये ८२% झाली. बिहार व ओरिसामध्ये कित्येक शेकऱ्यांकडे पाव हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. भारतातील शेतजमिनीचा आकर इतका लहान असल्यामागचे कारण म्हणजे जमीनीचे विभाजन व अपखंडन सांगितले जाते. जमीनीचे विभाजन व अपखंडन होण्यास वैयक्तिक स्वातंत्र्याची वृत्ती, वाढती लोकसंख्या, हस्तव्यवसायांचा ऱ्हास, औद्योगिकरणाचा अभाव इ. कारणे सांगता येते.

**भारतातील सरासरी धारण क्षेत्राचे आकार समुहनिहाय वितरण (क्षेत्रफळ हेक्टर मध्ये) तक्ता क्र. ९**

| अ. क्र. | आकार समुह | १९७०-७१ | १९७६७७ | १९८०-८१ | १९८५-८६ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१* | २००५-०६* | २०१०-११(P) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सीमांत (१ हेक्टरपेक्षा कमी) | ०.४० | ०.३९ | ०.३९ | ०.३९ | ०.३९ | ०.४० | ०.४० | ०.३८ | ०.३८ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | लघु (१-२ हेक्टर) | १.४४ | १.४२ | १.४४ | १.४३ | १.४३ | १.४२ | १.४२ | १.३८ | १.४२ |
| ३ | अंशतः मध्यम (२-४ हेक्टर) | २.८१ | २.७८ | २.७८ | २.७७ | २.७६ | २.७३ | २.७२ | २.६८ | २.७१ |
| ४ | मध्यम (४-१० हेक्टर) | ६.०८ | ६.०४ | ६.०२ | ५.९६ | ५.९० | ५.८४ | ५.८१ | ५.७४ | २.७६ |
| ५ | मोठे (१० हेक्टर पेक्षा जास्त) | १८.१ | १७.५७ | १७.४१ | १७.२१ | १७.३३ | १७.२१ | १७.१२ | १७.०८ | १७.३८ |
| सर्व आकार समुहाची सरासरी | | २.२८ | २.०० | १.८४ | १.६९ | १.५५ | १.४१ | १.३३ | १.२३ | १.१६ |

* झारखंड वगळूनए P = अनुमानित **स्त्रोत :** Agriculture Census २०१०-११

१०. **कृषी व संलग्न क्षेत्र आणि सिंचना वरील घटत जाणारी गुंतवणुक :**कृषी क्षेत्राचा विकासाचा दर घटत जाण्याचे एक महत्वाचे कारण म्हणून त्यातील घटत जाणारा गुंतवणुकीचा दर हे एक आहे. निरपेक्षरित्या कृषी व संलग्न क्षेत्र तसेच सिंचनावरती केल्या गेलेल्या खर्चाची मात्रा जास्त असली तरी सापेक्षरित्या पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये कृषी व सिंचनावरील एकूण योजना व्ययापैकी ३७.३% खर्च केला गेला तो घटून दहाव्या पंचवार्षिक योजनेत केवळ १०.६% इतका झाला.

सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून ग्रामीण विकास हा एक वेगळा अतिरिक्त विभाग सुरु केला. ग्रामीण विकासावरती ६ व्या पंचवार्षीक याजनेत एकुण योजना व्ययाच्या ६.४% खर्च ग्रामीण विकासावर केला गेला तो ९ व्या व १० व्या योजनेत अनुक्रमे ९.५% व ८% इतका होता.

**कृषी व संलग्न क्षेत्र, सिंचन व ग्रामीण विकासावरील योजना खर्च (कोटी रु.) तक्ता क्र. १०**

| पंचवार्षीक योजना | एकुन योजना खर्च | कृषी व संलग्न क्षेत्र | सिंचन | ग्रामीण विकास | एकुण योजना व्ययातील कृषी व सिंचनाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| पहिली पं. यो. (१९५१-५६) | १९६० | २८९.९ | ४४१.८ | - | ३७.३ |
| दुसरी पं. यो. (१९५६-६१) | ४६७१.८ | ५४९ | ५४१.६ | - | २३.३ |
| तिसरी पं. यो. (१९६१-६६) | ८५७६.५ | १०८८.९ | १०१९.१ | - | २४.६ |
| चौथी पं. यो. (१९६९-७४) | १५७७८.८ | २१२०.४ | २४१५.७ | - | २८.७ |
| पाचवी पं. यो. (१९७४-७८) | ३९४२६.२ | ४८६४.९ | ३९२५.८ | - | २२.३ |
| सहावी पं. यो. (१९८०-८५) | १०९२९१.७ | ६६२३.५ | १०९२९.९ | ६९९६.८ | १६.१ |
| सातवी पं. यो. (१९८२-९०) | २१८७२९.६ | १२७९२.६ | १६५८९.९ | १५२४६.५ | १३.४ |
| आठवी पं. यो. (१९९२-९७) | ४८५४५७.२ | २४८९५.७ | ३१३९८.९ | ४०३७२.१ | ११.६ |
| नववी पं. यो. (१९९७-०२) | ९४१०४१ | ३७२३९ | ६७८७५ | ८८९६५ | ११.२ |
| दहावी पं. यो. (२००२-०७) | १५२५६३९ | ५८९३३ | १०३३१५ | १२१९२८ | १०.६ |

**स्त्रोत :** GOI (२००१) Indian planning experience - A statistical profile planning commi Gov. of India, New Delhi, January २००१ & १०th Five year plan (२००२-२००७)

**११)खताचा वाढता उपयोग :**शेतीमधुन जास्तीत जास्त पिक घेता यावे म्हणुन आज रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्राणात होत असलेला दिसतो. १९९२ पर्यन्त खतांच्या किंमती भारतात नियंत्रीत होत्या व वेगवेगळ्या खतांच्या किंमती शासनांकडून अधिकत्तम किरकोळ किंमत निश्चित केली जात होती. आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून खतांच्या किंमती अशंतः नियंत्रणमुक्त करण्यात आल्या. कृषी शास्त्राच्या नियमानुसार जमीनीची गुणवत्ता चालु ठेवण्यासाठी नायट्रोजन (N), फॉस्फरस (P) व पोटॅशियम (K) चे प्रमाणे हे ४:२:१ असायला हवे परंतू ते प्रमाण १९५५-५६ मध्ये १०.८:१.३:१ होते ते प्रमाण १९७०-७१, १९९२-९३ व २००६-०७ मध्ये अनुक्रमे ६.३:२.३:१, ९.५:३.२:१ व ५.९:२.४:१ इतके होते. २००९ मध्ये संपूर्ण जगामध्ये सरासरी खताचा वापर प्रतिहेक्टर १०६.९ किलोग्रॅम होता भारतात तो प्रतिहेक्टर १५६.१ किलोग्रॅम होता इजिप्त, ब्राझील, कॅनडा व चिनमध्ये अनुक्रमे प्रतिहेक्टर ३७५, १३२.३, ५४.१ व ३९६ इतका होता. सर्वात जास्त वापर न्युझीलंडमध्ये केला जात होता तो म्हणजे प्रतिहेक्टर १३९२.३ किलोग्रॅम.

**संपुर्ण भारतातील खताचा उपयोग (हजार टनामध्ये) तक्ता क्र. ११**

| वर्ष | नायट्रोजन (N) | फॉस्फरस (P) | पोटॅशियम (K) | एकुण |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ५८.७ | ६.९ | - | ६५.६ |
| १९६०-६१ | २१०.० | ५३.१ | २९.० | २९२.१ |
| १९७०-७१ | १४८७.० | ४६२.० | २२८.० | २१७७.० |
| १९८०-८१ | ३६७८.१ | १२१३.६ | ६२३.९ | ५५१५.६ |
| १९९०-९१ | ७९९७.२ | ३२२१.० | १३२८.० | १२५४६.२ |
| २०००-०१ | १०९२०.२ | ४२१४.६ | १५६७.५ | १६७०२.३ |
| २००५-०६ | १२७२३.३ | ५२०३.७ | २४१३.३ | २०३४०.३ |
| २००९-१० | १५५८०.० | ७२७४.० | ३६३२.४ | २६४८६.४ |
| २०१०-११ | १६५५८.२ | ८०४९.७ | ३५१४.३ | २८१२२.२ |
| २०११-१२ | १७३००.३ | ७९१४.३ | २५२५.५ | २७७४०.० |

**स्त्रोत :** Department of Agriculture and Cooperation

**१२) कृषी वित्त पुरवठ्यातील वाढ :**शेतीला योग्य वेळी बियाणे खते, औषधांची आवश्यकता असते. योग्य वेळी पैसा उपलब्ध झाला तरच शेतीमधून मोठ्या प्रमाणात उत्पादनाची अपेक्षा असते. पुढील तक्त्यात ठरवलेल्या उद्दिष्टापेक्षा प्रत्यक्षातील संस्थागत वित्त पुरवठा (अल्पकालीन व दिर्घकालीन मिळून) जास्त करण्यात आलेला दिसतो.

**कृषीकरीता संस्थागत वित्तपुरवठा (कोटी रु.) तक्ता क्र. १२**

| वर्ष | उद्दिष्ट | एकुण वित्त पुरवठा (अल्पकालीन + दिर्घकालीन) |
|---|---|---|
| २००४-०५ | १०५००० | १२५३०९ |
| २००५-०६ | १४१००० | १८०४८६ |
| २००६-०७ | १७५००० | २२९४०० |
| २००७-०८ | २२५००० | २५४६५८ |

| | | |
|---|---|---|
| २००८-०९ | २८०००० | २८७१४९ |
| २००९-१० | ३२५००० | ३८४५१४ |
| २०१०-११ | ३७५००० | ४६८२९१ |
| २०११-१२ | ४७५००० | ५११०२९ |

**१३) संस्थागत वित्त पुरवठ्यातील बदल :**

संस्थागत वित्त पुरवठ्यामध्ये व्यापारी बँका, सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकाद्वारे केला जाणारा वित्त पुरवठा विचारत घेतला जातो. यात देखील बदल होत असलेला दिसतो. एकुण संस्थागत वित्त पुरवठ्यापैकी ५८.३% वित्तपुरवठा हा सहकारी बँकाद्वारे १९९३-९४ मध्ये केला जात होता. तो २०१०-११ मध्ये कमी होऊन १५.८% बनला तर व्यापारी बँकाद्वारे याच कालावधीतील वित्त पुरवठ्याचे प्रमाण ३६.४% वरुन ७४.८% झाले.

**संस्थागत वित्तपुरवठा (% मध्ये) तक्ता क्र. १३**

| बँक | वर्ष | |
|---|---|---|
| | **१९९३-९४** | **२०१०-११** |
| व्यापारी बँक | ३६.४ | ७४.८ |
| सहकारी बँक | ५८.३ | १५.८ |
| प्रादेशिक ग्रामीण बँक | ५.३ | ९.४ |
| **एकुण** | **१००** | **१००** |

**स्त्रोत : RBI (२०११)**

संस्थागत वित्त पुरवठ्याचे प्रमाण वाढत असले तरी कृषीकरीता पुरविण्यात येणाऱ्या एकूण कर्ज पुरवठ्यापैकी बिगर संस्थाद्वारे व त्यातल्यात्यात सावकाराद्वारे केला जाणारा वित्तपुरवठ्याचे प्रमाण १९५१ मध्ये ६९.७% होते ते कमी होऊन १९७१ मध्ये ३६.१% बनले तर २००२ मध्ये २६.८% होते. त्यांच्या व्याजाचा दर हा संस्थागत व्याजदरापेक्षा जास्तच असतो.

**समारोप :** जरी पाठीमागील काही वर्षापासून स्थुल देशांतर्गत उत्पादनातील कृषीचा वाटा घटत जात असला तरी कृषी भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्वाचे क्षेत्र आहे. नविन आर्थिक सुधारणांमध्ये कृषीत्तर क्षेत्र विशेषतः सेवा क्षेत्राच्या जलद विकासामुळे कृषी विकासाचा वेग मंदावला आहे. मागील दोन दशकापासुन भारतीय अर्थव्यवस्था अनेक समस्यांना तोंड देत असलेली दिसते, जसे घटत जाणारा विकास दर, नैसर्गिक संसाधनाची अधोगती आदानांची घटत जाणारी कार्यक्षमता इ. तरीपण ९ व्या व १० व्या पंचवार्षिक योजनेच्या तुलनेत ११ व्या पंचवार्षीक योजनेत कृषीच्या विकासचा दर (३.२%) जास्त होता. कृषीमधील विकासाचा दर ४% किंवा त्यापेक्षा जास्त साध्य करायचा असेल तर फळे, मासे, दुध व मांसक्षेत्रात जास्तीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1.Prospects and polity challenges in the Twelfth plan Monte K. S. Ahluwalia, Economic and political weekly May 21, 2011
2.'Fertilizer Statistics 2010-11' Fertilizer Association of India, New Delhi
3.Ministry of Agriculture Government of India
4.Economic Survey 2013
5.Directorate of Economics and statistics, Department of Agriculture and Cooperation
6.FAO, Regional office for Asia and the Pacific, Bangkok
7.Agriculture Census 2010-11
8.Twelfth five year plar (2012-17) Economic sectors volume II, planning commission Government of India
9.Agricultural situation in India March 2013
10.State of Indian Agriculture 2012-13, Government of India, Ministry of Agriculture, Department of Agriculture & Cooperation New Delhi
11.Agricultural Growth in India since 1991 : Balkrishnan, P. Golait, Kumar P - study No. 27, Development study Group Reserve Bank of India, Mumbai
12.'Farmers' suicides in India Magnitudes, Trends and spatial patterns - K. Nagaraj - Research Report, Madras Institute of Development studies, Chennai
13.Report of the committee on statistics of Agriculture and allied sectors Government of India 2013
14.Pocket Book on Agricultural Statistics 2013, Government of India
15.Indian J Med Res 138, September 2013
16.OECD-FAO Agricultural outlook 2013-2022 Highlights
17.Indian Economy - Ruddar Datt K. P. M. Sundharam

# भारतीय अर्थव्यवस्थेतील किंमत वाढीची समस्या व उपाय

डॉ. नितिन बी. कावडकर अर्थशास्त्र विभाग प्रमुख चिंतामणी महाविद्यालय, घुग्घूस, जि. चंद्रपूर ९४०४११८६३

**सारांश :** देशातील अनेक समस्या पैकी एक किंमतवाढ ही ज्वलंत समस्या आहे. देशातील किंमतवाढीला अनेक कारणे कारणीभूत असून ही किंमतवाढ विविध कारणांचा एकत्रित परिणामामुळे घडून येते. किंमतवाढीचा समाजातील वेगवेगळ्या घटकांवर किंवा वर्गावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम घडून येतात. किंमतवाढीच्या काळात लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन अर्थव्यवस्थेचा व देशाचा विकास होतो. किंमतवाढीमुळे सुरूवातीला समाजात उत्साहाचे व चैतन्याचे सामाजिक वातावरण निर्माण होते उद्योग, शृाळा, मंडळ व क्लब इत्यादी उदयास येऊन विकास होतो. पण ही किंमतवाढ एका विशिष्ट पातळीच्या वर गेल्यास त्याचे प्रतिकूल परिणाम कमी–जास्त प्रमाणात अर्थव्यवस्थेतील सर्वच घटकांना सहन करावे लागते. तेव्हा देशातील किंमतवाढीच्या होणाऱ्या परिणामांचा व त्यावर करण्यात येणाऱ्या उपाय–योजनांचा अभ्यास यात करण्यात आला आहे.

प्रस्तावणा :–भारतीय अर्थव्यवस्थेत दिवसेंदिवस किंमत वाढ/भाव वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अर्थव्यवस्थेतील होणरी किंमतवाढ ही कोणत्याही एका विशिष्ट कारणामुळे घडून येत नसून, विविध कारणांच्या एकत्रित परिणामामुळे घडून येते. सुरवातीच्या काळात मानवाच्या गरजा मर्यादीत होत्या, परंतू जसा–जसा मानवी संस्कृतीचा विकास, पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण, नवनवीन वैज्ञानिक शोध यामुळे मानवी गरजामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे मानवाला भौतिक सुखाच्या व चैनिच्या वस्तू व सेवांच्या वापरात वाढझाली आहे. परंतू मागणीच्या मानाने ह्या वस्तू व सेवांच्या पुरवठा अपुरा होत असल्यामुळे अर्थव्यवस्थेत भाववाढ होत आहे. वस्तू व सेवांच्या मागणीत वाढझाली व त्यातूलनेत त्या वस्तू व सेवांमध्ये वाढझाली नाही तर मागणीचे अधिक्य निर्माण होऊन भाववाढ घडून येते. किंमतवाढीला अनेक कारणे कारणीभूत आहेत त्यातील एक महत्वाचा कारण मागणीचे आधिक्य होय. श्रीमंतापेक्षा गरीबांना ह्या भाववाढीचे झळ अधिक बसते.

अध्ययनाची उद्दीष्टे :–

1. देशाच्या अर्थव्यवस्थेतील किंमतवाढीच्या समस्याचे अध्ययन करणे.
2. स्वातं०यप्राप्तीनंतरच्या किंमतवाढीचा आढावा घेणे.
3. किंमतवाढीला कारणीभूत असलेल्या घटकांचा अभ्यास करणे.
4. किंमतवाढीचा अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
5. किंमतवाढ नियंत्रित ठेवण्याकरिता केलेल्या उपाय–योजनांचा अभ्यास करून इतर उपाय–योजना सुचविणे.

भारतात स्वातं०य प्राप्तीनंतरची किंमत वाढः– स्वातं०य प्राप्तीनंतर अर्थव्यवस्थेत किंमत स्थैर्य राखण्याकरीता, संतुलित विकासाकरिता आर्थिक नियोजनाच्या मार्गाचा स्विकार केला आहे अर्थव्यवस्थेत नियोजन काळात किंमतीत झालेला बदल पुढीलप्रमाणे आहे.

1951–1971 च्या कालावधी किंमत स्थिती :–पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (1951–1956) शेतमालाचे उत्पादन पुरेशा प्रमाणात झाल्यामुळे किंमत वाढ नियंत्रित राहली. परंतू दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत (1956–61)तुटीच्या अर्थप्रबंधामुळे, अवाढव्य खर्चामुळे किंमतीवर अजिबात नियंत्रण राहिले नाही. या काळात किंमत पातळीत 20 टक्यांनी वाढझाली. तिसऱ्या योजनेत (1961–1966) 1962 मध्ये (चीनमध्ये) चीनने भारतावर केलेले आक्रमण, 1965 मध्ये (पाकयुध्द) भारत–पाक युध्द व 1966 मध्ये दुष्काळ इ. कारणामुळे खाद्यान्नाच्या किंमतीत 40 टक्के तर धान्याच्या किमतीत 45 टक्के व डाळींच्या किंमतीत 70 टक्के वाढझाली.

1970 च्या दशकातील किंमत स्थितीः–चवथ्या योजनेच्या सुरवातीला किंमत वाढ मर्यादीत होती. मात्र योजनेच्या शेवटी 1972–73 व 1973–74 मध्ये ॅिवसमेंसम चतपबम पदकमग ॅ;प्ध्द्व किंमत पातळी 19 व 47 अंकांनी वाढली. भारतात बांगला देशातून निर्वासितांचे प्रचंड प्रमाणावर आगमण, 1972–73 मध्ये खरिप पिकांची मोठ्याप्रमाणावर नासाडी, 1973 मध्ये तेलाचा किंमतीत वाढ या सर्व कारणांचा प्रभाव पडून सप्टेंबर 1974 मध्ये सर्वच वस्तूचा निर्देशांक (WIP)331 पर्यंत वाढला.

1980 च्या दशकातील किंमत स्थिती :–या दशकातही किंमतवाढ ही अत्यंत महत्वाची समस्या होती. 1971–80 मध्ये झालेली नापिकी, औद्योगिक उत्पादनात घट, तेलाच्या वाढत्या किंमती यामुळे 1980–89 मध्ये थोक किंमत निर्देशांकात ़ीवसमेंसम्‸चतपबम प्दकमगद्ध ॅप्च 17.4 टक्के वाढझाली सातवी पंचवार्षिक योजहना (1985–90) मध्ये सुरवातीच्या वर्षात किंमतवाढ नियंत्रीत राहली नंतर मात्र कोरडा दुष्काळ पडल्यामुळे शेती उत्पादनात मोठी घट झाली त्यामुळे खाद्यतेल, तेलबिया, डाळी कापूस इत्यादी च्या किंमतीत बरीच वाढझाली.

1990 नंतरची किंमतवाढ :–1990 मध्ये झालेली किंमतवाढ भयंकर होती. सरकारने केलेली अप्रत्यक्ष करामध्ये वाढ, त्याचबरोबर अन्नधान्याच्या व पेट्रोलियमच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ ह्यामुळे 1990–91 व 1991–92 मध्ये किंमती वेगाने वाढल्या व किंमत वाढीचा सरासरी वार्षिक दर अनुक्रमे 10.3 व 13.7 टक्के होता.

2008–09 मधील चलनवाढ :–मगील तीन वर्षामधी तेजीच्या परिस्थीतीमुळे चलनवाढीचा दर सतत वाढत गेला. 2008–09 या आर्थिक वर्षात तो 2 ऑगस्ट 2008 मध्ये 12.19 टक्के इतका झाला. मात्र 2008 च्या शेवटी मंदीसदृश्य परिस्थीती निर्माण झाल्याने चलनवाढीचा दर सतत कमी होत जावून 29 मार्च 2009 मध्ये 0.8 टक्क्यापर्यत घसरला होता.

किंमत वाढीचे कारणे :–किंमत वाढ प्रामुख्याने दोन कारणांमुळे निर्माण होते.

वस्तू व सेवांच्या मागणीत पुरवठ्याच्या मानाने होणारी वाढ

वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात मागणीच्या मानाने होणारी घट.

अ) वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होण्याची कारणे :–अनेक अर्थतज्ञ किंमत वाढीला मागणीतील वाढ हाच घटक अधिक जबाबदार असल्याचे मानतात वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

1) वेगाने वाढणारी लोकसंख्या :–भारताची लोकसंख्या 1901 मध्ये 23.83 कोटी होती. 1921 हा वर्ष वगळता नंतर मात्र लोकसंख्या अतिशय वेगाने वाढली 1951 मध्ये 36.10 कोटी, 1981 मध्ये 68.52 कोटी, 2001 मध्ये 102.7 कोटी व 2011 मध्ये 121 कोटी या वेगाने लोकसंख्या वाढल्यामुळे अन्नधान्य व इतर सर्वच वस्तूच्या मागणीत प्रत्यक्षपणे वाढझाली. परंतू पुरवठा त्यामानाने न वाढल्यामुळे किंमत पातळी वाढू लागली आहे.

2) सरकारी खर्चातील प्रचंड वाढ :–सरकारचा (केंद्र व राज्य) विकास व बिगर विकास खर्च (उदा. युध्दजन्य परिस्थितीतील खर्च) प्रचंड प्रमाणात वाढला आहे. 1950–51 मध्ये केंद्र व राज्य सरकारचा खर्च 740 कोटी रू. होता, तो सतत वाढत जाऊन 1999–2000 मध्ये 5,69,400 कोटी रू. झाला. या सरकारी खर्चामुळे जनतेच्या उत्पन्नात वाढ होऊन क्रयशक्तीत वाढ होते क्रयशक्तीत वाढझााल्यामुळे मागणीत मोठ्या प्रमाणावर वाढ होते परिणामतः किंमती वाढतात.

3) तुटीचे अर्थप्रबंधन व मुद्रा पुरवठ्यात वाढः–आर्थिक विकासाकरिता भांडवल मिळावे म्हणून नेहमी तुटीचा अर्थसंकल्प मांडला जातो. ही तुट भरून काढण्याकरिता सरकार मोठ्याप्रमाणावर कर्ज घेतो नोटा छापल्या जातात यामुळे अर्थव्यवस्थेत चलन पुरवठ्यावतही वाढ होऊन लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे त्यांची वस्तू व सेवांची मागणीतवाढ होते, परिणामतः किंमतवाढ होते.

4) चलन पुरवठ्यातील वाढ :–चलन पुरवठा म्हणजे देशातील जनतेच्या हातातील एकून पैसा होय. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्ठ९ च्या धोरणामुळे व्यापारी बॅंक व विकास बॅंकांनी विकासासाठी मोठ्या प्रमाणावर कर्ज दिल्यामुळे लोकांकडील पैशात प्रचंड वाढझाली. 1970–71 मध्ये मुद्रेचा पुरवठा 7,320 कोटी होता, तो वाढून 2002–2003 मध्ये 4,76,450 कोटी रूप्ये इतका झाला. चलन पुरवठ्यात वाढझाल्यामुळे लोकांच्या कयशक्तीत वाढ होउन त्यांची वस्तू व सेवांकरीता असलेल्या मागणीत वाढझाली. परीणामतः किंमत पातळीत वाढझाली आहे.

5) खाजगी उपभोग खर्चात वाढ :–देशातील व्यापारी बॅंकानी उपभोगासाठी अधिकाधिक कर्ज दिल्यामुळे लोकांच्या मागणीत वाढ होते. ही मागणी पुर्ण करण्यासाठी गुंतवणूकीत वाढ होऊन नवीन उद्योग स्थापित होतात, त्यामुळे श्रमिकांना व इतर घटकांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे उत्पन्न वाढते परिणामतः मागणी वाढून किंमत वाढते.

6) काळा पैसा :–आयकरापासून चुकविलेला पैसा म्हणजे काळा पैसा होय. सरकारी अनुमानानुसार 1983–84 मध्ये काळा पैसा 37,000 कोटी रू. होता.तर 1999–2000 मध्ये 60,000 कोटी रूपये काळा पैसातून चैनीच्या वस्तू, जमीन, लग्नसमारंभ इत्याद बाबींवर खर्च करतात. त्यामुळे किंमत पातळीत वाढ होते.

7) निर्यात वाढ :–देशाच्या निर्यातीत वाढझाली तर निर्यातकांचे उत्पन्न वाढते हे वाढलेले उत्पन्न आयातीवर खर्च झाले नाही तर देशातील वस्तूवर खर्च होतो. तसेच निर्यातीमुळे देशात वस्तूची टंचाई निर्माण होते. परिणामतः किंमत पातळी वाढते.

8) करकपात :–सरकारने कर कमी केल्यास लोकांच्या हातातील कयशक्ती वाढून त्यांची वस्तू व सेवांची मागणी वाढून किमंतीत वाढ होते.

9) स्वस्त मुद्रा धोरण :–केंद्रीय बॅंकेने स्वस्त मुद्रा धोरणाचा अवलंब केल्यास व्यापारी बॅंक कमी व्याजदराने कर्ज देतात, त्यामुळे लोकांच्या हातातीली पैसात वाढ होऊन त्यांची वस्तू व सेवांची मागणी वाढते.

वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात घट होण्याची कारणे :–वस्तू व सेवांच्या मागणीतील वाढीबरोबर पुरवठ्यात तेवढ्याच कालावधीत व त्याचप्रमाणात वाढझाली तर भाववाढीची समस्या निर्माण होत नाही, मात्र पुरवठ्यात वाढ न झाल्यास किंमतवाढ घडून येते. पुरवठ्यात वाढ न होण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

1) शेतमाल उत्पादनातील चढ–उतार :–भारतीय शेती मोसमी पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे सुध्दा कृषी उत्पादनात मोठे चढ–उतार दिसून येतात. खाद्यान्नाचे उत्पादनातजे 1950–51 मध्ये 550 लाख टन होते. ते 1964–65 मध्ये 890 लाख टन झाले. 1970–71 मध्ये 1,080 लाख टनाचे विकमी उत्पादन हे पुढील दोन वर्षात 970 ला टनांपर्यंत कमी झाले. नंतर 1978–79 चे 1,320 लाख टन हे विकमी उत्पादन पुढील वर्षी 1,100 लाख टन एवढे म्हणजे एका वर्षात सुमारे 16.67 टक्क्यांनी कमी झाले. असे उत्पादनातील चढ–उतारामुळे ज्या वर्षात उत्पाद कमी त्या वर्षात पुरवठा कमी झाल्याने किंमती वाढतात. लोकसंख्येच्या वाढीपेक्षा अन्नधान्य उत्पादनाच्या वाढीचा दर खूपच कमी आहे. त्यामुळे मागणीतील वाढीबरोबर पुरवठ्यात वाढ घडून येत नाही परिणामतः किंमत वाढ घडून येते.

2) उत्पादन साधनांची टंचाई/दुर्मिळता :–बऱ्याच वेळा भूमी, श्रम, भांडवली साधने, कच्चा माल इत्यादी उत्पादनाचे घटक पुरेशा प्रमाणात उपलबध्द न झाल्यामुळे वस्तूचे व सेवांचे उत्पादन वाढविता येत नाही. त्यामुळे वस्तूंचा पुरवठा कमी होउन भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

3) अपुरी औद्योगिक वाढ:–लोकसंख्येतील वाढ, लोकांच्या उत्पन्नातील वाढ यामुळे औद्योगिक उत्पादनांची मागणी वाढली परंतु कच्या मालाची टंचाई, वीज, वाहतुकीची समस्या, सरकारी नियंत्रणे, तंत्रज्ञानाची कमतरता इ. कारणांमुळे औद्योगिक उत्पादनाची पुरेशी वाढझालि नाही परिणामतः औद्योगिक उत्पादनांच्या किंमतीमध्ये वाढझाली.

4) औद्योगिक कलह :–औद्योगात मालक वर्ग व कामगार यांच्या होणाऱ्या संर्घषाला औद्योगिक कलह असे म्हणतात. औद्योगिक संघर्षाच औद्योगिक उत्पादनावर परिणाम होतो. कामगार वर्ग आपल्या मागण्या पूर्ण करण्याकरिता संप, मोर्चे इत्यादी साधनांचा वापर करतो हा त्याला प्रत्युत्तर म्हणून मालक वर्गाने जाहिर केलेली ताळेबंदी या दोघांचा परिणाम औद्योगिक उत्पादन घटीमध्ये होते. त्यामुळे औद्योगिक वस्तूंचा पुरवठा कमी होऊन किंमत वाढीस चालना मिळते.

5) नैसर्गिक संकटे :–ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, रोगांचा प्रादुर्भाव, भूकंप इत्यादींचा कृषी उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे अन्नधान्या बरोबरच औद्योगिक कच्चा मालाची टंचाई निर्माण होवून औद्योगिक उत्पादनात घट होते परिणामतः भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

6) साठेबाजी :–व्यापारी वर्ग अधिक नफा कमविण्यासाठी साठेबाजी करून बाजारपेठेत वस्तूची कृत्रिम टंचाई निर्माण करतात त्यामुळे किंमतवाढ घडून येते. तर ग्राहक वर्ग भाववाढीच्या काळात–भविष्यातील भाववाढीच्या भितीने आवश्यक वस्तूंची साठेबाजी करतात. त्यामुळे बाजारातील वस्तूंचा पुरवठा कमी कमी होतो व भाववाढ होते.

7) वर्धी व्येय नियम :–उत्पादनाची मात्रा दिवसेंदिवस वाढत गेली असता एका विशिष्ट मर्यादेनंतर उत्पादन व्यय वाढू लागतो. त्यामुळे किंमती वाढतात तसेच उद्योगातील यंत्रे जसजशी जूनी होतात तसी त्यांची उत्पादनाची क्षमता कमी होते तेथे घटल्या उत्पादन फलचा नियम लागू होतो त्यामुळे उत्पादन खर्च वाढून भाववाढीस चालना मिळते.

8) विशिष्ट व एकांकी उत्पादन :–ज्या वस्तूच्या विकीतून अधिकाधिक नफा मिळतो अशाच वस्तूच्या उत्पादनात औद्योगिक गुंतवणूक उद्योजक करतात, त्यामुळे इतर वस्तूचा पुरवठा कमी होतो. तसेच बऱ्याच वेळा अर्थव्यवस्थेत चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनावर भर दिली जाते. आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होऊन पूरवठा कमी होतो. परिणामतः भाववाढ होते.

9) तांत्रिक बदल :–आधुनिक काळात उद्योगांमध्ये वेळोवेळी तांत्रिक बदल केले जातात. हे बदल करताना उत्पादन बंद ठेवले जाते, त्यामुळे उत्पादन घटून वस्तूंच्या व सेवांच्या किमती वाढतात.

वरील कारणांमुळे मागणी बाजू मौद्रीक उत्पन्न वाढून व पुरवठा बाजूने उत्पादनात घट होऊन देशात किंमत वाढीची परिस्थीती निर्माण होते.

किंमत वाढीचे परिणाम :–किंमतवाढीचा समाजातील वेगवेगळ्या वर्गावर, देशाच्या अर्थव्यवस्थेवर आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि राजकीय परिणाम होत असतात. अर्थव्यवस्थेतील काही घटकांवर किंमतवाढीचा सुरवातीला चांगला परिणाम होत असला तरी शेवटी मात्र त्यांच्यावरही प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येते.

1) किंमतवाढीचा समाजातील वेगवेगळ्या वर्गावर होणारे परिणाम :–अर्थव्यवस्थेतील उत्पादक आणि व्यापारी वर्गावर किंमत वाढीचा सुरवातीला अनुकूल परिणाम होतो. नंतर मात्र प्रतिकुल परिणाम होतो कारण एका विशिष्ट मर्यादापेक्षा जास्त किंमत वाढल्यास मागणी कमी होते. किंमत वाढीचा उपभोक्तावर वाईट परिणाम होते उपभोक्ताना अधिक किंमतीत वस्तू घ्याव्या लागतात. किंमतवाढीचा रोजगारावर अनुकूल परिणाम होतो. उत्पादनात वाढ करण्याकरिता लोकांना कामावर घेतले जाते. लोकांना रोजगार मिळून रोजगारीत वाढ होते. पण मोठ्या प्रमाणावर किंमत वाढीमुळे मागणी कमी होते. उत्पादन कमी केल्या जातो. परिणमतः रोजगार कमी होतो.

2) आर्थिक विकासावर परिणाम :–किंमत वाढ ही आर्थिक विकासाकरीता पोशक की घातक यात मतभेद आहेत. ज्यावेळी अल्पप्रमाणामध्ये सावकाशपणे किंमत वाढ होत असते ती आर्थिक विकासाचे साधन आहे. किंमत वाढीमुळे गुंतवणूक वाढते त्यामुळे

प्रभावी मागणी वाढते. असे होत असले तरी किंमतवाढीत भांडवल निर्मितीचा दर कमी करते काही वेळेला किंमतवाढ विकासासाठी अनुकूल असली तरी आर्थिक विकासाला योग्य मानने चुकीचे आहे.

3) नैतिक परिणाम :–किंमतवाढीमुळे समाजाचे नैतिक अधपतन होते. किंमतवाढीच्या काळात व्यापारी वग्र मोठ्या प्रमाणावर नफा कमविण्यासाठी साठेबाजी, भेसळ, काळाबाजार असे कृत्य करतात. लोकांमध्ये भ्रष्टाचार, जुगारी इत्यादी वाढु लागते. पैसासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब केला जातो परिणामतः समाजाचे अधपतन होते.

4) राजकीय परिणाम :–किंमतवाढीचा देशातील राजकारणावर वाईट परिणाम होतो. किंमतवाढीला सरकारच जबाबदार आहे असे मानले जाते. किंमतवाढीमुळे लोकांचे जे हाल होतात त्यामुळे मग मत पेठीमधून सत्ता परिर्वन घडून येते. सत्तेमध्ये असणाऱ्या सरकारला सत्तेवरून खाली उतरवले जाते. देशात मे 2014 मध्ये केंद्रात झालेल्या सत्ता परिवर्तनाला किंमतवाढ हा सुध्दा एक कारण असल्याचे माझे मत आहे.

किंमतवाढ नियंत्रित करण्यासाठी उपाय–योजना

किंमतवाढीवर नियंत्रण ठेवण्याची संयुक्तिक जबाबदारी भारतीय रिझर्व्ह बॅंक व भारत सरकारची असते. सरकारच्या वतीने रिझर्व्ह बॅंक अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी जास्त कररून किंमतवाढ नियंत्रित करण्याचे प्रयत्न करते तसेच सरकार राजकोषीय धोरणांचा अवलंब करून किंमतवाढ नियंत्रित करते ते पुढील प्रमाणे आहेत.

अ) रिझर्व्ह बॅंकेचे चलन विषयक उपाय :–देशातील पैसा पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता रिझर्व्ह बॅंक विविध मार्गाचा अवलंब करते. उदा. बॅंक दर, ब्त्ए ैस्त इ. मध्ये वाढ किंवा घट, खुल्या बाजारात रोख्यांची खरेदी विक्री या व्दारे पैसाच्या पुरवठा नियंत्रित करून किंमत पातळी नियंत्रित ठेवली जाते.

ब) राजकोषीय उपाय :–करारोपन, सार्वजनिक व्यय तसेच सार्वजनिक कर्ज या उपयांना राजकोषीय उपाय म्हणतात या राजकोषीय व्यवहाराव्दारे किंमतवाढ नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. हे उपाय पुढील प्रमाणे आहेत.

1) अनावश्यक सार्वजनिक खर्चात घटः–सरकारचा बिगर योजना खर्च (अनुत्पादक खर्च) कमी करून, उपभोक्ते यांच्याजवळील पैसा कमी केला तर किमतीच्या पातळीत होणारी वाढ रोखली जाऊ शकते.

2) करामध्ये वाढ :–देशातील श्रीमंत व्यक्तीवर व चैनिच्या वस्तूवर अधिक कर लावल्यास यांच्याजवळील कयशक्ती कमी होऊन वस्तू व सेवांची मागणी कमी केल्या जाईल परिणामतः किंमतीच्या पातळीत होणारी वाढ रोखली जाउ् शकते.

3) बचतीमध्ये वाढ :–जीवनमानाचा खर्च वाढलेले लोक एच्छिक बचत करण्यास तयार नसतात तेव्हा सरकारने बचतीला प्रोस्ताहन देणाऱ्या विवीध योजना उदा. प्रॉव्हिडंड फंड, आकर्ष विमा योजना इ. उपभोग खर्च कमी होऊन बचतीत वाढ होईल व किंमतवाढ नियंत्रित ठेवण्यास मदत होईल.

4) संतुलित अंदाजपत्र :–सरकारने संतुलित अंदाजपत्र मांडल्याने अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा अधिक होणार नाही. लोकांच्या हातात कमी पैसा गेल्याने त्यांची कयशक्ती वाढणार नाही परिणामतः किंमतवाढ नियंत्रित राहील.

क) इतर उपाययोजना :–मौद्रीक व राजकोषीय उपयांच्या व्यतिरिक्त इतर उपायांचा अवंब करून किंमतवाढ नियंत्रित ठेवता येते ते उपाय पुढील प्रमाणे

1) उपभोग्य वस्तूचे उत्पादन वाढविणे :–शेतमालाच्या उत्पादनाला उत्तेजन देऊन अन्नधाण्याचे उत्पादन वाढविणे विशेषतः अन्नधान्य, कापड, खाद्यतेल, साखर, भाज्या या वस्तूंच्या उत्पादनात वाढ करून पुरवठ्यात वाढझाल्यास किंमतवाढ नियंत्रित राहील.

2) शेती उत्पादनाच्या घटकांचा पुरवठा :–शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी सरकारणे सुधारित बी–बियाणे, खते, सिंचन व्यवस्था, अन्न दरात कर्ज पुरवठा इ. सोयी पुरवण्यात येवून उत्पादन वाढ होऊन वस्तूच्या पुरवठ्यात वाढ होईल.

3) औद्योगिक उत्पादनात वाढ करून औद्योगीक वस्तूच्या पुरवठ्यात वाढ करावी

4) लोकसंख्या वाढीला आळा घालणे.

5)साठेबाजीचे व्यवहार नियंत्रीत करणे.

6) आवश्यक वस्तूंच्या किंमती कायद्याने निर्धारित करणे.

7) वाटप पध्दतीचा अवलंब करून वस्तूची मागणी मर्यादीत करणे.

8) योग्य मजूरीह धोरणाचा अवलंब करून अर्थव्यवस्थेतीला पैसाचा पुरवठा नियंत्रित करावा.

सरकार वरील सर्व उपायाव्दारे अर्थव्यवस्थेतील किंमत वाढीचे नियंत्रण करू शकते. किंमतवाढ किती नियंत्रित राहील हे या उपायांचा अवलंब किती प्रभाविपणे सरकार करते हयावर अवलंबून असते. या उपायांपैकी अनेक उपायांचा एकाच वेळी अवलंब केला तर किंमत वाढ प्रभाविपने नियंत्रण होउ् शकते. या उपयांचा अवलंबन वर्तमान कालीन केंद्रसरकारने केला असल्यामुळे काही प्रमाणत किंमत वाढ नियंत्रित असल्याचे दिसते.

संदर्भ ग्रंथ

1) भारतीय अर्थव्यवस्था रंजन कोलांम्बे
2) भारतीय अर्थव्यवस्था गौरव दत्त व अश्विनी महाजन आवृत्ती 53
3) अर्थविश्व त्रैमासिक जुलै ते सप्टेंबर 2014
4) अर्थसंवाद त्रैमासिक जुलै ते सप्टेंबर 2014
4) अर्थसंवाद त्रैमासिक जुलै ते सप्टेंबर 2008
5) योजना मासिक मार्च 2008
6) भारतीय अर्थव्यवस्था डॉ. सुधाकर शास्त्री
7) भारतीय अर्थव्यवस्था देव झामरे

# वृध्दांचे कुटुंबातील स्थान आणि समस्या

**प्रा.डॉ.शिंदे नवनाथ श्रीरंग** सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना :**भारतीय समाजामध्ये संस्थातर्गत होणा–या पेच प्रसंगामुळे सामाजिक संस्थात्मक समस्या निर्माण झालेल्या ओहत औदयोगीकरण, नागरीकरण, दळवणाच्या साधनातील प्रगती, शिक्षणाचे वाढते प्रमाण, झपाटयाने वाढणारे नागरीकरण, तंत्रज्ञानामध्ये झालेली क्रांती, आधुनिकीकरण आणि जागतीकीकरणाच्या प्रक्रियेमुळे विवाहसंस्था, कुटुंबसंस्था प्रभावित झालेल्या आहेत. या सामाजिक संस्थांचे स्वरुप, संरचना आणि कार्ये यांच्यामध्ये मोठया प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. त्यातूनच अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. पारंपारिक संयुक्तकुटुंबाचे विघटन होवुन, विभक्त, केंद्र कुटुंबाचे प्रमाण वाढत आहे. अनेक पिढयांचे सदस्य एकत्र राहणारी कुटुंबे विघटीत होउन आज पति–पत्नि आणि त्यांची दोन अविवाहीत मुले असे चार व्यक्तींचे मिळून छोटी कुटुंबे निर्माण झाली. ग्रामीण तसेच शहरी, नागरी भागामध्ये या कुटुंबाचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढत आहे. संयुक्त कुटुंबामध्ये असणारे वृध्दांचे महत्वाचे स्थान आज विभक्त ग्रामीण व नागरी कुटुंबात दुय्यम, कमी महत्वाचे होत आहे. आज वृध्दांच्या समस्या हया ग्रामीण व नागरी भागामध्ये मोठया प्रमाणावर दिसून येत असल्या तरी दोन्ही भागातील वृध्दांच्या समस्येचे स्वरुप व व्याप्ती भिन्न आहे. सदरील शोध निबंधामध्ये वृध्दांचे कुटुंबामधील स्थान व त्यांच्या समस्या यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :** सदरील शोध निबंधाचे उद्देश खालील प्रमाणे राहिले आहेत.

१) सध्या वृध्दांचे कुटुंबात स्थान काय आहे याचा अभ्यास करणे.

२) वृध्दांच्या विविध असणा–या समस्यांचा अभ्यास करणे.

३) वृध्दांसंबंधीचे शासनाचे धोरण व योजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**सदरील शोध निबंध हा प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांवर आधारीत असून दुय्यम सामग्री मध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, शासकिय आकडेवारी, अहवाल इत्यादीचा आधार घेतला आहे. तर प्राथमिक स्त्रोत म्हणून वृध्दांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या आहे. याआधारे मिळवलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

**वृध्दावस्थेचा अर्थ :**साधारपणे वृध्दावस्था ही मानवी जीवनातील काळानुसार येणारी एक अवस्था आहे. मानवी जीवनाच्या प्रामुख्याने चार अवस्था मानल्या जातात. बाल्यावस्था, तारुण्यावस्था, प्रौढावस्था व वृध्दावस्था या चार अवस्थेपैकी शेवटची अवस्था म्हणजे 'वृध्दावस्था' होय. वृध्दावस्था ही जैविकदृष्टया अपरिहार्य अवस्था आहे. व्यक्तीची इच्छा असो की नसो या अवस्थेतून प्रत्येकाला जावेच लागते. वृध्दावस्थेची निश्चित व्याख्या करता येत नाही. कारण ही अवस्था प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतीशी निगडीत आहे. पाश्चिमात्य देशामध्ये वृध्दांच्या प्रश्नांचा शास्त्रशुध्द अभ्यास करण्यासाठी 'वृध्दापकाळाचे शास्त्र' (Gerontology Science of old age) या नावाचे स्वतंत्र शास्त्र निर्माण झाले आहे.वृध्दावस्थेची व्याख्या करण्याचा प्रयत्न कांही विचारवंतांनी केला आहे. एलिझाबेथ हरलॉक यांच्या मते, ''वृध्दावस्था हे मानवी जीवनातील अंतिम, शेवटचे चरण आहे''. तर हेन्री आणि क्युमिंग म्हणतात, ''जीवनातील उपयोगी व अभिलाषा असणा–या आरंभीच्या अवस्थेपासून दूर जाणाच्या प्रक्रियेला वृध्दावस्था म्हणतात'' विविध व्याख्येवरुन असे दिसून येते की, वृध्दावस्था म्हणजे प्रौढ व्यक्तीच्या जीवनातील अंतिम कालखंड होय. तरी पण वृध्दावस्थेचा आरंभ केव्हा होतो, वयाच्या नेमकी कोणत्यावर्षी वृध्दत्वाची लक्षणे दिसू लागतात या प्रश्नांची उत्तरे नेमकी देता येत नाहीत. कारण व्यक्तीचे आयुर्मान, राहणीमानाचा दर्जा, हवामान,. शारीरिक आरोग्य, कामकरण्याची क्षमता, यागोष्टी देशपरत्वे वेगवेगळया असतात. यामुळे अभ्यासकांमध्ये मतभिन्नता आढळून येते. काही देशामध्ये वृध्दापकाळाची सुरुवात ६७ वर्षानंतर तर कांही देशात ६५ वर्षानंतर होते असे मानले जाते.

**वृध्दांचे कुटुंबातील स्थान:**पारंपारीक संयुक्त कुटुंबामध्ये वृध्दांना महत्वाचे स्थान होते. संयुक्त कुटुंबामध्ये अनेक पिढयांचे सदस्य एकत्र राहत असल्यामुळे कुटुंबाचा आकारही मोठा होता. प्रत्येक कुटुंबाचा एक स्वतंत्र व्यवसाय होता. त्या व्यवसायाचे शिक्षण एका पिढीकडून दुस–या पिढीकडे हस्तांतरीत करण्याचे काम कुटुंबच करीत असे. त्यामध्ये व्यवसायाच्या अनुभवाचे ज्ञान घरातील जेष्ठ, वृध्द व्यक्तीकडून मिळत असे. वृध्दांच्या ज्ञानाचा, त्यांच्या अनुभवाचा फायदा नवीन पिढीना मिळत होता. त्यामुळे वृध्दांना महत्वाचे स्थान होते. आर्थिक स्वरुपाचे, राजकिय स्वरुपाचे विवाह विषयक निर्णय घेण्याचे काम घरातील जेष्ठ, वृध्द सदस्य करीत असत. त्यांच्या शब्दाला मान होता. परंतू आज संयुक्त कुटुंबाचे विघटन झाले आणि केंद्र कुटुंबे अस्तित्वात आली. शिक्षणाचे प्रमाण वाढले आणि पारंपारीक कौटुंबीक व्यावसायिक शिक्षणापेक्षा शाळा महाविदयालयातून मिळणा–या व्यवसायीक शिक्षणाला आधिक महत्व प्राप्त झाले. व्यवसायाचे प्रशिक्षण देणा–या संस्था अस्तित्वात आल्या. त्यामुळे आज व्यवसायीक दृष्टीकोणतून घरातील वृध्दांच्या अनुभवाचा फारसा उपयोग होताना दिसत नाही. शिक्षणाचे प्रमाण वाढल्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्याचा विकास झाला. निर्णय घेण्याची प्रक्रिया बदलली कुटुंबाच्या अधिसत्तेने परिवर्तन झाले. नोकरी करीत असतांना प्राप्त झालेले सामायिक स्थान प्रतिष्ठा सेवा निवृत्तीनंतर कमी होते व ते स्वाभाविक आहे. सेवानिवृत्तीमुळे वैयक्तिक, कौटुंबीक व सामाजीक जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून येतात. त्यामुळे पारंपारीक कुटुंबात महत्वाचे असणारे वृध्दांचे स्थान आधुनिक कुटुंबात दुयम झाल्याचे दिसून येते. ग्रामीण आणि शहरी भागामध्ये मुले कमवती झाल्या बरोबर ते वेगवेगळे राहतात घरातील वृध्दांना वेगळे राहावे लागते. त्यातून वृध्दांच्या अनेक समस्या निर्माण होतात दिसत आहेत.

**वृध्दांच्या प्रमुख समस्या:** वृध्दांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. प्रत्येक व्यक्तिपरत्वे समस्यांचे स्वरुप व व्याप्ती वेगवेगळी असली तरी एकंदरीत वृध्दांच्या एकत्रीत कांही समान समस्या असतात त्या स्थूलमानाने सांगता येतील.

**१) शारीरिक समस्या :** वयानुरुप शरीरामध्ये अनेक बदल घडत असतात. शरीरीरातील वेगवेगळया अवयवांची कार्यक्षमता कमी झालेली असते. शरीरसंरचनेत अंतर्गत व बाहय दोन्हीही स्वरुपात बदल झालेला दिसून येतो. उदा. शरीरावर सुरकुत्या पडणे, दात पडणे, डोळयांची नजर कमी होणे, कमी दिसणे, शरीराला बाक येणे, हातापायांना कंप सुटणे, कानाने कमी ऐकू येणे, इत्यादी वृध्दांमध्ये बाहय स्वरुपाची लक्षणे दिसतात, प्रतिकारक्षमता कमी होणे, पचनशक्ती कमी होणे, रक्तदाब कमी किंवा जास्त असणे, मलमूत्र विसर्जनावरील नियंत्रण कमी होणे, अनेक आजार होतात. हे अंतर्गत बदलाची लक्षणे दिसून येतात. त्यातून अनेक गुंतागुंतीच्या शारिरीक पातळीवरच्या समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

**२) मानसिक समस्या** (Psychological problems): वृध्दावस्थेमध्ये ज्याप्रमाणे शारिरीक बदल होत असतात त्याप्रमाणे मानसिक पातळीवरही कांही बदल होत असतात आपण निरुपयोगी आहोत. अन्य व्यक्तींना आपला उपयोग होत नाही आपण केवळ कुटुंबावर बोजा आहोत.ही भावना वाढीस लागते. वृध्दत्वाच्या काळामध्ये स्मरणशक्ती कमी होत असते. अगदी साध्या–साध्या गोष्टी लक्षामध्ये राहत नाहीत. तसेच आपल्याकडे कुटुंबातील सदस्य लक्ष देत नाहीत किंवा कोणत्याही निर्णय घेताना मत, सल्ला विचारला जात नाही किंवा विचारान घेतला जात नाही. त्यामुळे वृध्दांमध्ये चिडखोरपणा, हेखेखोरपणा

वाढीस लागते. ही सर्व लक्षण जरी वृध्दांमध्ये दिसत असली तरी सर्वांमध्ये सारख्याच प्रमाण आढळत नाहीत. व्यक्तीपरत्वे कुटुंबातील वातावरण, इत्यादीवर अवलंबून असते. 'साठी बुध्दी नाठी' ही म्हण वृध्दव्यक्तींच्या अनुभवातूनच निर्माण झाली आहे.

३) **परावलंबित्व (Dependency):** वृध्दावस्थेमध्ये इच्छा असो वा नसो आपल्या गरजापूर्ण करण्यासाठी वृध्दांना दुस–यावर अवलंबून राहावे लागते. मग पैशासाठी असो किंवा प्रवास करताना, दवाखान्यात जातात, दिनचर्येतील कामे असोत त्यासाठी दुस–यावर अवलंबून रहावे लागते. कुटुंबातील सदस्य मदत करीत असतात परंतू अनेकदा कुटुंबातील सदस्यांना इतर कामांच्या व्यापामुळे वृध्दांना वेळ देता येत नाही. तेव्हा वृध्दांची आबाळ होते. अशा वेळी वृध्दांनमध्ये आपण परावलंबी असल्याची भावना तीव्र होते. आज वृध्दांचे कुटुंबातील मुलांशी, सुनेशी, नातवंडाशी, व इतर सदस्यांशी असणारे संबंध, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, कर्तव्य भावना, आर्थिकदृष्टया, स्वयंपूर्णता असने, या गोष्टी महत्वाच्या ठरतात.जर वृध्द सेवानिवृत्त असेल त्याची पेन्शन चालू असेल तर त्याचे आर्थिक दृष्टया स्वावलंबन आहे. त्यावेळी कुटुंबातील सदस्य गोळया, औषधे, दवाखाना वेळेवर करतात परंतू जर वृध्द पेन्शन धारक नसतील तर व मुलाची आर्थिक स्थिती नसेल तर मात्र वृध्दांची हेळसांड अधिक होते कारण आर्थिक व शारिरीक दृष्टया परावलंबित्व वाढत जाते, ग्रामीण भागातील व पेन्शनधारक नसणा–या वृध्दांचे हाल अधिक होताना दिसतात. आई–वडीलांची वृध्दापकाळामध्ये सेवा करणे कर्तव्य माणून सेवा करणारी असंख्य कुटुंबे आहेत पण त्यांचे प्रमाण बोटावर मोजण्या इतके आहे.

४) **वृध्दापकाळातील जुळवणूक (Old adjustment):** वृध्दापकाळातील जुळवणूक ही अत्यंत महत्वाची समस्या आहे सर्वच वृध्दांसाठी लागु पडते निवृत्तीमुळे शहरातील वृध्दांना आता वेळ कसा घालवायचा ? असा प्रश्न पडतो. शिवाय सभोवतालच्या परिस्थितीमध्ये बदल झालेला असतो. त्या परिस्थीतीशी जूळवून घेता आले नाही तर अनेक समस्या निर्माण होतात कुटुंबातील सदस्यामध्ये वैचारीक जूळवून घेणे गरजेचे असते परंतु दोन पिढयांमध्ये वैचारीक फरक पडतो. त्यामुळे जुळवून घेताना अडचणी येतात. ब–याचंदा आमच्या काळात असे नव्हते, तसे नव्हते, हे योग्य ते अयोग्य अशा गोष्टी वृध्दांकडून ऐकाव्या लागतात तर तरुण पिढीकडून तुमच्या काळात असे नव्हे पण आज आम्हाला मिळत आहे त्याचा आनंद घेवु द्या, असे संवाद घरोघरी घडत असतात. जर या दोन्ही विचारास समन्वय घडला नाही दोघांनी एक–दूस–याशी जूळवून घेता आले नाही तर अनेक समस्या निर्माण होतात. वृध्दांनाच परिस्थितीशी जूळवून घ्यावे लागते त्यांना स्वत:च्या मर्जीप्रमाणे जगण्यासाठी मर्यादा येतात तरुण पणातील सवयी आवडी–निवडी यांना वृध्दपकाळात मुरड घालावी लागते कुटुंबातील सदस्यांच्या कला प्रमाणे जीवन जगावे लागते.

**वृध्दासंबंधीचे राष्ट्रीय धोरण व वृध्द कल्याण योजना** : भारतामध्ये वृध्दांना नेहमीच सन्मानाने वागवले जाते. वृध्दांना समाजामध्ये चांगले जीवन जगता यावे यासाठी शासकिय पातळीवरुन प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी भारत सरकारने जानेवारी १९९९ मध्ये वृध्द व्यक्तींसाठी राष्ट्रीय धोरणाची घोषणा केली या धोरणाचे उददेश पुढील प्रमाणे राहिले आहेत.

१) वृध्द व्यक्तींना त्यांच्या स्वत:च्या तसेच जोडीदाराच्या वृध्दापकाळासाठी तरतुदी करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
२) कुटुंबांना त्यांच्या वृध्द सदस्यांची काळजी घेण्याबाबत प्रोत्साहन देणे.
३) कुटुंबांनी वृध्द व्यक्तींची काळजी घेण्यासाठी केलेल्या व्यवस्थेला स्वयंसेवी आणि बिनसरकारी संघटनाचे योगदान प्राप्त करणे.
४) असाध्य रोगाने आजारी असलेल्या वृध्द व्यक्तींना संरक्षणाची व देखभालीची व्यवस्था करणे
५) वृध्द व्यक्तींना आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करुन देणे.
६) वृध्द व्यक्तींची सेवा करणा–या आणि त्यांची काळजी घेणा–या व्यक्तींना संशोधन व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देणे.
७) वृध्द व्यक्तींना स्वतंत्र व स्वावलंबी नागरिक म्हणून स्वत:च्या विकास करुन घेता यावा अशा प्रकारची जागरुकता त्यांच्यात निर्माण करणे.

**केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या वृध्दांसाठीच्या महत्वाचा योजना:** केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाने देशातील व राज्यातील वृध्दांच्या कल्याणासाठी कांही योजना आखल्या आहेत. त्याव्दारे वृध्दांना सन्मानाने जागता यावे यासाठी प्रयत्न केले आहेत.

**१) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना :** हि योजना १ ऑगस्ट २००८ पासून सुरु करण्यात आली. या योजने अंतर्गत ६५ वर्षे वयांवरील दारिद्रय रेषेखालील निराधार वृध्दांना दरमहा ४००/– चारशे रुपये निवृत्तीवेतन देण्यात येते.

**२) इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तिवेतन योजना :** ही केंद्र शासनाची योजना राज्यात १९ नोव्हेंबर २००७ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ६५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तींस शासनाकडून दरमहा २००/– दोनशे रुपये मानधन मिळते.

**३) संजय गांधी निराधार अनुदान योजना :** या योजने अंतर्गत ६५ वर्षे पेक्षा कमी वयाच्या निराधार व्यक्ती, अनाथ मुले, सर्व प्रकारच्या अपंग व्यक्ती क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग, या सारख्या असाध्य आजारांमुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणा–या व्यक्ती, आत्महत्या केलेल्या शेतक–यांच्या विधवा, निराधार विधवा, घटस्फोटीत महिला, अत्याचारग्रस्त व वेश्याव्यवसायापासून मुक्त झालेल्या महिला यांना या योजनेचा लाभ मिळतो.

**४) इंदिरा गांधी भूमिहीन वृध्द शेतमजूर सहाय्य योजना :** महाराष्ट्रशासनाची ही योजना असून ही योजना भूमिहीन शेतमजूरांसाठी आहे. महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजूरांची संख्या अधिक आहे तेव्हा वृध्दावस्थेमध्ये साहाय्य व्हावे व त्यांना किमान आपल्या गरजा पुर्ण करता याव्यात या उददेशाने ही योजना सुरु करण्यात आली आहे.

अनेक योजनांच्या माध्यमातून वृध्दांना वृध्दापकाळात चांगले जीवन जगता यावे यासाठी मदत केली जाते फक्त या योजना त्यांच्या पर्यंत पोहचवून त्याचा लाभ लाभार्थ्यांना मिळाला पाहिजे.

**निष्कर्ष:** एकंदरीत आज कुटूंब व्यवस्थेमध्ये काळानुरुप अनेक वेगवेगळया घटकांच्या प्रभावामुळे संस्थनात्मक व कार्यात्मक परिवर्तन घडून येत आहे. त्यामध्ये वृध्दांचे स्थान बदलले आहे वृध्दांकडे पाहयाचा दृष्टीकोण बदलेला आहे त्यातून वृध्दांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आरोग्यप्रती झालेली जाणीव जागृती, वैदयकिय सेवा, राहणीमानाचा उंचावलेला दर्जा, इत्यादीमुळे वृध्दांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे वृध्दांच्या समस्या ही आज महत्वाची सामाजिक समस्या बनली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी कौटुंबीक पातळीवरुन, शासन पातळीवरुन, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१) भारतातील सामाजीक समस्या, रा. ज. लोटे, पिंळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर
२) मानवी हक्क, प्रा.व्ही.बी.पाटील, के सागर पब्लिकेशन, पुणे
३) भारतातील सामाजिक समस्या, नाथ प्रकाशन, औरंगाबाद
४) भारतातील समाज: प्रश्न आणि समस्या, प्राचार्या डॉ.दा.धो. कांचोळे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
५) भारतीय समाज: प्रश्न आणि समस्या, डॉ. सुधा काळदाते, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

# कांतीकारी संत सेवालाल

**डॉ.वसंत गोविंद चव्हाण**
**वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय पाळोदी ता.मानोरा . जि.वाशिम**
मो.नं. 8805667378ई–मेल : vasantchavhan642@gmail.com

प्रत्येक जनजातीचा काही धार्मीक वैशिष्टये आहेत. त्यांची देवदेवतांची पुजा आणि त्यांचे रक्षक म्हणुन असलेले स्थान या जाती जमातीत वा समाजात महत्वपुर्ण असते . गोर बंजारा निसर्ग पुजक जमात निसर्गातील शक्ती, पृथ्वी, जल, अग्नी, वायु, याची पुजा गोरबंजारा समाज वा जमात फार पुर्वीपासुन करत आलेले आहेत.बंजारा समाज वृषभ (गराशा) पुजक व मातृपुजक आहे.बंजारा समाजाचे संत शिरोमणी जगतगुरू ब्रम्हांडनायक सेवालाल, सेवाभाया, सेवादास, मोतीवाळो, तोळावाळो, पोहरावाळो, आईवाळो,बावालाल अशा अनेक नावांनी संपुर्ण भरतात तथा भारता बाहेरील बंजारा प्रभावीत वा वास्तव्य असलेल्या (जवळजवळ 64देशात) भागांत ओळखले जातात या दिव्य अवतारी पुरूषाचा कांतीकारकाचा, समाज सुधारकाचा, भविष्यवेत्याचा जन्म 15 फेब्रुवारी 1739 रोजी गोलाल डोडी ता. गुत्ती जि. बेलारी आंध्र प्रदेशात झाला वडीलाचे नांव भिमानायक राठोड आईचे नांव धर्मनी माता आहे.

संत सेवालाल महाराजांनी संपुर्ण आयुष्य ब्रम्हचर्य धारण करून मागासलेल्या, दिशाहीन, गरीबी दरीद्री अवस्था असलेल्या व शिक्षणा पासुन हजारो मैल दुर असणाऱ्या दऱ्या खोऱ्यात राना वनांत देशविदेशात फिरणाऱ्या व कोणत्याही प्रलोभनाला बळी पडुन धर्म बदलणाऱ्या समाजाला दिशा दाखविण्याच आकार देण्याचा अमुल्य कार्य केले. खरं तर त्यांचे उपदेश संदेश विचार (बोल) व्यक्त करण्यासाठी वा समस्त जगासमोर मांडण्यासाठी माझ्या सारख्या पामरांनी केलेला एक छोटसं

**सेवालाल महाराजांचे आदेश** गौवा कसाब को बेचना नही ..औरत बजार भेजना नही ...जिते मरद की बीबी लेना नही

**अर्थ** : गायीची रक्षा करणारे व पालन पोषण करणाऱ्यांनो गाय आपली माता आहे.गाय विकु नका, एकटया बाईला बाजारात पाठवु नका परणारी माते समान जाणावी

**सत्य दया धर्म लिनता, येगळेती रेंळुरे**
**आदीमायानं भारळं जाळुं, भवसार तरजाळुं**

**अर्थ** :जिवनामध्ये सत्याची कास धरावी व्देष मत्सर करू नये दया शिल रहावे समतेने प्रेमाने बंधुभावाने वागावे आदीमायाशी आपण एकनिष्ट राहावे. **बोल :**

**तम सोता आपने जिवनेम दिवो लगा सकोचो**
**सोतार ओळखं सोता करण दिजो**
**कोई केणी भजो मत पुजो मत**
**भजेमा पुजेमा येळ घाले पेक्षा सोता करणी करो**
**जानजो छाणजो पचच मानजो**
**गोरबंदा मारी सिकवाडीप ध्यान जोत्र**

**अर्थ** : तुम्ही स्वताच तुमची प्रगती करू शकता स्वतः प्रकाशमान व्हा त्यासाठी तुम्हाला कोणाचीही मदत घेण्याची किंवा पाय दाबण्याची गरज नाही भजन पुजनामध्ये वेळ घालण्यापेक्षा स्वतः शिक्षण घ्या मोठे व्हा कुणाची गुलामी पत्करू नका अंधश्रध्देच्या मागे लागु नका डोळस व्हा कोणतेही कार्य करण्यापुर्वी दहा वेळा विचार करा चिकीत्सक व्हा कोण काय सांगतो कसा सांगतो कसा वागतो या विषयी विचार करूनचं त्याच्या मागे जा.

**बोल :**

**सणो सामळो गोरभाई चोरी मत कर जो काई**
**लाज रकाडो धरमेरी मतलो जीव काडो मत लोई**
**सणो सामळो गोरभाई दारू मत पिवजो कोई**
**धरमेर बानी रकाळो भडके जावो लांबी झाडी**
**कोई मत बोलजो लुच्ची लबाडी**
**केसुला नाई मोरीयर गोरून रिये सांजी**
**करजो मत रंडीबाजी**

**अर्थ**:ऐका गोरबंधुनो चोरी करू नका हिंसा करू नका जिव घेवु नका दारू पिवु नका मादक द्रव्य सेवन करू नका खोटे बोलु नका व्यभिचार करू नका परस्त्रीला माता भगिनी समजा या तत्वाचा जर तुम्ही पालन केलं तर तुम्ही नक्कीच उन्हाळयात सगळीकडे उजाड उनाड भकास असल्यावर फक्त एकच झाड पळस (केसुला) फुलतो तसा तुम्हाला फुलवेल.

**बोल :**

**आई मारी लोर नंगारारे घोरेम रिजो मारे गोर**
**धास जाय कोर सत्तेर रीय जोर सदर जाय गोर**
**केसुलानाही गोर मोरीये**

**अर्थ** :संघटीत व्हा एका ठिकाणी बसा आपल्या जवळील विकार अवगुण दुर करा जेंव्हा तुम्ही विकार व्यसन मुक्त व्हाल तेंव्हाच तुमची प्रगती होईल जेंव्हा सदगुण धारण कराल तेंव्हा तुम्ही पळसा सारखे (केसुला नाई) उन्हात सुध्दा बहराल

**बोल :**

**करीय चोरी खाया कोरी**
**घरे मुंडीयांग एकच मोरी**
**हातमा हातकडी पगेमा बेडी**
**सरकारी दंडा पडीय हिंडीया डोरी**
**बात सणलं गोरबंदा मारी**

**अर्थ** : चोरी केल्याने मनुष्य श्रिमंत होत नाही उलट त्याला खाण्यासाठी अन्न मिळणार नाही हातापायांत बेडया पडतील सरकारचे दंडे दारोदारी भटकावे लागेल महारतांना भविष्य काळांत लबाडाचे गुंडांचे राज्य येणार गरीबांना लुटले जाणार समाजातील सत्ताधारी लोक समाजाला पिळुन खाणार याची जाणीव होती.

**बोल :** **गोर गरीबेन दांडणं खायं**

**सारी पिडी ओर नरकेम जाय**
**ओरे वं�पर दिवो कोणी रि**
**दांडण खाय वाको पायरिरो भाटा बणजाय**

**अर्थ** : भविष्यात गरीबांची लुट होणार फसवणुक होणार परंतु लुटणाऱ्याची सर्व पिढी नरकांत जाईल त्यांच्या वंश देखील राहणार नाही गरीबांना पिळुन खाणारा मनुष्य पायऱ्यांचा दगड होईल.

**बोल** : **छाती करीय जेन साथ दियु**
**हार नाकीय जेर ढेर पड जाय**

**अर्थ** :धिर सोड नका संकटाचा धैर्याने सामना करा त्याला मि साथ देईल जे साथ सोडतील त्याचा पराभव नक्कीच जो डर गया वो मर गया

**बोल** : बळाई हुई छोरीरो मामलो मत तोडजो

**अर्थ** : लग्न झालेल्या मुलीची फारकत करू नका तसे करणें मोठे पाप आहे.

समाजातील दिनदलीतांच्या पिडीत स्त्रीयांना मानसीक आधार देत व या विश्वातील सकल समस्त प्राणिमात्रांचे कल्याण करण्यासाठी याडी जगदंबेला प्रार्थनेव्दारे सेवालाल महाराज म्हणतात

**कोर गोरेन साई व्हेस किडी मुंगीन साई व्हेस**
**जिव जिनगानीन साई व्हेस तांडे पेढेन साई व्हेस**

सेवा भायानी विश्वकल्याण व विश्व बंधुत्वाची भावना होती

**सेवामहाराजांचे उपदे�ा खालील प्रमाणे**

**सतयुगेर बाद कलीयुग आय।**
**कलीयुगमं दुनिया बदल जाय ।**
**रपीयार तेरा चणा वकजाय ।**
**रपीया कटोरो पाणी वकजाय।**
**सोनेर सिंग व्हेजाय।**
**गोधनेन चारा कोणी मळ ।**
**हाडकारो ढेर पड जाय।**
**याडी बापेन बेटा भारी व्हिय ।**
**बप बेटारो पट कोणी ।**
**धणी – गोळणी पटकोणी ।**
**सासु बोडीरो पट कोणी ।**
**घरे घरे म कल्होळ चालीय।**
**घर घर वैद्य फरीय ।**
**नव नवे दु:ख आय।**
**चालतु बोलतु मनक्या मर जाय ।**
**कौकर इंग्रज धास जाय ।**
**जनतारो राज आय ।**
**रंडी राज आय ।**
**खरे लार कोणी जाव ।**
**खोटे लार 500 मनक्या जाय ।**
**पापीर घर लक्ष्मी रीय ।**
**मलकेर खबर पलकेम आय ।**
**सेवभाया तो लीए अवतार ।**
**गोरबंदान तारीय तारीय ।**

**संदर्भ सुची :**

1)प्रा.ग.ह.राठोड : गोर बंजारा समाज यह हिंदु नही वह बुध्दानुयायी था
2)प्रा.मोतीराज राठोड :सिंधु संस्कृती पुर्व गोर संस्कृती
3) प्रा. कानीटकर :हिस्ट्री ऑफ इंडिया
4) प्रा.मोतीराज राठोड :गोर बंजारा वं�ाचा इतिहास
5) प्रा.मोतीराज राठोड: प्राचीन बंजारा समाज व्यवस्था
6) प्रा.मोतीराज राठोड:तथागत गवतम बुद अन जगतगुरु संत सेवालाल ( बंजारा भाशेत)
7) प्रा.गणपत राठोड : बंजारा लोक गितोमेनारीयोका योगदान
8) श्री.बळीराम पाटील :बंजारा लोगोका इतिहास
9)डॉ. अ�ाोक पवार डॉ.सुनिता राठोड:बंजारा समाजाचा दारिद्रनामा
10) कोमलसिंग लालसिंग :अने बंजारा संस्कृती
11) आत्माराम कनिराम राठोड :गोर बंजारा इतिहास व लोकजिवन
12) डॉ.वी.रामकोटी बंजारा :लोकगित
13) प्रा. मोतीराज राठोड :बंजारानामा
14) प्रा. मोतीराज राठोड :लदेणी

# चार्वाक दर्शन व जैन दर्शन एक अध्ययन

सोमनाथ शिंदे , संस्कृत व शब्दकोश विभाग,डेक्कन कालेज पुणे 06, मो.न.9922239407, e Mail shastrisomnath@gmail.com

---

विश्वसाहित्य के अवलोकन से विद्वानों व भाषाविदों के अनुसंधान के पश्चात् भारतीय साहित्य को प्राचीन होने का गौरव प्राप्त है । संस्कृत साहित्य ज्ञान का वह सागर है जिसमें भिन्न भिन्न विषयक नदियों को समाहित करने की क्षमता है । किसा भी विषय से संबंधित प्रश्नों यथा-ज्ञान,कर्म,उपासना,विज्ञान,आत्मा,परमात्मा,प्रकृति आदि का विश्लेषण संस्कृत वाङमय में ही प्राप्त होता है । साहित्य का आधार वेद,उपनिषद,ब्राह्मणग्रंथ,आरण्यकग्रंथ,शिक्षाग्रंथ आदि हैं ।

**दर्शन शब्द की उत्पत्ति-** 'दृश दर्शने' धातु से निष्पन्न दर्शन शब्द जिसका अर्थ है देखना या देखने का साधन 'दृशते अनेन इति दर्शनम्' या जिससे देखा जाए या तत्त्व से स्वरुप का बोध हो जाए । 'तत्वं पुषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये' (ईशावास्योपनिषद् 15) अतः दर्शन उस विद्या को कहते है जिससे तत्त्व का साक्षात्कार किया जा सके । भारतीय दर्शन का आरम्भ ही जीवन की समस्याओं के निराकरण की तीव्र उत्कण्ठा से हुआ हैं ।

**दर्शनों के अविर्भाव का प्रयोजन -** भारत में दर्शनों के विकास का मूल कारण ही अध्यात्मिक असंतोष है । यह संसार क्या है ? संसार का क्या प्रयोजन है ? जीव,आत्मा,ईश्वर इन सबका स्वरुप क्या है ? ईश्वर है अथवा नही ? जीव का चरम प्रयोजन क्या है ? शुभ अशुभ उचित अनुचित आदि नैतिक निर्णय कैसे हो ? जीवन के विविध दुःखों से निवृत्ति का उपाय क्या है ? आदि प्रश्नों को समाधान के लिए भारतीय दर्शनों का आविर्भाव हुआ ।

**भारतीय दर्शन का वर्गीकरण –** भारतीय दार्शनिकों ने दर्शनों को दो भागों में विभक्त किया है-1.आस्तिक दर्शन 2.नास्तिक दर्शन। सामान्य अर्थ में –ईश्वर की सत्ता माननेवाले को आस्तिक तथा ईश्वर की सत्ता का निषेध करनेवाले को नास्तिक कहते है । आस्तिक दर्शनों में न्याय,वैशेषिक,सांख्य,योग,पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा इन छह दर्शनों को रखा गया है । नास्तिक दर्शनों में चार्वाक,जैन व बौद्धदर्शन सम्मिलित किये गये हैं ।

**चार्वाक दर्शन -**भारतीय दार्शनिक चिंतन में चार्वाक दर्शन को नास्तिक,अनीश्वरवादी,प्रत्यक्षवादी,सुखवादी तथा जडवादी दर्शन के रूप में जाना जाता है । अवैदिक दर्शनों में 'चार्वाक दर्शन' ही प्राचीनता की दृष्टि से सर्वप्रथम माना जाता है । इस दर्शन का सबसे प्राचीन नाम 'लोकायत' है । लोक में अधिक प्रचलित होने के कारण इसे 'लोकायत' भी कहते है । लोकायत कहने का तात्पर्य यह भी है कि यह दर्शन इसी लोक में विश्वास करता है । इससे भिन्न लोकों का चार्वाक दर्शन निषेध करता है ।

The Sástra is called Lokyata for it holds that only This world or Loka (Indian philosophy) vol.1 p.279 कुछ विद्वानों का मानना है कि चार्वाक शब्द की उत्पत्ति 'चर्व अदने' धातु से हुई है जिसका अर्थ है चबाना या भोजन करना । इस दर्शन का मूलमंत्र है खाओ पिओ और मौज करो । 'पिब् खाद् च जात शोभने । (षड्दर्शन समुच्चय पृ.क्र.3)

**चार्वाक के सामान्य सिद्धान्त-** यह संसार भोग का क्रिडास्थल है, परलोक नामक कोई लोक नही है । शरीर ही आत्मा है मृत्यु ही मुक्ति है । जब तक शरीर में प्राण है सुख प्राप्ति का विचार करना चाहिए । धर्म नामक कोई पुरुषार्थ नही है, मानव जीवन में काम ही पुरुषार्थ है । 'काम एवैकःपुरुषार्थः,मरणमेवापवर्गः।चार्वाक सिद्धान्तों का प्रचार इस देश में सुदूर प्राचीन काल से चला आ रहा है । स्वतंत्रवादी चार्वाकों का एक सिद्धान्त था । यावज्जीवेत्सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् । भस्मीभूतस्य देहस्य पुनररागमनं कुतः ।।

**चार्वाक के मुख्य सिद्धान्त-**चार्वाक के मुख्य तीन सिद्धान्त है – 1.ज्ञानमीमांसा,2.तत्त्वमीमांसा,3.आचारमीमांसा ।

**1.) ज्ञानमीमांसा-** चार्वाक के मत प्रत्यक्ष ही केवल प्रमाण है । अनुमान,शब्द आदि की सत्ता निराधार मानी जाती है ।

'प्रत्यक्षमेव प्रमाणम् तत्र किं अन्य प्रमाणापेक्षम् ।'' (बृ.सूत्र)

इन्द्रियों से जो ज्ञान होता है वही प्रत्यक्षज्ञान है । प्रत्यक्ष के द्वारा जो ज्ञान प्राप्त होता है वही विश्वसनीय और वास्तविक है । अप्रत्यक्ष,अनास्वादित,अनाघ्रात,अदृष्ट तथा आश्रुत के द्वारा जो ज्ञान होता है वह चार्वाक को स्वीकृत नही है । अनुमान लोक व्यवहार का साधन माना जाता है, चार्वाक के मत में लोकव्यवहार के लिए निश्चय की आवश्यकता नही,आवश्यकता संभावना की है, संभावना के आधार पर समस्त जगत का लोक व्यवहार चलता है । चार्वाक के मत में कार्यकारणभाव के लिए कोई स्थान नही है । संसार की विचित्रता कार्यकारणभाव से नही अपितु स्वभाव के कारण है, सुख का कारण न तो धर्म है और न दुःख का अधर्म । मनुष्य स्वभाव से सुखी अथवा दुःखी होता है । इन्ही विचारों के कारण चार्वाक का सिद्धान्त 'स्वभाववाद' के नाम से दार्शनिक जगत में विख्यात है । वे जगत की उत्पत्ति तथा विनाश का मूल कारण 'स्वभाव' को ही मानते हैं ।

**2.) तत्वमीमांसा –** चार्वाक दर्शन का तत्त्व संबन्धी मत भी विचित्र है । वे पृथिवी,जल,तेज तथा वायू ये ही चार जगत के तत्त्व है ऐसा मानते हैं । 'पृथिव्यप्तेजोवायुरिति तत्त्वानि ।'' आकाश तत्त्व को नही मानते हैं, व न मानने का कारण यह देते है कि आवरणाभाव के कारण आकाश शून्य ही है, अतःआकाश सत्तात्मक पदार्थ नही है । आत्मा के संबन्ध में प्रायः सभी दर्शन एकमत हैं परन्तु चार्वाक इस

विषय में अपवाद स्वरुप है । प्रत्यक्ष को ज्ञान का साधन मानने से आत्मतत्त्व का प्रत्यक्षीकरण नही होता अतः आत्मा का अस्तित्व अस्वीकृत करते हैं । न स्वर्गो नापवर्गो वा नैव आत्मा पारलौकिकः । (सर्वदर्शन संग्रह 1.12)

**3.)आचारमीमांसा –** दार्शनिक लोग मानव मात्र के लिए धर्म,अर्थ,काम एवं मोक्ष इन चार पदार्थों को उपादेय बतलाते है इन्हे पुरुषार्थ चतुष्टय भी कहते हैं । चार्वाक दर्शन धर्म एवं मोक्ष के अस्तित्व को अस्वीकार करते हैं । धर्म के संदर्भ में चार्वाक कहते हैं कि शरीर को भिन्न भिन्न कष्ट देकर कष्ट तपस्या करना तथा द्रव्य का व्यय उठाकर यज्ञानुष्ठान करना व्यर्थ है । वे स्पष्ट शब्दों में धर्म तथा अधर्म में न तो विश्वास करते हैं और न ही पाप पुण्य के फल को स्वीकार करते हैं ।

**समीक्षा-** चार्वाक दर्शन का चिंतन अपने आप में अन्य दर्शनों से भिन्न करता है । इसने सभी दर्शनों के सिद्धान्तों की आलोचना करके अपने दर्शन को स्थापित किया । चार्वाक दर्शन का आधार उनका प्रमाण विज्ञान है जिसकी बहुत आलोचना हुई । चार्वाक का आत्मा संबन्धी विचार भी दोषपूर्ण है । चार्वाक दर्शन आत्मा का व परमात्मा का प्रत्यक्ष ज्ञान न होने के कारण दोनों तत्त्वों को नही मानते है जिससे की नास्तिकता की श्रेणी में रखा गया है ।चारों पुरुषार्थों में काम को सर्वस्व मानना निकृष्ट व स्वार्थवादी सुखवाद को जन्म दिया है । स्वार्थमूलक सुखवाद ही उनके पतन का मुख्य कारण है । भारतीय दार्शनिक दृष्टि से वह संपूर्ण रूप से नास्तिक है, वह न वेदों को मानता है न परलोक को न ईश्वर को न धर्म को । भौतिक सुखों पर आस्था रखना इनका विप्लवकारी सिद्धान्त है परंतु ऐसा भी नही कि उनके सिद्धान्तों का महत्व नही है, उन्होनें ऋण लेकर घी (घृत) पीने की बात कही है शराब की नही । अतः स्पष्ट है कि चार्वाक दर्शन सार रहित नही है इसमें भी कुछ तथ्य ग्राह्य हैं ।

**जैन दर्शन-** जैन शब्द 'जिन्' शब्द से बना है जि का अर्थ है विजय अर्थात राग द्वेषादि शत्रुओं पर विजय पानेवाला मुक्तपुरुष । 'जिन्' का सामान्य अर्थ विजय प्राप्त करनेवाला । अतःजैन दर्शन में सभी तीर्थंकरों को 'जिन्' की संज्ञा से विभूषित किया जाता है । जैन दर्शन में चौबीस तीर्थंकरों का उपदेश सम्मिलित है परंतु मुख्यरूप से अंतिम तीर्थंकर महावीर को ही प्रचार प्रसार का श्रेय जाता है । मुख्यरूप से महावीर के उपदेशों पर ही जैन दर्शन सशक्त हुआ है । यदि यह कहा जाये कि महावीर के उपदेशों का संग्रह जैन दर्शन है तो अतिशयोक्ति नही होगी ।

**जैन धर्म के तीर्थंकर** – जैन धर्म के प्रवर्तकों व संस्थापकों को तीर्थंकर कहा जाता है । तीर्थंकर से भाव उन ज्ञान प्राप्त जितेन्द्रिय महात्माओं से हैं । जैन धर्म के अनुयायियों का मानना है कि जैन दर्शन चौबीस तीर्थंकरों के उपदेश का परिणाम है । इन चौबीस तीर्थंकरों में वृषभदेव प्रथम व महावीर अंतिम है । विद्वानों के मत से इनमें से बाईस तीर्थंकरों का विवरण काल्पनिक कथाओं,अस्पष्टता तथा अतर्क्य अतिशयोक्ति से भरे पडे हैं । तेईसवें तीर्थंकर पार्श्वनाथ को ऐतिहासिक दृष्टिकोण से प्रामाणिक माना जाता है । पार्श्वनाथ ने चार व्रतों का उपदेश दिया –अहिंसा,सत्य,अस्तेय तथा अपरिग्रह ।वे हिंसात्मक यज्ञों के घोर विरोधी थे,वे जन्मानुगत वर्णव्यवस्था को नही मानते थे ।पार्श्वनाथ के अनुयायियों को 'निर्ग्रन्थ'कहा जाता है । 'निर्ग्रन्थ'का अर्थ है बन्धन रहित मुमुक्षावस्था को प्राप्त होनेवाला ।

**वर्धमान महावीर –**महावीर का जन्म (599 ई.पू. मृत्यु 527 ई.पू.)13 वर्ष की कठिन तपस्या से कैवल्य ज्ञान की प्राप्ति । तत्कालीन समाज में जैन धर्म के सिद्धान्तों को प्रचारित किया जिसमें अंग,मगध व कौशाम्बी प्रमुख थे । महात्मा बुद्ध के निर्वाण से 50 वर्ष पूर्व महावीर निर्वाण को प्राप्त हुए । रागद्वेषादि शत्रुकों पर विजय प्राप्त करने के कारण 'जिन'तथा 'महावीर'उपाधि से अलंकृत हुए । इनकी मृत्यु के पश्चात् इस धर्म ने विशेष राजाश्रय प्राप्त किया ।

**दो सम्प्रदाय का उदय**- प्राचीन संघ में दिगम्बर ही प्रमुख थे परन्तु मगध संघ ने श्वेताम्बर को धारण करना न्यायोचित बतलाया । इस प्रकार ई.पू. द्वितीय शतक में श्वेताम्बर तथा दिगम्बर इन दो अवान्तर भेदो का उदय हुआ । तत्वज्ञान के विषय में इन दोनो में कोई भी मतभेद नही है परन्तु आचारगत भिन्नता है । दिगम्बर सम्प्रदाय में धार्मिक नियमों की कठोरता है परन्तु श्वेताम्बरों ने मानव कमजोरियों को ध्यान में रखकर नियमों में शिथिलता दी । दिगम्बरों का मानना है कि स्त्रियों को मोक्ष प्राप्त नही हो सकता, वे पुरुष जन्म ग्रहण करने पर ही मोक्ष प्राप्त कर सकते है ।

' न स्त्री मोक्षमेति दिगम्बरः'

**जैन साहित्य** – जैन सम्प्रदाय में विद्वानों की विपुलता रही हैं । उन्होनें प्राकृत व संस्कृत भाषा में अनेकों ग्रंथ लिखें हैं । आगम ग्रंथ जैन धर्म के मूल ग्रंथ हैं । आरम्भकाल में तीन विद्वानों- 1.उमास्वाति 2.कुन्दकुन्दाचार्य 3.समन्तभद्र ने सुव्यवस्थित ढंग से जैन दर्शन को सशक्त बनाने का यत्न किया । उस समय के साहित्य में उल्लेखनीय ग्रंथ है – तत्वार्थसूत्र,सर्वार्थसिद्धि,नियमसार,आत्ममीमांसा,षड्दर्शनसमुच्चय,तत्वार्थटीका,पार्शनाथचरित,प्रमाणमीमांसा आदि का आविर्भाव हुआ।

**जैन दर्शन में ज्ञान** – जैन मतानुसार जीव चैतन्य है, ज्ञान उसका साक्षात लक्षण है । यह ज्ञान दो प्रकार का है – प्रत्यक्ष तथा परोक्ष। इन दोनो शब्दों की व्याख्या में जैन दर्शन आस्तिक दर्शनों से पृथक है । परोक्ष के दो भेद है – 1.मति 2.श्रुत । अप्रत्यक्ष के तीन भद हैं – 1.अवधि 2.मनःपर्याय 3.केवल ।

**स्यादवाद** – स्यादवाद जैन दर्शन का प्रधान सिद्धान्त है स्यादवाद को ही अनेकान्तवाद भी कहा जाता है । अनेकान्तवाद के अनुसार तत्त्व अनेक हैं प्रत्येक वस्तु या तत्त्व में अनन्त धर्म हैं । 'अनन्त धर्मात्मकमेव तत्त्वम्' 'अनन्त धर्मात्मकम् वस्तु ।'

एक ही वस्तु के अनन्त धर्मो को जान सकना या इनमें से किसी एक ही धर्म को पूर्णतया जानना केवल सर्वज्ञ के लिए ही शक्य है । सामान्य पुरुष तो केवल कुछ वस्तुओं से कुछ धर्मो जान सकते हैं । जनसामान्य का ज्ञान अपूर्ण आंशिक और सापेक्ष होता है यह प्रतिपादित करनेवाला ज्ञानमीमांसा संबन्धी जैन सिद्धान्त स्यादवाद कहलाता है ।

**जैन दर्शन में द्रव्यसंबन्धी विचार** – तत्त्व वस्तु का पर्याय है वस्तु अनन्त धर्मात्मक होती है । 'अनन्त धर्मात्मकमेव तत्त्वम् ।' जैन दार्शनिकों ने द्रव्य की परिभाषा इस प्रकार की है "गुणपर्यायवद् द्रव्यम् ।" (तत्त्वार्थसूत्र 5-37) जिसमें गुण और पर्याय हो वही द्रव्य है । जैन दर्शन में प्रतिपादित द्रव्य की व्याख्या द्रव्य की साधारण व्याख्या का विरोध करती है । द्रव्य की साधारण व्याख्या में आवश्यक गुणों के आधार को द्रव्य मानते हैं किंतु जैन दार्शनिक आवश्यक व अनावश्यक गुणों के आधार को द्रव्य मानते हैं । अतःद्रव्य संबन्धी विचार आश्चर्य कारक है । इनके मत में द्रव्य दो प्रकार के है – अस्तिकाय व अनस्तिकाय । अस्तिकाय के दो भेद है – जीव तथा अजीव ।

**जीव** – बद्ध व मुक्त के भेद से जीव द्विविध है । चैतन्य जीव का सामान्य लक्षण है । 'चैतन्यलक्षणो जीव' (षड्दर्शन समुच्चय,कारिका 49)

**अजीव** – जिसमें जीव का लक्षण चैतन्य या उपयोग न पाया जाये उसे अजीव कहते है ।अजीव के पाँच भेद हैं – धर्म,अधर्म,आकाश,पुदगल और काल ।

**अनीश्वरवाद** – ईश्वर के अस्तित्व का खण्डन करने के बाद जैन दार्शनिक ईश्वर के गुणों का भी खण्डन करते हैं । इस प्रकार ईश्वर के अस्तित्व और उसके गुणों का खण्डन करने के कारण जैन दार्शनिक अनीश्वरवादी हो जाते हैं । अनीश्वरवादी होने के बाद भी उन्हें धर्म की कोटि में रखा जाता है । जैन धर्म में सैद्धान्तिक रूप से ईश्वर का खण्डन किया गया है । ईश्वर के स्थान पर तीर्थंकरों की सत्ता स्वीकार की गई है । जैन धर्म के कहलाने का एक अन्य कारण यह भी है कि ये मूल्यों में विश्वास करते हैं । अहिंसा,सत्य,अस्तेय,ब्रह्मचर्य और अपरिग्रह । इन पाँच महाव्रतों का पालन पूरी श्रद्धा से करते हैं । मूल्यों की प्रधानता के कारण जैन दर्शन को धर्म की श्रेणी में रखा जाता है ।

**जैन दर्शन की मोक्ष संकल्पना** – जैन धर्म में मोक्ष के साधन तीन है- 1.सम्यक् दर्शन 2.सम्यक् ज्ञान 3.सम्यक् चरित्र । इसे त्रीरत्न के नाम से भी जाना जाता है । जैन दार्शनिकों के अनुसार इससे ही मोक्ष प्राप्ति होती है । "सम्यक् दर्शन ज्ञान चरित्राणि मोक्षमार्गः"।

भारतीय दर्शनों ने सम्यक् ज्ञान से ही मोक्ष प्राप्ति को संभव माना है । जैन दर्शन की यह विशेषता है कि उसने तीनों एकांगी मार्गो का समन्वय किया है ।

**1.)सम्यक् दर्शन** – सत्य के प्रति श्रद्धा के भाव रखना सम्यक् दर्शन कहलाता है । कुछ लोगों में यह भावना जन्मजात रहती है और कुछ लोगों में विद्या व अभ्यास के माध्यम से धीरे-धीरे विकसित होती है । अतःसम्यक् दर्शन का अर्थ है बौद्धिक विकास ।

**2.)सम्यक् चरित्र** – सम्यक् ज्ञान के द्वारा जीव व अजीव के मूलतत्त्वों का पूर्ण ज्ञान होता है । जीव व अजीव के अन्तर को न समझने के कारण बन्धन का जन्म होता है बन्धन से मुक्त होने के लिए ज्ञान परमावश्यक है ।यह ज्ञान संशय रहित तथा दोष रहित होता है ।

**3.)सम्यक् चरित्र** – हितकर कार्यो का आचरण व अहितकर कार्यो का न करना ही सम्यक् चरित्र कहलाता है । मोक्ष की प्राप्ति के लिए तीर्थंकरों के प्रति श्रद्धा के भाव तथा सत्य ज्ञान के साथ-साथ अपने आचरण पर संयम भी परमावश्यक है । सम्यक् चरित्र मनुष्य को अपने मन,वचन और कर्म पर नियंत्रण करने का निर्देश देता है । जैनों के मतानुसार सम्यक् चरित्र का पालन करने से मनुष्य कर्मो के बन्धन से मुक्त हो जाता है ।

**समीक्षा** – जैन दर्शन इस संसार के मूल में स्थित अनेकों तत्त्वों को स्वीकार करता है । जैन दार्शनिक जगत के समस्त जीवों की सत्ता अंगीकार करते हैं । अनेकान्तवाद जैन दर्शन का माननीय तथा बहुमूल्य देन माना जाता है । मोक्ष प्राप्ति के लिए बताये तीन सोपान जैन दर्शन को अन्य दर्शनों से भिन्न करते है । जैन दर्शन एक विशिष्ट सिद्धांत की ओर इंगित करता है और वह है आचारमीमांसा जो कि बहुत ही महत्वपूर्ण अंग माना जाता है । वे अपने तीर्थंकरों को श्रद्धा तथा भक्ति का केंद्रबिंदू मानते है जो कि साकार पूजा का समर्थन करते दिखते हैं ।

**संदर्भ ग्रंथ सूची** –1.)डा.रामचन्द्र पाण्डेय, (1969) भारतीय दर्शन की भूमिका, प्रकाशकः - मोतीलाल बनारसीदास,वाराणसी

2.)आचार्य बलदेव उपाध्याय,(1971) भारतीय दर्शन, प्रकाशकः – शारदा मन्दिर,वाराणसी-5

3.)डा.ममता मिश्रा,(2000) भारतीय दर्शन, प्रकाशकः – कला प्रकाशन, वाराणसी-5

4.)स्वामी शांतीधर्मानंद,(2000) सर्व दर्शन सार, प्रकाशकः – भारतीय विद्या भवन,मुंबई

5.)डा.प्रीति प्रभा गोयल,(2008) भारतीय संस्कृति, प्रकाशकः – राजस्थानी ग्रंथागार,जोधपुर

# नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक कृषी पतपुरवठयाचे अध्ययन

डॉ. सदानंद स. धकिते विभाग प्रमुख व्यवसाय प्रबंधन व प्रशासन श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर sadananddhakite@gmail.com

प्रस्तावना :—

'सहकार' हा शब्द मूळ लॅटीन असून तो 'को—ऑपररी' या शब्दापासून तयार झालेला आहे. 'को' या शब्दाचा अर्थ 'सह' आणि ऑपररी' या शब्दाचा अर्थ 'कॉम करणे' असा आहे. या दोन्ही शब्दांचा एकत्रित विचार केल्यास 'सोबत काम करणे' किंवा 'एकमेकांच्या सहकार्याने काम करणे' असा अर्थ होतो. अशाप्रकारे 'सहप्रकार' संज्ञेचा अर्थ 'एकमेकांना कामात मदत करणे,' 'सर्वांच्या हितासाठी सामूहिक कार्य करणे', 'परस्पर सहकार्य' असा होतो. 'सहकार' ही संकल्पना मानवी इतिहासाएवढीच जुनी आहे. एकमेकास मदत करण्याची भावना ही नैसर्गिक आहे. मानवी संस्कृतीचा विकास होण्यापूर्वी मानव रानटी अवस्थेमध्ये एकत्रित शिकार करून आपसात वाटून घेत असते. एवढेच काय तर एकमेकास मदत करण्याची भावना प्राण्यांमध्येसुध्दा आढळून येते. कोणतेही काम एकटयाने केल्यापेक्षा सर्वाच्या सहकार्याने केल्यास ते अधिक चांगल्या प्रकारे आणि लवकर पूर्ण होते. सहकार्याच्या तत्वामुळे मानव जातीचा सामाजिक आणि आर्थिक विकास झाला आहे. 'सहकार' हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या तर 'पररपरम् भावयन्त' किंवा 'संगच्छध्वं संवद्ध्वम सं वो मनांसी जानताम्' या उपनिषद सूत्रांपर्यत सहकारी तत्वांचा उल्लेख आपल्या संस्कृतीत आहे.

सहकारचा उगम :—औद्योगिक क्रांतीमुळे महामान प्रमाणावर उत्पादन करणारे मोठमोठे कारखाने अस्तित्वात आले. त्याची परिणती संपत्तीचे केंद्रीकरण काही व्यक्तींच्या हाती होऊन समाजामध्ये आर्थिक विषमता निर्माण झाली. काही लोकांसाठी औद्योगिक क्रांती ही वरदान ठरली पण त्यातून श्रमिकांचे शोषण वाढले, कमी मोबदल्यात जास्त काम करून घेतल्या जात होते. कामगारांच्या हिताचे कायदे नव्हते. कारखान्यात अतिशय खराब अवस्थेत कामगारांना काम करावे लागते होते. मध्यस्थांच्या साखळीमुळे उत्पादीत वस्तूंच्या किंमती जास्त होत्या परिणाम स्वरूप समाजामध्ये आणखी विषमता वाढत गेली. व्याजाचे दरसुध्दा जास्त होते. या आर्थिक विषमस्थितीचे चटके समाजातील सर्वांना जाणवत होते. या विषम परिस्थितीमुळे समाजातील व्यक्ती एकत्र आल्या, एकमेकांच्या मदतीसाठी पुढे सरसावल्या, ही सहकाराची सुरूवात होती.

वेगवेगळया देशांमध्ये सहकारी संस्थांची उत्पत्ती झाली. 1817 मध्ये इंग्लंडमध्ये ग्राहक सहकारी चळवळ निर्माण झाली. 1930 च्या दशकात इंग्लंडमध्ये अनेक सहकारी संस्था सुरू झाल्या परंतु त्या अपयशी ठरल्या. सरतेशेवटी 1830 मध्ये 28 कामगारांच्या समूहाने 'रॉशडेल फ्रेन्डली को—ऑपरेटीव्ह सोसायटी' स्थापन केली. मागील अपयशातून शिकवण घेतल्यामुळे हे सहकारी ग्राहक भांडार यशस्वी ठरले. या ग्राहक भांडारांनी 24 ऑक्टोबर 1844 ला 'द रॉशडेल सोसायटी ऑफ इक्विटेबल पायोनियर्स' या नावाने संस्था नोंदविली. या संस्थेने 28 पौंडांवर आपला व्यवहार 21 डिसेंबर 1844 पासून सुरू केला. आधुनिक सहकारी चळवळीची ही सुरुवात होती. 1850 मध्ये जर्मनीमध्ये सहकारी पतपुरवठा चळवळ, 1882 साली डेन्मार्कमध्ये डेअरी आणि कृषी सहकारी चळवळ, 1856 साली अमेरिकेमध्ये कृषी सहकारी चळवळ अस्तित्वात आली.

सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचे योगदान :—महाराष्ट्रात सहकारी संस्था जवळ जवळ 100 वर्षापासून अस्तित्वात असून भारतातील सहकारी चळवळीला दिशा देण्याचे कार्य महाराष्ट्राने केले आहे. प्रारंभापासूनच महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला चांगले नेतृत्व लाभल्यामुळे पीक कर्ज पध्दती, भांडवलातील सरकारी सहभाग, सभासद, शिक्षण हया कल्पना प्रथम जुन्या मुंबई प्रांताने स्वीकारल्या आणि नंतर त्या देशभर स्वीकारण्यात आल्या. 1919 साली घटनात्मक बदलाद्वारे सहकारक्षेत्र प्रातांच्या कक्षेत आले. यानंतर मुंबई प्रांताने सर्वप्रथम आपला स्वतंत्र कायदा अमलात आणला. एवढेच नाही तर 1960 मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर त्यांच वर्षी 'सहकारी संस्था अधिनियम 1960' निर्माण करण्यात आला.

महाराष्ट्रात सर्वच क्षेत्रांमध्ये सहकारी संस्थांची केवळ संख्यात्मक वाढ झाली नाही तर गुणात्मक वाढ सुध्दा झाली आहे. आज महाराष्ट्रातील सहकारी चळवळ देशामध्ये आघाडीवर असल्याचे दिसून येते. सुरूवातीला महाराष्ट्रातील सहकारी चळवळ मुख्यतः कृषी पतपुरठयांच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. पण नंतर या चळवळीचा प्रसार शेतमाल प्रक्रिया व पणन, सहकारी भांडारे, ग्रामीण उद्योग व सामाजिक सेवा इत्यादी क्षेत्रात वेगाने झाला. महाराष्ट्रातील काही सहकारी संस्थांनी तर उल्लेखनीय कामगिरी केल्याचे आपल्याला दिसून येते. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला दिशा देण्याचे महत्वपूर्ण कार्य भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव विखे — पाटील, वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील, शरदचंद्र पवार, या शिवाय विठ्ठलदास ठाकरशी, लल्लूभाई सामळदास आर.जी.सरय्या, जी.के. देवधर यासारख्या द्रष्टया नेतृत्वाने केले आहे.

अध्ययनाचे उद्देश

1) नागपूर कृषीपथ संस्था यांच्या कार्याचा अभ्यास करणे.
2) गंभीर होत चालेल्या थकबाकीच्या प्रश्नांचे मूळे शोधणे.
3) ग्रामीण जनतेला सावकारी पाशातून सोडविण्यात जि.म.स. बॅंक कितपत यशस्वी झाली? याचा अभ्यास करणे.
4) नवीन आर्थिक सुधारणांच्या बॅंकेच्या व्यवहार व कार्यप्रणालीवर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.
5) व्यवस्थापनातील कामगारांच्या सहभागाचे महत्व अभ्यासणे.
6) सहकारी कायद्यातील बदलांचा व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेबद्दलच्या रिझर्व्ह बॅंकेचया धोरणात्मक बदलांचा अभ्यास करणे.
7) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या भवितव्याचा आढावा घेणे.
8) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेद्वारा केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठयाची व गुंतवणूकीची प्रवृत्ती शोधणे.

अध्ययनाची गृहीते

1) अनुत्पादक कर्जाच्या (एन.पी.ए.) नवीन संकल्पनेमुळे बुडीत कर्जाचे प्रमाण कमी होण्याची प्रवृत्ती आहे.
2) सरकारी धोरणामुळे बॅंकाच्या लाभक्षमतेवर परिणाम होतो.
3) सहकारी बॅंकेच्या एकूण व्यवहारात व खेळत्या भांडवलात वाढीची प्रवृत्ती दिसून येते.
4) नवीन आर्थिक धोरणामुळे सहकारी बॅंकावंर परिणाम झाला आहे.
5) जिल्हा मध्यवर्ती सहकरी बॅंकेद्वारा दिले जाणारे शेती कर्ज थकीत ठेवण्याची प्रवृत्ती वाढती आहे.
6) व्यवस्थापनातील कामगारांच्या सहभागामुळे कामगारांच्यास कार्यक्षमतेवर व मनोबलात भर पडते.

कर्जाचे वर्गीकरण रूकर्ज ही वेगवेगळया कालावधीची असतात. शिवाय कर्ज घेण्याच्या उद्देशामध्येसुध्दा भिन्नता असते. कर्ज ही वेगवेगळया व्यक्ती व संस्थांकडून घेतली जातात तसेच बहुदा कर्ज घेतेवेळी धनकोकडे संपत्ती गहाणसुध्दा ठेवावी लागते. हया सर्व बाबी लक्षात घेता कर्जाचे पुढील चार प्रकारे वर्गीकरण केल्या जाते.

- कालावधीनुसार — अल्पकालीन कर्ज, मध्यम व दीर्घकालीन कर्ज
- उद्देशानुसार — शेती व बिगर शेती कर्ज, व्यापारी, औद्योगिक, यंत्र खरेदी, शैक्षणिक, गोदाम व घरबांधणी, उपभोग, शिक्षण व विपणन इ.
- तारणानुसार — विनातारण, गहाण—नजरगहाण किंवा ताबेगहाण
- धनकोनुसार — विनातारण, गहाण—नजरगहाण किंवा ताबेगहाण
- धनकोनुसार — व्यक्ती, कंपन्या, बॅंका, भागीदारी व इतर संस्था

वरील सर्व प्रकारच्या वर्गीकरणामध्ये कालावधीनुसार केल्या जाणारे वर्गीकरण आदर्श मानल्या जाते.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक ही शेतकऱ्यांना अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन शेतीकर्ज सेवा/विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत पुरवित असते. तसेच बिगर शेती कर्जामध्ये वैयक्तिक कर्ज आणि सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जाच समावेश होत असून हे कर्जसुध्दा अल्प, मध्यम आणि दीर्घमुदतीचे असते.

शेती कर्ज

अल्पकालीन कर्ज (पीक कर्ज)

सहकार चळवळीच्या माध्यमातून दुर्बलांना सावकारांच्या कर्जातून मुक्त करण्यासाठी भारतात पहिला सहकारी संस्था कायदा झाला. 1904 साली झाला. पीक लागवडीसाठी येणारा खर्च, शेती उत्पन्न यांचा विचार करून पिकाच्या तारणावर कर्ज देण्याची 'पीककर्ज' पध्दती 1950 पासून महाराष्ट्रात राबविली जात आहे. पण 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीच्या' शिफारशीप्रमाणे संपूर्ण भारतासाठी पीक कर्ज पध्दती अंमलात येईपर्यंत म्हणजे 1954 पर्यंत त्यामध्ये फारशी प्रगती झाली नव्हती. आज मात्र पीक कर्ज पध्दती सर्वत्र रूढ झाली आहे.

सामान्यपणे या अल्पकालीन पीक कर्जाचा अवधी एक वर्षाचा असतो. बियाणे, खते, अवजारे, इ. च्या खरेदीकरिता तसेच मजुरी आणि इतर लागवडीचा खर्च यांच्या आपूर्तीकरिता या प्रकारचे कर्ज जिल्हा मध्यवर्ती बॅंकेद्वारा सेवा सहकारी संस्थेमार्फत दिल्या जाते. शेती उत्पादनाची विक्री करून जास्तीत जास्त 15 महिन्यांच्या आत या कर्जाची परतफेड करावी लागते. पीक कर्ज स्वतःच्या जमिनीवर किंवा लागवडीकरिता खंडाने घेतलेल्या जमिनीवर प्राप्त करता येते. प्रत्येक पिकाकरिता प्रती एकर कर्जाची राशी निश्चित केल्या जाते. कृषी खात्याने प्रमाणित केलेल्या उत्पादन खर्चाच्या आधारे जिल्हा हे घटक मानून प्रत्येक पिकानुसार कर्जदार ठरविले जातात. उत्पादन खर्च, परतफेडीची क्षमता, जमिनीची उत्पादन क्षमता या आधारे पीक कर्जाची प्रती एक राशी ठरविण्यात यावी. प्रत्येक जिल्हयातील भौगोलिक परिस्थिती, पाऊसमान, मशागतीची पध्दती, जमिनीची उत्पादकता, पीकानुसार येणारा उत्पादन खर्च, साधारणतः प्रती एकर उत्पन्न, परतफेडीची क्षमता इ. बाबीसुध्दा कर्जाचे प्रती एकर दर ठरवितांना विचारात घ्यावयास पाहिजेत. हे हंगामी स्वरूपामध्ये दिले जाणारे दिले जाणारे कर्ज रोख तसेच बियाणे, खते व जंतुनाशकांच्या स्वरूपात दिल्या जाते. पीक कर्जाची काही वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत :

- पीक उत्पादनाच्या उद्देशाने हे कर्ज दिल्या जाते.
- पीक तारणावर हे कर्ज दिल्या जाते.
- अपेक्षित पीक खर्चावर हया कर्जाशी राशी अवलंबून असते.
- हे कर्ज नगदी पैशाच्या आणि वस्तूंच्या रूपाने दिल्या जाते.
- पीक कर्जाची विक्रीशी सांगड घालून या कर्जाची वसुली केल्या जाते.

मध्यम मुदती कर्ज रूभारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. पाऊस कमी किंवा जास्त झाला तर उत्पादन चांगल्या प्रकारे होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला उदरनिर्वाह करणे तसेच पुढील वर्षाकरिता शेती उत्पादन खर्च करणे शक्य होत नाही. शेती, शेतकरी पर्यायाने ग्रामीण विकासावर नाबार्डने भर दिल्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांना मध्यम व दीर्घमुदती कर्जपुरवठा करण्यास परवानगी दिली आहे. त्याकरिता फेरकर्ज उचलीसाठी राज्यसहकारी बॅंकामार्फत वेगळया रकमा जिल्हा बॅंकांना मोठयाप्रमाणात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अल्पमुदती कर्ज हे पीक कर्ज म्हणून काही महिन्यांकरिता दिलेले असते. मात्र मध्यमुदती कर्ज हे प्राथमिक सहकारी संस्थांच्या सभासदांना शेतीचा विकास करण्यासाठी तसेच पूरक व्यवसाय करण्यासाठी बॅंकेकडून 15 महिने ते 5 वर्षासाठी दिले जाते. विद्युत पंप, पाईप लाईन, उपसा जलसिंचन योजना, जुनी विहीर दुरूस्ती, ठिंबक, तुषार सिंचन योजना व बैलजोडी/गाडी खरेदी, दूधाळ जनावरांचे तसेच शेळीपालन, यंत्रसामुग्री खेरदी इ. करिता हे मध्यम मुदतीचे कर्ज दिल्या जाते. कर्जदाराची परतफेडीची कुवत आणि संपत्तीचे आयुष्य विचारात घेऊन कर्जाची राशी आणि परतफेडीचा कालावधी ठरविण्यात येतो. ही कर्जराशी शेतकऱ्यांच्या देयक्षमतेपेक्षा अधिक असल्यामुळे शेतकरी पिकावर किस्तीद्वारा हया कर्जाची परतफेड करतात.

दीर्घ मुदतीकर्ज रू शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळे शेतीचे उत्पन्न अनिश्चित आहे. नाबार्डन अलिकडील काळात शेती आणि शेतकऱ्यंच्या विकासावर भर दिला असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकानांसुध्दा मध्यम आणि दीर्घमुदती कर्जपुरवठयाची परवानगी दिली आहे. त्याचबरोबर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांना राज्य बॅंकेकडून फेरकर्ज उचलीसाठी रकमा देखील उपलब्ध करून दिल्या आहेत.

साधारणतः जिल्हा बॅंका शेतीक्षेत्रात जलसिंचन योजना, फळबागा, शेती अवजारे, यंत्रे, भूसंरक्षण, ट्रॅक्टर खरेदी इ. शेती विकास योजनांकरिता कर्जपुरवठा करतात. तसेच दुग्धव्यवसाय, पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कूटपालन, वराहपालन, वनीकरण, साठवणगृहे, रेशीम उद्योग, मधुमक्षिकापालन, कृषिप्रक्रिया प्रकल्प, गांढूळ खतनिर्मिती प्रकल्प, इ. कृषिपूरक उद्योग व्यवसायांकरितासुध्दा कर्जपुरवठा उपलब्ध करून दिल्या जातो. याशिवाय बिगर शेती विभागात लघुउद्योग, हातमाग व यंत्रमाग, ग्रामीण व कुटीरोद्योग इ. करितासुध्दा कर्जपुरवठा उपलब्ध करून दिल्या जातो. अशा प्रकारचा शेती, शेतीपूरक व बिगर शेती कर्जपुरवठा 5 ते 15 वर्ष मुदतीकरिता उपलब्ध करून दिल्या जातो.

दीर्घकालीन कर्जपुरवठयाअंतर्गत मोठया रकमा कर्जाऊ दिल्या जात असल्यामुळे ज्या योजना, प्रकल्प किंवा कार्याकरिता कर्जपुरवठा केला जातो ते बंद पडू नये याकरिता संबंधित संस्थांनी आणि जिल्हा बॅंकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. दीर्घकालीन कर्जवाटप करतांना सभासदाची कर्जफेडीची क्षमता विचारात घ्यावी, कर्जाचा विनियाग योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही याकडे लक्ष द्यावे तसेच ज्या योजनेकरिता कर्जपुरवठा केला ती योजना सुरू राहून उत्पादनात वाढ होऊन थकबाकी राहणार नाही इ. बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीतून ग्रामीण भागाचा विकास साधणे हा दीर्घकालीन कर्जपुरवठयाचा मुख्य उद्देश असल्याचे आपल्याला दिसेल.

अल्पकालीन कर्जवाटप :–अल्पकालीन कर्जवाटपाच्या राष्ट्रीय स्थितीचा विचार केल्यास 1994–95 ते 1996–97 हया तीन वर्षामध्ये पूर्वीच्या वर्षाच्या तुलनेत कर्जवाटपाच्या वाढीच्या शेकडा प्रमाणात घट होऊन हे प्रमाण 17.85 वरून 5.21 पर्यंत कमी झाले. 1997–98 ते 2001–02 हया वर्षामध्ये कर्जवृध्दीचा शेकडा दर कमी–जास्त असला तरी वाढीची प्रवृत्ती बरी असून 6.88 ते 17.12 च्या दरम्यान होती. मात्र दशकातील अंतिम दोन वर्षामध्ये कर्जवाटपाचे प्रमाण कमी झाल्यामुळे कर्जवाटपाच्या वाढीचे शेकडा प्रमाण वजा झाले आहे. अल्पकालीन कर्जवाटपाबाबत महाराष्ट्राची स्थिती तर यापेक्षाही वाईट आहे. कर्जवाटपाच्या वाढीचा दर दशकातील चार वर्षामध्ये उणे, दोन वर्षात अगदी नगण्य तर चार वर्षामध्ये चांगला होता. राष्ट्रीय आणि राज्यपातळीच्या तुलनेत अकोल जि.म.स. बॅंकेची अल्पकालीन कर्जवाटपाची स्थिती समाधानकारक आहे. दशकातील पहिल्या आठ वर्षामध्ये अल्पकालीन कर्जवाटपाच्या शेकडा प्रमाणात 1997–98 आणि 2000–01 हया वर्षाचा अपवाद वगळता चांगली वृध्दी झाली आहे. हया दोन वर्षांच्या पूर्वीच्या वर्षात मात्र कर्जवाटपाच्या राशीत मोठी वाढ झाली होती. मात्र अल्पकालीन कर्जवाटपाची गती शेवटच्या दोन वर्षामध्ये उणे झाली आहे. तिन्ही पातळयांवर दशकातील शेवटच्या दोन वर्षामध्ये कर्जवाटपाच्या शेकडा वाढीच्या दर उणे झाला आहे. अल्पकालीन कर्जवाटपाच्या दशक शेकडा वाढीचा दर राष्ट्रीय राज्य आणि जिल्हा कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या बॅंक हया कर्ज 2010–11 मध्ये अल्प मुदतीच्या कर्जाचे वाटप करीत असतांना रोख पत 3124274 (रू. हजारात) वटवणीचे बिल 5027 यापैकी फक्त कृषी कर्जे 2056074 (रू. हजारात) वाटप करण्यात आले.

अल्पकालीन शेती आणि बिगर शेती कर्जपुरवठयातील शेकडा वाढ

राष्ट्रीय राज्य आणि नागपूर जि.म.स. बॅंक हया तिन्ही पातळयांवरील अल्पकालीन शेतीकर्जाच्या शेकडा वाढ–घटीची प्रवृत्ती तपासल्यास सामान्यपणे दशकातील सुरूवातीच्या वर्षामध्ये वाढीचे प्रमाण कमी–कमी झाले, मधल्या वर्षांमध्ये वाढीचे प्रमाण चांगले होते तर शेवटच्या दोन–तीन वर्षामध्ये वाढीचे प्रमाण खूपच कमी झाले. अल्पकालीन शेतीकर्जाची दशक शेकडा वाढ राष्ट्रीय, राज्यपातळी व नागपूर

जि.म.स. बॅंक हया दोन्ही पातळीवर पहिल्या अर्धदशकाच्या तुलनेत गुंतवणुकीच्या शेकडा वाढीच्या प्रमाणात दुसऱ्या अर्धदशकात मोठी घट झाली त्यातही घटीचे प्रमाण राज्यपातळीच्या संदर्भात जास्त होते.दिलेले कर्ज रूनागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे 2613 सभासद असुन भाग भांडवल 477713 एवढे आहे. तर राखीव व इतर निधी 39655 आहे. जिल्हा मध्यवर्ती बॅंकेने अल्प मुदतीच्या कर्जाचे वाटप करित असतांना 3924278 तर मध्यवर्ती मुदतीच्या कर्जाचे वाटप करित असतांना 38350 तर दिर्घ मुदतीचे कर्ज वाटप करित असतांना 14575 खर्च केले तर केवळ अल्प मुदतीचे कृषी कर्ज 2056074 रू. (सर्व आकडे रू. हजार दर्शवितात). जिल्हा मध्यवर्ती बॅंकेच्या प्राप्त उत्पन्नात सर्वात जास्त वाटा हा दिलेल्या कर्जापासून मिळालेल्या व्याजाचा असतो. लाभांश क्षमता टिकवून ठेवण्यासाठी दरवर्षी दिलेल्या कर्जात पुरेशी वाढ अपेक्षीत असते. नागपूर जि.म.स. बॅंकेची प्रथम अर्धदशकातील बऱ्यापैकी असलेले शेकडा वाढ वगळता या बॅंकेची आणि राज्य पातळीवरील उर्वरीत सर्वच कालखंडातील वाढ अत्यल्प किंवा नकारात्मक असल्याचे दिसुन येते हि स्थिती महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकाच्या विकासाच्या दृष्टीने घातक आहे. दुसऱ्या अर्धदशकातील नागपूर जि.म.स. बॅंकेच्या कर्ज वाटपातील घटीकडे बॅंकेचे लक्ष देणे आवश्यक आहे अन्यथा भविष्यात बॅंक अडचणीत येवू शकते. खेळते भांडवल रूमहाराष्ट्रातील जि.म.स. बॅंकेचे खेळते भांडवल 13425725 असुन राज्य कृषी व ग्रामीण विकास बॅंकेजवळ 1803804 (रू. हजारात) खेळते भांडवल असुन कृषी विकासाच्या दृष्टीने व सामाजिक विकासाच्या दृष्टीने बॅंकेचे अस्तित्व महत्वपुर्ण असल्याचे निदर्शनास येते.

निष्कर्ष

- कर्ज मागणी कार्याकरिता आहे, कर्जदाराकडे उपलब्ध रक्कम आणि कर्जराशीमधून कार्यपूर्ती होणात आहे किंवा नाही, आदानांची उपलब्धता आहे किंवा नाही आणि उत्पादनाला बाजारपेठ आहे किंवा नाही इ. बाबींचा विचार कर्ज मंजूर करण्यापूर्वी करावा.
- बॅंकेच्या आर्थिकक्षमतेची तपासणी कर्जवसुलीच्या साहाय्याने तपासल्या जाते. चांगल्या कर्जवसुलीकरिता शेती कर्जवाटप योग्यवेळी, आवश्यक प्रमाणात, टप्याटप्याने आणि परतफेडीची क्षमता असलेल्या योग्य व्यक्तीला केल्या गेले पाहिजे तसेच कर्जाच्या वापरावरसुध्दा लक्ष असावे. अशाप्रकारे कर्जवाटप तात्काळ आणि आवश्यक कागदपत्रांसह कल्या गेल्यास वाटपात वाढ होईल शिवाय थकबाकी आणि एनपीए आंतरराष्ट्रीय मानांकनाप्रमाणे कमी होऊ शकतील.
- कर्जाची परतफेड आणि तेव्हाच नवीन हंगामाकरिता कर्जवाटप अशी योजना राबविल्यास वसुलीमध्ये वाढ होईल यात शंका नाही. मात्र आवश्यकतेपूर्वी कर्ज मिळत असल्यामुळे ते उत्पादक कार्याकरिता वापरले जात नाही. कर्जवाटप सहज आणि वेळेवर करण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त कर्जवाटप किसान क्रेडिट कार्डच्या साहाय्याने करण्यावर लक्ष केंदीत करावयास पाहिजे.
- शेती कर्जासोबतच शेतीपूरक दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन तसेच शेतमाल प्रक्रिया इत्यादी उद्योगधद्यांनासुध्दा कर्जपुरवठा करण्यावर बॅंकेने लक्ष केंद्रीत केल्यास शेतीच्या उत्पादकतेमध्ये आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास कर्ज फेडण्याची त्यांची क्षमता वाढेल. शिवाय सावकारांकडून कर्ज घेण्याची आवश्यकता राहणार नाही.
- जि.म.स. बॅंकेकडून प्राथमिक पतसंस्थेमार्फत कृषी कर्ज उपलब्ध करून दिल्या जाते. कर्ज घेणारे बरेच शेतकरी, गरीब, दारिद्रय रेषेखालील आणि कमी धारणक्षेत्र असलेले असल्यामुळे त्यांच्या कडून हया कर्जाचा वापर बऱ्याच वेळा उत्पादन कार्याशिवाय उपभोगासाठी होऊ शकतो. परिणामस्वरूप उत्पादन कमी होऊन कर्ज थकीत होण्याची शक्यता अधिक असते. हे टाळण्याकरिता हयाच वितरण श्रुंखले अंतर्गत कृषीकर्जाशिवाय उपभोग कर्ज देण्याची व्यवस्था करावी किंवा दुसऱ्या बॅंकांमार्फत उपभोग कर्जाची व्यवस्था शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावी.
- गृहकर्ज, सोने तारण कर्ज, शेतमाल आणि इतर संपत्ती तारण कर्ज, नोकरदारांना वेगवेगळया प्रकारचे कर्ज, व्यापाऱ्यांना कॅशक्रेडीट तसेच बॅंक ओव्हरड्राफ्ट इ. प्रकारचे कर्ज समाजातील वेगवेगळया घटकांना दिल्यास शेती आणि बिगर शेती कर्जव्यवहारात संतुलन साधल्या जाते. शिवाय वर्षभर पैसा फिरत राहिल्यामुळे बॅंकेच्या व्यावसायिक धोक्यांचे प्रमाण कमी होते, खेळत्या भांडवलाचा पुरेपूर वापर होतो आणि उत्पन्नामध्ये वाढ होते.

उपाययोजना

- कर्जरादांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने बॅंकेच्या कर्मचाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवला पाहिजे. कर्जदारांच्या गरजा तात्काळ पूर्ण करून आणि त्यांना चांगल्या सेवा प्रदान करून कर्जदारांशी चांगले संबंध प्रस्थापित करावयास पाहिजे. ग्राहकांची वर्तणूक, कर्जपुरवठयाची आवश्यकता व महत्व आणि कर्जदाराचे चारित्र्य या सर्व बाबींचा तात्काळ आकलनासंदर्भात ज्ञान असावयास पाहिजे. यामुळे कर्जदार व बॅंक कर्मचारी यांच्यात निर्माण झालेले चांगले संबंध कर्जदारांना कर्जाची परतफेड वेळेच्या आत करायला प्रोत्साहित करतील. परंतु याकरिता मानवीय वर्तणूक, मानवीय संबंध, मूल्य, तात्काळ सेवेचे महत्व इ. संदर्भात नियमित प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.
- योग्यवेळी कर्ज वसुलीकरिता कर्जदाराकडे पाठपुरावा करावा. शिवाय सुलभतेने कर्जाची परतफेड करता आल्यास थकबाकी कमी राहते. त्यामुळे कर्जवाटप करतांना वरील बाबीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

संदर्भ :–


- केंद्रिय सहकारी बॅंकेद्वारा कृषी विकास डॉ. हरिदास जी. पाटील, प्रशांत पब्लीकेशन जळगांव, प्रथम आवृत्ती 2012
- सहकार डॉ. गंगाधर वी. कायंदे पाटील, चैतन्य पब्लीकेशन नाशीक, प्रथम आवृत्ती 2006.
- सहकार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ वर्ग 11 व 12 वर्ग पुस्तीका, प्रथम आवृत्ती.
- नागपूर जिल्हा सांख्यिकीय पुस्तीका 2011.